क्र. 9836
REFBK-0013471



# कुनकुन

## चंद्रशेखर



# कुंज कूजन

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३५०३५९........ वि:
क्रमांक ........................ नों. दि.

कवि चंद्रशेखर

यांच्या निवडक कवितांचा संग्रह

९३०६९

संपादक

भास्कर चंद्रशेखर गोऱ्हे

एम्. ए., बी. टी.

REFBK-0013471

REFBK-0013471

मूल्य रु. ४.००

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली
ऑगस्ट १९६३

© भा. चं. गोरे

प्रकाशक

सदाशिव कृष्ण पाध्ये
तपश्चर्या
व्हीनस प्रकाशन
३८१ क, शनिवार पेठ : पुणें

मुद्रक

यशवंत गोपाळ जोशी
आनन्द मुद्रणालय
१५२३ सदाशिव पेठ : पुणें २



चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे

जन्म २९ जानेवारी १८७१ ] [ मृत्यु १७ मार्च १९३७

# राजकवि श्री. चंद्रशेखर

## ( चरित्रविषयक संक्षिप्त माहिती )

### आणि निवेदन

राजकवि चंद्रशेखर यांचा जन्म ता. २९ जानेवारी १८७१ रोजीं श्रीक्षेत्र नासिक येथें झाला. श्रीतिलभांडेश्वर महादेवाच्या मंदिरानजीक कवींच्या घराण्याचें चार पिढ्यांचें वडिलोपार्जित घर होतें; तेथें कवींचें बालपण व्यतीत झालें. लहानपणीं वडीलधाऱ्या माणसांकडून कवींचें लाड-कोडानें संगोपन करण्यांत आलें. त्या काळांतील सुखाचें दिग्दर्शन गोदागौरव काव्यांत कवींकडून करण्यांत आलें आहे. कवींचें मराठी शिक्षण दाजी पंतोजींच्या गांवठी शाळेंत, व नंतर सरकारी नं. ३ च्या शाळेंत नासिक येथेंच झालें. मराठी पांचवी इयत्ता उत्तीर्ण झाल्यावर इंग्रजी शिक्षणासाठीं कवि हायस्कुलांत जाऊं लागले. हें शिक्षण चवथ्या इयत्तेपर्यंत आलें असतां उन्हाळ्याच्या सुटींत कवि सिन्नर येथें आपल्या चुलत्याकडे गेले. कवींचे चुलते गोपाळ रामकृष्ण उर्फ गोपूतात्या हे सिन्नर येथें सार्वजनिक बांधकाम खात्यांत नोकरीस होते. ते सिन्नर येथें बाजीराव देशपांडे यांच्या वाड्यांत राहत असत. सिन्नर तालुका बागाइती असून हवामानानें सर्द पण रमणीय आहे. तेथील नागेश्वर--गोदेश्वर या भव्य देवालयांच्या आवारांतून कवि चैनीनें भटकावयास जात. याच ठिकाणीं कवि चंद्रशेखर यांना अगदीं पहिल्यानें कविता रचण्याची बुद्धि सुचली. ते मनाशीं गुणगुणत एक स्तोत्र लिहूं लागले; त्या स्तोत्राचें पालुपद

" नारायणा शरण त्या करुणालया मी. "

असें होतें. हें स्तोत्र तयार झाल्यावर त्यांनीं गोपूतात्यांस वाचून दाखविलें. तें त्यांना फार आवडलें व त्यांनीं आपले पुतणे चंद्रशेखर यांचें कौतुक करून

"तूं कवि होशील!" असा आशीर्वादहि दिला. या गोष्टीनें कवींच्या मनोवृत्तीस उत्तेजन मिळून त्यांच्या अंतर्यामीं कवित्वाचें बीजारोपण झालें.

पुढें शाळेंतील अभ्यासाचा धोशा मागें लागल्यामुळें हें बीज जागच्या जागींच मुरत राहिलें. कवींचें इंग्रजी शिक्षण अनुक्रमें नासिक हायस्कूल, बडोदें हायस्कूल व विश्रामबागेंतील पुणें हायस्कूल या तीन संस्थांतून प्रवेशपरीक्षेपर्यंत झालें. प्रवेशपरीक्षेंत गणित विषय कच्चा असल्यामुळें त्यांना दोन वेळां अपयश आलें; त्यामुळें त्यांचें मन खट्टू झालें आणि त्यांच्या शालेय शिक्षणाची इतिश्री झाली. कवि पुणें येथें शिकत असतां विठ्ठल नारायण पाठक व हरि गणेश ऊर्फ हरिभाऊ गोडबोले हे त्यांचे आवडते शिक्षक असत. वर्गांत या अध्यापकांकडून चंद्रशेखरांच्या मराठी व इंग्रजी लेखनाचें कौतुक होत असे.

चंद्रशेखर विद्यार्थिदशेंत पुणें येथें सदाशिव पेठेंतील गायआळींत बॅरिस्टर गाडगीळ यांच्या वाड्यांत राहत असत. त्या वेळच्या आठवणी सांगतांना गाडगिळांच्या टेनिस कोर्टाच्या कोपऱ्यावरील त्यांच्या निरामय सुंदर खोलीचें वर्णन करीत. शाळेला उन्हाळ्याची सुटी मिळाल्यावर ते दररोज सायंकाळीं पर्वती, चतुःशृंगी वगैरे रमणीय देखाव्याच्या भागांतून सहलीसाठीं जात असत. अशा १८९५ सालाच्या सुटींत वसंतकाळ असल्यामुळें कोकिलांचे सुस्वर आलाप निघत असतांना त्यांच्या स्फूर्तीस जागृति आली व त्यांनीं वर सांगितलेल्या खोलींत "कोकिल" ही आपली पहिली कविता लिहिली. ही कविता 'करमणूक' कर्ते कै. हरिभाऊ आपटे यांच्याकडे पाठवितांच १८ मे १८९५ च्या करमणुकीच्या अंकांतून प्रसिद्ध झाली. अंक पाहिल्यावर चंद्रशेखरांच्या वर्गबंधूंपैकीं कांहीं रसिकांनीं कवि म्हणून त्यांचा बोलबाला केला.

प्रवेशपरीक्षेंत अपयश आल्यामुळें चंद्रशेखर धंदेशिक्षणाच्या उद्देशानें त्यांचे नासिक हायस्कुलांतील वर्गबंधु कै. अनंत रामचंद्र कवडे, फोटो आर्टिस्ट, यांच्याकडे अहमदाबाद येथें राहिले. पण फोटो आर्टिस्टच्या कामांतील धादल, धांवपळ, यांचें त्यांच्या मनोवृत्तीशीं जुळलें नाहीं व दिवसेंदिवस कवितेच्या मोहपाशांत त्यांचें मन अधिकाधिक गुरफटूं लागलें; त्यामुळें धंदेवाईक बनून पैसा कमावण्याचा नाद त्यांना सोडावा लागला. दोन वर्षें या धंद्याची माहिती

घेण्यांत घालवून ते बडोदें येथें परतले.

बडोदें येथें चंद्रशेखरांचे वडील बंधु कै. नारायणराव हे त्या वेळीं फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट होते, त्याच्याजवळ ते राहिले. सुदैवानें भाषा चांगल्या येत असल्यामुळें आणि अक्षरहि चांगलें असल्यामुळें त्या काळांत कारकुनी पेशाची सरकारी नोकरी त्यांना लवकरच मिळाली. प्रथम दिवाण कचेरींत हंगामी कारकुनाचें काम त्यांनीं एक वर्ष केलें, व नंतर बडोदें राज्यांतील चीफ मेडिकल ऑफिसर यांनीं त्यांना चाहून आपल्या कचेरींत घेतलें. याच कचेरींत मेमोरँडम क्लार्क म्हणून चंद्रशेखरांनीं निवृत्तीपर्यंत सुमारें ३४ वर्षें नोकरी केली.

बडोद्यास नोकरीस लागल्यावर थोड्याच काळांत कवींच्या जीवनांत एक संस्मरणीय गोष्ट घडून आली. ती म्हणजे कै. कविवर्य दत्तात्रय कोंडो घाटे यांचा परिचय. या परिचयानें उभय कवींचा सुखसमागम झाला तो दुर्दैवानें दत्तकवींच्या अकालीं झालेल्या निधनामुळें उणापुरा एक वर्षांतच संपला. तरी या औटघटकेच्या राज्यांत उभयतां कवींनीं सुधातुल्य काव्यरसाच्या पुष्कळ मेजवान्या झोडल्या. दत्तकवींच्या या गाढ स्नेहाची हकीकत चंद्रशेखरांनीं "दत्तांची कविता" या काव्यसंग्रहास 'हृद्गत' म्हणून जी प्रस्तावना लिहिली आहे तींत सविस्तर दिली आहे.

नोकरीच्या जीवनांतील पहिल्या सुमारें २२ वर्षांच्या काळांत चंद्रशेखरांच्या हातून काव्यरचना झाली. त्यानंतरचा सुमारें १० वर्षांचा काळ कौटुंबिक अडचणी व स्थित्यंतरें यांत गेला. या दहा वर्षांत लेखन बरेंच कमी झालें. प्रकृतीचें अस्वास्थ्य, हाताला झालेला Writer's Cramp नांवाचा व्याधि इ. याच उदासीनतेच्या काळांतल्या उपाधि होत. सुदैवानें इ. स. १९२८ पासून परिस्थिति हळूहळू अनुकूल होऊं लागली आणि चंद्रिका या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाची तयारी सुमारें ३ वर्षांत झाली. प्रतिकूल परिस्थितींत निराशेनें कवितांच्या वह्या फाडून टाकल्यामुळें काव्य-संग्रह छापून प्रकाशित होण्याची आशाच विरलेली होती; परंतु ईश्वरी संकेतानें चंद्रशेखरांचे एक अहेतुक कविमित्र श्री. यादवसुत (राजेश्वर यादव मुळावेकर, मु. नांदेड) यांच्या निरलस प्रयत्नांनीं लुप्त झालेलीं सर्व काव्यें पुनः उपलब्ध झालीं आणि भारत-गौरव-ग्रंथमालेचें (कर्नाटक प्रकाशन

संस्था ) १०६ वें पुष्प म्हणून 'चंद्रिका' हा काव्यसंग्रह इ. स. १९३२ सालीं प्रकाशित होऊन महाराष्ट्रीय रसिकांच्या हातीं पडला.

सन १९२८ ते १९३७ हा चंद्रशेखरांच्या जीवनांतील भाग्याचा काळ म्हणतां येईल. चंद्रिकेच्या प्रकाशनानंतर त्यांना राजाश्रय मिळून राजकवि ही मानाची पदवी श्रीमंत सयाजीरावांच्या दरबारांत समारंभपूर्वक देण्यांत आली. मधल्या काळांतील नैराश्य विरलें आणि त्यांच्या मनोवृत्ति उल्हसित झाल्या. राजकवि या नात्यानें त्यांच्या काव्यवाचनाचे निमित्तानें श्रीमंतांशीं गांठीभेटी होऊं लागल्या, व काव्यरचनेस नवा जोमहि आला. कांहीं प्रासंगिक काव्यें, श्रीमंत सयाजीरावांच्या सूचनेस अनुसरून रचलेलीं वैदिक देवदेवतांचीं कांहीं स्तोत्रें आणि 'किस्मतपूरचा जमीनदार' हें स्वतंत्र प्रकाशित झालेलें खंडकाव्य ही या जीवनसंध्येच्या सुखाच्या काळांतील मुख्य काव्यरचना होय.

चंद्रशेखरांच्या प्रतिकूल काळांत त्यांचें नैराश्य दूर करून प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न अनेक स्नेही व लेखक यांचेकडून मोठ्या आत्मीयतेनें करण्यांत आले. त्यांत सुप्रसिद्ध विनोदी लेखक श्री. चिं. वि. जोशी, राजरत्न श्री. वा. वि. जोशी, श्री. मा. दा. अळतेकर, श्री. माधवराव पटवर्धन, श्री. विठ्ठलराव ऊर्फ दादासाहेब घाटे, कै. वि. पां. नेने इ० सन्मित्रांच्या प्रयत्नांचा येथें उल्लेख करणें आवश्यक आहे. या मंडळींनीं वारंवार भेटी घेऊन, चर्चा करून काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाबाबत सल्ला देऊन कवींना उत्तेजन दिलें, आणि बडोद्याचे प्रसिद्ध विद्वान् वकील व साहित्यिक कै. दाजी नागेश आपटे यांच्या प्रयत्नांनीं चंद्रिका या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाचा मार्ग सुलभ झाला.

चंद्रिकेच्या प्रथमावृत्तीच्या प्रती गेल्या कांहीं वर्षांपासून दुर्मिळ झाल्या, म्हणून दुसरी आवृत्ति काढण्याचे प्रयत्न केले. परंतु आर्थिकदृष्ट्या हें काम गैरसोईचें आहे व हल्लींच्या महागाईच्या काळांत परवडण्यासारखें नाहीं असें मूळ प्रकाशकांचें मत पडलें. विद्यापीठांतील व महाविद्यालयांतील कवितेच्या चाहत्या प्राध्यापकांनीं दुसरी आवृत्ति कां निघत नाहीं म्हणून विचारपूस केली, व मदत करण्याचीहि इच्छा दर्शविली. त्यांत फर्ग्युसन महाविद्यालयांतील मराठीचे प्राध्यापक श्री. रा. श्री. जोग यांनीं काव्यसंग्रह पुनः उपलब्ध व्हावा म्हणून अत्यंत आत्मीयतेनें सक्रिय साहाय्य करण्याचें मान्य केलें. त्यांचीच प्रस्तावना या आवृत्तीस लाभली आहे, ही मोठ्या आनंदाची

गोष्ट होय.

माझ्या स्नेहीमंडळींतील व्हीनस प्रकाशन संस्थेचे कुशल व तडफदार प्रकाशक श्री. स. कृ. पाध्ये यांनीं चंद्रिकेची प्रथम एक संक्षिप्त महाविद्यालयीन आवृत्ति काढावी अशी कल्पना सुचविली आणि ती स्वतःच्या प्रकाशन-संस्थेकडून काढण्याची सिद्धताहि केली. व्हीनस प्रकाशन संस्था पुण्यांतील एक नामवंत संस्था असून तिचा रौप्यमहोत्सवहि नुकताच साजरा झाला आहे. अशा संस्थेतर्फे ही आवृत्ति प्रकाशित होत आहे हें महाराष्ट्रीय रसिकांचें सुदैव म्हटलें पाहिजे. या आवृत्तीस चंद्रशेखरांच्या कुंजकूजन या लोकप्रिय काव्याचें नांव दिलें आहे. पहिल्या आवृत्तीप्रमाणें या संक्षिप्त आवृत्तीचेंहि रसिकांकडून आणि विद्यापीठांकडून स्वागत होईल अशी आशा आहे.

शेवटीं सांगावयाचें इतकेंच कीं, या महाविद्यालयीन आवृत्तीस ज्येष्ठ व श्रेष्ठ असे अनुभवी प्राध्यापक श्री. रा. श्री. जोग यांची सुयोगानें लाभलेली प्रस्तावना विद्यापीठांतून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थिवर्गास अत्यंत मोलाची व मार्गदर्शक होईल यांत शंका नाहीं. प्राध्यापक जोग आणि श्री. स. कृ. पाध्ये यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानून हें निवेदन पुरे करतों.

वडोदें,<br>
७ जुलै १९६३ — भा. चं. गो.

# आदरांजलि

कवि चन्द्रशेखर दिवंगत झाल्याला आज पंचवीस वर्षें होऊन गेलीं आहेत. आणि त्यांची ‘ चन्द्रिका ’हि अलीकडे कित्येक वर्षें दुर्मिळ झालेली आहे. आज ती निवडक वेच्यांच्या स्वरूपांत आणि निराळ्या नांवाने उपलब्ध होत आहे ही गोष्ट संपूर्णपणें समाधान करणारी नसली, तरीहि स्वागतार्हच आहे. कारण संपूर्ण ‘ चन्द्रिका ’ उपलब्ध होण्याची आशा तीमुळे पल्लवित झाली आहे. चंद्रशेखरांची कविता हें मराठी कवितेचें, जुन्या पद्धतीचें असलें तरी, एक बहुमोल लेणें आहे. तें पाहावयास मिळणें ही गोष्ट कठिण व्हावी हें मराठी रसिकतेचें दूषणच होय. त्याचें निराकरण प्रस्तुत संग्रहाने कांही अंशीं तरी होत आहे.

चन्द्रशेखरांचा काल म्हणजे अर्वाचीन कवितेच्या तीन पिढ्यांचा काल होय. अर्वाचीन कवींच्या पहिल्या पिढींतील कवि केशवसुत, टिळक, माधवानुज आणि दत्त, दुसऱ्या पिढींतील बी, गडकरी, बालकवि आणि रेंदाळकर हे आणि तिसऱ्या पिढीमधील रविकिरणमंडळ आणि तत्समकालीन कवि यांची बरीच कविता चंद्रशेखरांच्या डोळ्यांपुढे होऊन गेली. त्यांच्याप्रमाणेच या तीन पिढ्यांची कविता पाहिलेले कवि तांबे, यांची कविताहि चंद्रशेखरांनी पाहिली. परंतु या सर्व कवींपेक्षा ते, आणि त्यांच्या कवितेपेक्षा चन्द्रशेखरांची कविता, वेगळी, पृथगात्मच राहिली. अर्वाचीन कविता किंवा तिचें इंग्रजी-मधील मूळ यांचा चन्द्रशेखरांवर आणि त्यांच्या कवितेवर फारसा प्रभाव पडला नाही. चन्द्रशेखर हे आधीच्या पंडितयुगाचे अर्वाचीन कालांतील प्रतिनिधीच राहिले, आणि हें प्रतिनिधित्व त्यांनी फार चांगल्या प्रकारें केलें. इतकें की, माधव जूलियन् यांच्यासारख्या ‘ उच्छृंखल ’ कवीलाहि त्यांच्यापुढे आदराने मान वाकवावीशी वाटावी. जुन्या परपरेंतील इतर कित्येक कवींच्या वाट्यास आलेली विडंबनवृत्ति, तिरस्कार अथवा उपेक्षा

चंद्रशेखरांच्या अनुभवास न येण्याचें कारणहि हेंच की, त्यांची कविता जुन्या पद्धतीची आहे, यापलीकडे तीमध्ये दूषणास्पद असें कांही नव्हतें, आणि जुन्या परंपरेमध्ये ती श्रेष्ठ ठरण्यासारखी होती. स्वतः चन्द्रशेखरांनी जुन्या-नव्याच्या वादामध्ये विशेष भाग घेतला नव्हता. नव्यांतील दत्तकवि त्यांचे स्नेही होते, व माधव जूलियन हे भक्त होते. परंतु चन्द्रशेखरांना कौतुक वाटलें तें लेंभे यांच्या कवितेचें. मात्र जुन्याचें मंडन किंवा नव्याचें खंडन करण्याच्या भरीस न पडतां आणि आपली पदवी न सोडतां आपल्या पद्धतीनेच चंद्रशेखर कविता लिहीत राहिले.

'कवितेचीं विलासस्थलें' या आपल्या कवितेमध्ये चंद्रशेखरांनी काव्यानुकूल विषय आणि प्रसंग यांविषयीची आपली कल्पना प्रकट केली आहे. त्या कवितेस आधार म्हणून इंग्रजी पंडित डॉ. जॉन्सन् याचें एक वचन घेतलें आहे. जॉन्सन्च्या मताने निसर्ग आणि मानवाच्या भावभावना हें काव्याचें क्षेत्र होय. त्यांचें वर्णन म्हणजे काव्य ( The province of poetry is to describe nature and passion ) या कवितेमध्ये एकएक, दोनदोन श्लोकांत, क्वचित् अधिक श्लोकांतहि, एकेक काव्ययोग्य विषय किंवा प्रसंग ग्रथित करून हीं कवितेचीं विलासस्थलें वर्णिलीं आहेत. या कवितेच्या पूर्वार्धातील बारा खंडांत निरनिराळ्या ऋतूंतील निरनिराळ्या वेळचीं दृश्यें चित्रित केलीं आहेत, आणि उत्तरार्धातील बारा खंडांत शृंगारवीरकरुणादि नवरसांच्या स्थायी भावांचीं चित्रें काढिलीं आहेत. त्यांत शांत, भक्ति, वत्सल इत्यादि रसांचाहि समावेश केला आहे. निसर्ग हा काव्य-योग्य विषय अशी भावना हा अर्वाचीन कवितेचा एक महत्त्वाचा विशेष असला, तरी त्याचें चंद्रशेखरकृत वर्णन हें बरेंचसें जुन्या वळणावरच गेलेलें आहे. शरद्वैभव, कुंजकूजन, तारातरंग, वसंतमाधव इत्यादि कविता चंद्रशेखरांच्या काव्यविषयक या कल्पनेस धरून उतरल्या आहेत. वर्णनीय विषयाचें कल्पनालंकृत आलंकारिक वर्णन करणें हा त्याचा मुख्य भाग असे. त्या त्या वेळीं तो तो निसर्गविषय अत्यंत सुंदर असा कवीला वाटे. यापाठीमागे त्यांची जी भावना होती ती त्यांनी पुढे दिलेल्या शब्दांनी व्यक्त केली आहे:—

जें जें निसर्गरमणीय म्हणोनि कांहीं,
निर्माण होउनि जगीं विलसोनि राही,

सौंदर्य तें नयनगोचर होय साचें,
अज्ञेयशा भुवनसुंदर ईश्वराचें.

निसर्गाबद्दलची ही वृत्ति मात्र अर्वाचीन कवितेने स्वीकारलेली वृत्ति म्हणतां येणार नाही. ईश्वररूपापेक्षा वेगळें असें त्याचें व्यक्तित्वच त्या कवितेला मान्य आहे.

काव्याचा दुसरा विषय ज्या मानवी भावना, त्याहि त्यांनी आपल्या कवितेच्या विलासस्थलांमध्ये वर्णिल्या आहेत. परंतु त्यांमध्ये त्यांच्या स्वतःच्या भावनेला कोठे स्थान मिळालें आहे असें दिसत नाही. तेथेहि इतरांच्या भावनांचा आविष्कार वर्णनपद्धतीने झालेला दिसतो. अर्वाचीन कवितेपासून चंद्रशेखर दूर असल्यासारखे वाटतात ते यामुळेच. आत्मभावनाविष्कार हा त्यांना मंजूरच नव्हता. त्यांच्या ‘ गोदागौरव ’ या कवितेंत किंवा ‘ कवितारती’ मध्ये तो त्यांना न जुमानतां आणि मर्यादित प्रमाणांत झाला, तोहि निरुपायानेच असावा. अर्वाचीन कविता म्हणजे भावगीतप्रधान कविता होय, आणि भावगीत म्हटलें की आत्माविष्कार आलाच. परंतु चंद्रशेखरांच्या काव्य-कल्पनेंत तो बसत नव्हता. मनांतील उत्कट भावनेचा सहजोद्गार म्हणजे काव्य असें त्यांना कधी वाटलें नाही. त्या भावनांना आवरून, प्रौढ असें अवैयक्तिक रूप देऊन, टापटिपीने, व्यवस्थित भाषेंत, आवश्यक त्या अलंकारयोजनेने, चारचौघांत आपण वागतों तेवढ्या औपचारिकतेने, तें कार्य झालें पाहिजे असें त्यांना वाटे. तो एक समारंभ असे व त्या समारंभास साजेल अशी दृष्टि विषयाची निवड करितांना ते ठेवीत असत. इतर क्षुद्र विषयांना त्यांच्याकडून आश्रय मिळत नसे.

कविता म्हणजे एक समारंभ अशी भावना असल्यामुळेच जणु कांही त्यांच्या कित्येक कवितांच्या निर्मितीची प्रेरणा कांहीना कांही प्रसंगानुरोधाने झालेली दिसते. कित्येक वेळा त्या त्या प्रसंगास साजेल अशी कविता लिहिण्या-बद्दल मागणीहि आलेली असे. ‘ करमणूक ’ या साप्ताहिकाने ‘ दिल्ली-दरबारा ’ निमित्त काढलेल्या जादा अंकाकरिता ( अर्थात् मागणी आल्यामुळे ) ‘ हिंदवंदना ’ रचिली गेली. त्याच प्रसंगाने मनोरंजनाकरिता ‘राजनीतिगीतिका’ लिहिण्यांत आली. केव्हा नववर्षाकरिता, केव्हा संक्रमणाकरिता कविता लिहिल्या. सयाजीराव गायकवाडांच्या सुवर्णमहोत्सवासाठी कविता व्हावी हें

ओघानेच आलें. चंद्रशेखरांच्या कवितेंत अशा प्रासंगिक कविता अनेक आहेत. आपलें स्वत:चें असें वेगळें कांही सांगावयाचें आहे म्हणून त्यांनी सांगितलें आहे असें क्वचितच होई. अपवाद म्हणून ' झुळुकी ' या कवितेचा उल्लेख करिता येईल. कवि कवितेच्या प्रारंभीं टीप देऊन " उपवनांतील झुळुकींबरोबर माझ्या मनांतूनहि कांही झुळुकी गजगतीने वाहत्या झाल्या, त्या सहृदयांसाठी येथे सादर केल्या आहेत " असें चंद्रशेखर स्वत: येथे सांगत आहेत. त्याला ' गजगति " वृत्ताची योजना करून व एकंदरींत लहानसर अशी कविता लिहून तें एक नवीन तऱ्हेचें भावगीत करण्याचें त्यांच्या मनांत असावें. परंतु उत्कट वा तरल भावनेपेक्षा विचारप्राधान्य किंबहुना विचारजाड्यच तीमध्ये उतरलें आहे असें वाटतें. त्या मानाने ' कवितारति ' किंवा गोदागौरवांतील कांही भाग यांतच अधिक भावनोत्कटता आलेली दिसते.

यामुळेच त्यांची प्रतिभा भावगीतानुकूल नाही ( वैणिक=Lyrical ) असें श्री. माडखोलकरांनी त्यांच्यासंबंधी म्हणून ठेवलें आहे. भावगीतानुकूल नसणारी त्यांची प्रतिभा महाकाव्यानुकूल होती असें वरवर वाटण्यासारखें आहे, आणि माडखोलकरांनी त्या आशयाचें विधानहि केलें आहे. " खरोखरीच मिल्टनप्रमाणे महाकवि व्हावयाला योग्य अशीच त्यांच्या मनाची रचना आहे, " असें ते म्हणतात. मिल्टनची कविता विचारप्रधान होती, तशी चंद्रशेखरांची असल्याने हा साम्याभास झाला असावा. चंद्रशेखरांनी एक महाकाव्य लिहिण्याचा आरंभ आणि प्रयत्नहि केला होता. पण ' सोमनाथा ' वरील हें महाकाव्य पहिल्या सर्गापलीकडे गेलें नाही. त्यांची रचनापद्धति त्या लेखनाला अनुकूल असूनहि परिस्थितीमुळे, किंवा रचना घोटीव आणि निर्दोष करण्यांत बराच काल आणि कष्ट खर्ची पडत असल्यामुळे बहुधा समग्र महाकाव्य त्यांच्या हातून लिहिलें गेलें नाही. पण यापेक्षाहि अधिक सबल असणारें असें दुसरेंहि एक कारण असावें. महाकाव्यांत कथनाचा किंवा वर्णनाचा भाग बराच असला आणि असें कथन-वर्णन चंद्रशेखरांना चांगलें साधत असलें, तरी त्यालाहि कांही कथा ही लागतेच, व त्या कथेची मांडणी तिच्या अंगभूत प्रसंगांसह करण्याचें कौशल्यहि लागतें. जुनी कथा उपलब्ध नसेल, तर नवीन प्रसंग निर्माण


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे, एमउझत

करावे लागतात. चंद्रशेखरांना ही नवीन प्रसंगांची, घटनांची, स्वतंत्र निर्मिति साधत होती असें वाटत नाही. दिलेल्या, समोर असलेल्या विषयाचें नवनवोन्मेषमंडित असें वर्णन त्यांना साधे, परंतु ‘ अपूर्ववस्तुनिर्मिति ’ साधत नव्हती; म्हणून महाकाव्य पहिल्याच प्रसंगावर थांबलें. हा पहिला प्रसंगहि रघुवंशांतील सोळाव्या सर्गांतील अयोध्यापुरी कुशाला आपली दीन दशा वर्णन करीत आहे, त्या प्रसंगाशीं बराच सदृश आहे. त्यापुढील कथा सारीच निर्माण करावयाची होती व तीकरिता अनेकप्रसंगनिर्मितीहि करावयास पाहिजे होती. परंतु हें करणें कठीण वाटल्यामुळे बहुधा पुढील रचना झाली नाही. महाकवीच्या प्रतिभेंत अपूर्व वस्तुनिर्मितीहि येते, केवळ वर्णनशक्ति अपुरी पडते. पंडित कवींनी पूर्वीच्या काळीं पौराणिक कथा किंवा अलीकडील कालांत ऐतिहासिक कथा घेऊन दीर्घ काव्यें लिहिलीं. परंतु या प्रकारची उसनवारी चंद्रशेखरांना करावीशी वाटली नाही. म्हणूनहि त्यांच्या हातून महाकाव्यनिर्मिति झाली नसावी.

अपूर्ववस्तुनिर्मिति करण्याचें सामर्थ्य चंद्रशेखरांच्या प्रतिभेंत नसलें, तरी दुसरीकडून विषय मिळाल्यास त्याची सजावट करून तो रसिकांपुढे ठेवण्याचें कसब त्यांच्या अंगीं भरपूर होतें. त्यामुळे दोन गोष्टी साधल्या. पहिली अशी की, ज्या प्रासंगिक स्वरूपाच्या कविता त्यांनी लिहिल्या, त्या कविताहि त्यांनी आपल्या वैदग्ध्याने, अभिजात रसिकतेने आणि रचनाविषयक कारागिरीने रंगवून दाखविल्या आणि काव्यमय केल्या, आणि त्यांचा प्रासंगिकपणा शक्य तों झाकून टाकला. प्रासंगिक खरी पण ती कविता झाली; केवळ पद्यरूप गद्य उतरलें नाही. दुसरी गोष्ट अशी की, मूळ इंग्रजी कवितांचीं त्यांचीं रूपांतरें वा अनुवाद अत्यंत यशस्वी झाले आहेत. ‘ स्वदेशप्रीति ’ ‘ चैतन्यदूत ’ हीं त्यांचीं भाषांतरें; किंवा ‘ वनवासाचीं सुखें ’ आणि ‘ धनगर आणि तत्त्ववेत्ता ’ हे अनुवाद, स्वतंत्र कविता वाटण्याइतके यशस्वी झाले आहेत. ‘ रंगराव हर्षे ’ आणि ‘ चिंतोपंत उदास ’ हीं मिल्टनच्या कवितांचीं रूपांतरें त्यांच्या अनुवादकौशल्याची उत्तम साक्ष देतात. मिल्टन् हा जसा विदग्ध पंडित होता, तसे चंद्रशेखरहि संस्कृत संस्कृतीमध्ये पूर्णपणें मुरलेले होते. त्या दोघांची मनोवृत्तीहि सारखीच होती. मिल्टन्चे पौराणिक दाखले आणि निर्देश यांना समांतर असे दाखले आणि निर्देश चंद्रशेखरांच्या

जवळ तयार होते. त्यामुळे आणि एकंदरींतच या कवितांच्या आशयाशीं समरस होऊं शकल्यामुळे चंद्रशेखरांचीं हीं रूपांतरें अत्यंत सरस उतरलीं आहेत. ' Suffolk Miracle ' या इंग्रजी लोकगीताचें ' काय हो चमत्कार! ' हें रूपांतर तर मराठी काव्यांत अतुलनीय ठरण्यासारखें आहे. मूळ साध्या, निरलंकृत, धावत्या कथानिवेदनावर चंद्रशेखरांनी आपल्या कुशल हातानी असे कांही संस्कार केले आहेत की, तें नुसतें रूपांतर न राहतां त्याचें एक अतीव मनोरम प्रेमकाव्य झालें आहे. त्यांतील अद्‌भुत प्रेमकथा ही रसिकास वास्तवच वाटण्यासारखी परिणामकारक आणि चटका लावणारी उतरली आहे. शंकराचार्य आणि विवेकानंद यांच्या कवितांचे अनुवाद करणें हें अर्थात् तितकेंसें अवघड नव्हतें; परंतु हे अनुवाद ' काय हो चमत्कार! ' च्या तुलनेने फिकेच पडतात. याच रीतीने टेनिसन्‌च्या ' इनॉक आर्डन ' किंवा वर्ड्‌स्‌वर्थच्या ' डोरा ' यांसारख्या कवितांचे अनुवाद चंद्रशेखरांनी करावयास पाहिजे होते असें मनांत आल्याखेरीज राहत नाही.

चन्द्रशेखरांची कविता विचारप्रधान असल्याचा उल्लेख वर येऊन गेलाच आहे. त्यांच्या काव्याचे विषय गंभीर असत. भावनेपेक्षा चिंतन हें त्या विषयांचें स्वरूप आहे. त्यांतहि नवविचारप्रवर्तनापेक्षा रूढ, सर्वमान्य असे विचारच समजून सांगण्याकडे त्यांची प्रवृत्ति होती. आणि त्यामुळे त्यांच्या कवितेचा कल अनेक वेळा बोधपरतेकडे झुके. संसारासंबंधीचे त्यांचे विचार जरी जुन्या पद्धतीचे म्हणजे वेदान्ती होते, तरी त्यांचें काव्य एकदरींत समाधानी वृत्तींतूनच निर्माण झालें आहे. ही वेदान्ती वृत्ति त्यांनी स्वामी रामतीर्थ, विवेकानंद किंवा शंकराचार्य यांच्या कवितेचे जे अनुवाद केले, त्यांचें कारण होय. या थोर तत्त्वज्ञांप्रमाणेच आपल्या परीने चंद्रशेखरांनी व्यवहारांतील दुःख आणि निराशा यांवर विजय मिळविला असावा, आणि म्हणूनच नवीन संप्रदायांतील अनेक कवींप्रमाणे जीवनाविषयी फारशी तक्रार त्यांनी आपल्या कवितेमध्ये केलेली नाही.

चंद्रशेखरांच्या कवितेचा सर्वांत अधिक चित्तवेधक भाग म्हणजे त्यांच्या रचनेमधील कारागिरी होय. त्यांची भाषा प्रौढ असूनहि प्रसादपूर्ण आहे. तीमध्ये पांडित्य असलें, तरी क्लिष्टता नाही. संस्कृत शब्दांनी त्यांची भाषा प्रचुर असली, तरी अपरिचित शब्दांचा उपयोग त्यांनी क्वचितच केला आहे.

शब्दांचे अर्थ कळण्याकरिता टीपा देण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला नाही. त्यांच्या कवितेंत वाङ्मयीन निर्देश भरलेले असतात. त्यांचें स्वारस्य लक्षांत यावें म्हणून केव्हा केव्हा त्या त्या ठिकाणीं टीपा द्याव्या लागतात. पण त्यांत दोष कवीचा नसून वाचकाच्या मर्यादित व्यासंगाचा असतो. प्रौढता राखूनहि प्रसाद साधण्याची कला फारच दुर्मिळ असते. तें साधलें तर वाचकाचे श्रम वाचतात, तथापि लेखकाला ते फार झालेले असतात. वाचकाला मात्र त्याची जाणीव नसते. प्रसाद आणि माधुर्य या दोनहि गुणांच्या दृष्टीने केलेली शब्दांची निवड, व्याकरणाची शुद्धता, वृत्तांची सम्यक् आणि निर्दोष योजना, यमकांचा शुद्ध आणि सहज असा विन्यास, अनुप्रासांची माधुर्यानुकूल पण संयमशील साधना या गुणांमुळे जुन्या पद्धतीने काय किंवा नव्या पद्धतीने काय, त्यांच्या कालांत तरी चंद्रशेखरांचा हात धरणारा दुसरा कोणी कवि झाला नाही. त्यांच्या काव्यांतील रचनागुणांचा उत्कर्ष त्यांच्या 'गोदा-गौरव' या सुंदर, परंतु त्रुटित काव्यामध्ये झालेला दिसतो. माधुर्य आणि गेयता यांच्या दृष्टीने आधुनिक मराठी कवितेंत यासारखें काव्य दुसरें कोणतेंहि नाही. तें वाचीत असतां जयदेवाच्या गीतगोविंदाची फार स्मृति होते. गीतगोविंदासारखें गीतगुणपूरित काव्य संस्कृतमध्ये नाही. तीच गोष्ट 'गोदागौरवा'ची मराठीमध्ये म्हणतां येईल. आपल्या 'रंगराव हर्षे' या कवि-तेंत जयदेवाच्या अष्टपद्यांचा आणि त्याच्या नादब्रह्माचा त्यांनी मोठ्या कौतुकाने उल्लेख केला आहे, आणि आपल्या 'गोदागौरवां'त तरी या आपल्या आवडत्या आदर्शाची खास बरोबरी केलेली आहे. असें हें काव्य त्रुटित राहावें, हें मराठी कवितेचें खरोखर दुर्दैव होय. परंतु तें अपरिहार्यच होतें. गोदेचा त्यांना जेवढा परिचय होता, त्यापलीकडे ते कल्पनेनेसुद्धा जाऊं शकले नसते, आणि गेले नाहीत तें बरेंच झालें. आजच्या स्थितींत त्यांत जो भावनेचा जिव्हाळा उतरला आहे, तो त्यांत आला नसता, आणि ती केवळ कारागिरी झाली असती.

चंद्रशेखर हे कवितादेवीचे निःसीम आणि निरपेक्ष उपासक होते. आर्थिक परिस्थिति अनुकूल नसतां, आपल्या कवितेचे चाहतेहि थोडेच दिसत असतां, नवीन कवितेमध्ये ती विशेष प्रिय होण्याचें फारसें चिन्ह दिसत नसतांहि, सतत चाळीस वर्षें त्यांनी तिची उपासना चालविली.

कवितादेवीला उद्देशून जेव्हा ते म्हणतात की :—

तुझ्यास्तव उपेक्षिल्या बहुविधा सुविद्या कला,
तुझ्यास्तव न तीं पदें, उपपदें मिळालीं मला;
तुझ्यास्तव न लोभतां विभवमार्ग मीं टाळिले,
तुझ्यास्तव सखे ! मला स्वजन तेहि कंटाळले,
तुझ्यास्तवचि हेलना मम गृहावधानीं घडे,
तुझ्यास्तव जनाहुनि विजन हा मला आवडे.

तेव्हा ते मनापासून आणि खरें तेंच बोलत होते यांत शंका नाही. त्याच कवितेमध्ये काव्यरचनेच्या तन्द्रीचें जें वर्णन ते करितात, तें त्यांच्या स्वत:च्या अनुभवांतून आलेलें आहे. काव्यदेवतेचा प्रसाद झाला असतां 'नाभिमूलांतून एक अनन्य लहरी उठते व ती समस्त देह व्यापून टाकिते, तिच्या प्रसरणाबरोबर देह हेलावून त्याच्या शिरांतून जणु एक विजेचा ओघ वाहूं लागतो, मुखामधून आपोआप गदगदा ध्वनि येऊं लागतो, हृदय उचंबळून येतें, डोळयांमध्ये पाणी उभें राहतें, काव्यविषयावाचून इतर कशा-चेंहि भान राहत नाही, आणि मग मनोहर रसात्मक पदावली वाहूं लागते,' अशा शब्दांनी त्यांनी आपला हा काव्यसमाधीचा अनुभव सांगितला आहे. या आनंदाकरिता त्यांनी आपली बहुतेक सारी कविता लिहिली आहे. ज्या वेळीं रात्र दशदिशांना गवसणी घालीत असे, आणि स्थिरचरावर झोप मोहिनी टाकीत असे, त्या प्रशांत वेळीं त्या लीलावती कवितेचा हा भक्त अतंद्रितपणें तिची सेवा करण्यांत गुंगलेला असे. ही सेवा करण्यामध्ये जो आनंद त्यांना होई, तेवढाच काय तो काव्यरचनेपासून त्यांना होणारा फायदा. जीवनाच्या संध्याकालांत राजकवित्वाची पदवी त्यांना मिळाली, ही त्यांच्या योग्यतेच्या आणि काव्यसेवेच्या मानाने अगदी अल्प अशीच मान्यता गणावयास हवी. अर्वाचीन कवितेच्या जमान्यांत जुन्या पद्धतीने काव्य लिहिणाऱ्या सर्व कवींत त्यांचें स्थान पहिलें होतें, आणि निरपेक्षपणें प्रस्तुत कालांतील समग्र काव्याचा विचार केला तरीहि तें बरेंच वरचें आणि स्वतंत्र आहे यांत संदेह नाही.

१५ ऑगस्ट, १९६३ — **रा. श्री. जोग**

# अनुक्रमणिका


| क्रमांक | नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | कोकिल | १ |
| २ | इतिहास | ३ |
| ३ | विपर्यास | ७ |
| ४ | मानिनी | १२ |
| ५ | स्वदेशप्रीति | १५ |
| ६ | दत्तवियोग | १७ |
| ७ | घनाभिनंदन | २२ |
| ८ | माधवनिधन | २९ |
| ९ | कविसंदेश | ३२ |
| १० | युवराजवियोग | ३७ |
| ११ | कारंजें | ४१ |
| १२ | कुंजकूजन | ४३ |
| १३ | कालार्णव | ५१ |
| १४ | कवितारति | ५२ |
| १५ | वसंतमाधव | ५८ |
| १६ | हिंदवंदना | ६८ |
| १७ | अद्भुतवीणा | ७४ |
| १८ | अश्रुकरभार | ७९ |
| १९ | महाराष्ट्र–दर्शन | ८१ |
| २० | धन्यवाद | ८६ |
| २१ | समजूत | ८८ |

| क्रमांक | नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| २२ | कविवर्य लेंभे यांची कविता | ९० |
| २३ | काय हो चमत्कार ! | ९२ |
| २४ | उत्कंठिता | १०७ |
| २५ | शारदे ! | ११० |
| २६ | प्रेमाचें संक्रमण | १११ |
| २७ | प्रेमलोद्गार | ११४ |
| २८ | कीर्ति आणि प्रीति | ११८ |
| २९ | गोदावरीचा उगम | १३१ |
| ३० | हिरावाडी | १३८ |
| ३१ | पंचवटी व तपोवन | १४३ |
| ३२ | टाकळी आणि ओढें | १४६ |
| ३३ | ओढें | १४८ |
| ३४ | आशीर्वाद | १५० |
| ३५ | कवितेचीं विलासस्थलें | १५१ |
| ३६ | गृहिणीचे डोळे | १५८ |
| ३७ | इंद्राचें स्तोत्र | १६१ |
| ३८ | मानसपूजा | १६५ |
| | काव्यपरिचयात्मक टीपा | १६९–१८१ |

* * *

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५. | १७ | स्वाटिक | खाटिक |
| ७. | १ | अमंगल द्योतक | अमंगलद्योतक |
| ८. | ६ | हो त्या | होत्या |
| १५. | १ | " Breathes there a man | " Breathes there the man |
| १५. | ३ | This is my native land!" | This is my own, my native land!" |
| १७. | २ | समेस्त्य | समेत्य |
| १७. | ५ | घाव | घाव |
| १८. | १२ | कविता रसा | कवितारसा |
| १९. | १३ | गभे | गमे |
| १९. | २१ | जेथिन | जेथिल |
| २०. | १३ | निजज्जना | निमज्जना |
| २२. | ७ | झंजावातें | झंझावातें |
| ३०. | २४ | तो | जो |
| ३५. | १ | देशाभिमान | स्वाभिमान |
| ४२. | १२ | शाश्वती | शाश्वती |
| ४४. | ११ | ह्या ओळीनंतर | कुठें आहे तव वास वसायाचा ? |
| ४८. | १३ | जी | जो |
| ४९. | १६ | व्यक्त करुनी जणुं सहृदयांतें, | व्यक्त करुनी जणुं सर्व सहृदयांतें, |

| | | | |
|---|---|---|---|
| ५०. | १० | रथ | रव |
| ५१. | ८ | ज्यापिसी | व्यापिसी |
| ५२. | ९ | वेद पारायणा, | वेदपारायणा, |
| ५५. | ६ | मनोधन | मनोघन |
| ५५. | १५ | तयाकृतिमिषें | तया कृतिमिषें |
| ५६. | १८ | हे | दे |
| ५८. | १३ | ज्वाला | ज्याला |
| ६०. | १० | तुलय सर्मः– | तुल्य मर्मः– |
| ६०. | १९ | जनजीवन हेतु | जनजीवनहेतु |
| ६३. | १० | नोहे परग, | नोहे पराग, |
| ६४. | १५ | विविष्ट | निविष्ट |
| ६८. | ४ | घन | घन |
| ६८. | १२ | बहुबिधान्न–नैवेद्य | बहुविधान्न–नैवेद्य |
| ७२. | ५ | शोक | लोक |
| ७२. | ७ | चित्रमेधांपरी | चित्रमेघांपरी |
| ७४. | १५ | चर्चा | चर्या |
| ७६. | २ न्या ओळीनंतर | | ( ५ ) |
| ७७. | १८ | सागर संगम | सागरसंगम |
| ७९. | ३ | तैं | ती |
| ७९. | ५ | विरूपितां | निरूपितां |
| ७९. | १४ | तुजसि गुणी. गुणराणी | तुजसि गुणी गुणरागी |
| ८०. | ९ | सुस्वदुःखाचें | सुखदुःखाचें |
| ८१. | ४ | धन्यश्चिन्तित वासरोऽयमुदितो | धन्यश्चिन्तितवास-<br>रोऽयमुदितो |
| ८२. | १७ | क्कचित | क्वचित |
| ८३. | ८ | तुरे, भरिति मंगलें | तुरें, भरिति मंगलें, |
| ८३. | १५ | आड्ग्लनामा | आङ्ग्लनामा |
| ९५. | १२ | शिववा | शिवब्रा |
| ९६. | ८ | ध्यास | घ्यायास |

| | | | |
|---|---|---|---|
| ९६. | १९ | तुज | तुजला |
| १०२. | ३ | आंगे; ” | आंग; ” |
| १०४. | २१ | भाग्यला | भाग्याला |
| ११२. | १३ | तेजोवल्यांतल्या | तेजोवलयांतल्या |
| ११७. | ८ | भृगांभ भृषा | मृगाभ मृषा |
| ११७. | १२ | हरिमोड | हीरमोड |
| ११८. | ५ | सास | साज |
| ११९. | २२ | छठा | छटा |
| १२७. | ५ | न दीन | नदीन |
| १२८. | १६ | प्रणायें | प्रणयें |
| १३१. | ९ | भी, | मी, |
| १३२. | ७ | ऐसा, | ऐशा |
| १३७. | ३ | पंरब्रह्मपर्दि | परंब्रह्मपदिं |
| १३७. | ३ | बुधापरी, | दुधापरी, |
| १३९. | १० | विहरीमध्यें | विहिरीमध्यें |
| १४१. | १७ | हृदयांतिल | हृदयांतिल रस |
| १४८. | ५ | पानिपताच्या | पानिपताच्या घोर |
| १५०. | ४ | विशाले क्षणेची | विशालेक्षणाची |
| १५५. | १२ | जोडण्याचें | जोडप्याचें |

अनुक्रम 36349.... वि: ..........
क्रमांक ...................... नों दि 22-2-84
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# १. कोकिल

द्रुतविलंबित.

अहह ! शब्द किती तरि गोड हा
श्रवणिं कोठुनि येत असे ? पहा
समजलों. घन आम्रतरूवरी
पिकमुखें स्रवते पयमाधुरी !
कितितरी दिसतात विहंगम;
परि जगीं न असा हृदयंगम.
दिसतसे शिखि सुंदर कां न तो ?
श्रुतिकठोर रवा परि केंकतो. २
बघुनि जो नर रूपमनोहरां
भुलतसे, मतिमंदचि तो खरा.
करिति संत पसंत विलोकुनी
गुणचि, पाहति रूप न रोंखुनी. ३
मधुर हा बहु कोकिल बोलका,
लव तरी दिसतो रमणीय का ?
परि कसा हृदयंगम जाहला
निजरवें ? विहगोत्तम शोभला ! ४
अहह ! गोड रवें तुझिया कसें
सकलही वन हें भरलें असे !

श्रुतिमनोहर गाउनि गान गा !
मधुर आम्र असा म्हणसी खगा ? ५

ऋतु वसंत पसंत किं हा असे
म्हणुनि सांगसि वानुनि फारसें ?
अमृत हें अथवा अवनीवरी
अमर या अखिलां रसिकां करी ? ६

समजलों. कटु शब्द वदोनियां
हृदय टाकिती भेदुनि जे, तयां
मधुर बोलुनि हें जग आपलें
शिकविसी करुं, सार दिसे भलें. ७

बघुनि रूप नकोस फसूं मतें !
सकल जें चमके नच हेम तें.
अढळतो गुण थोर कधीं कधीं
नर कुरूप पिकांसम त्यामधीं. ८

प्रकाशन—करमणूक.
ता. ८-५-९५.

## २. इतिहास

(१)

बा इतिहासा ! तुजला शेवटचा हा असो नमस्कार !
वाचन तुझें इतःपर नको;–मना शीण जाहला फार. १

नाना अपराध्यांच्या पारायण तें नको चरित्रांचें;
त्याहूनि आवडे बहु दास्य मला गा त्वदीय भगिनीचें. २

हे सौम्य देवि कविते ! ने, ने तव शांत मंदिरा मजला;
अपवित्र चित्रपट हा राजकुलांचा नको पहायाला ! ३

घोर रणांचीं वृत्तें, कारागृह–साध्वसे, न ऐकाया
येतील जेथ मजला ने झणिं ऐशा प्रशांत तव ठाया. ४

वृत्ति स्वाभाविक मम आनंदोत्फुल्ल तेथ होतील;
कारण, दुर्जनकृत्यें ऐकुनि का सन्मनें न शिणतील ? ५

(२)

हा हा !– वदलों ऐसें सहसा ये वृद्ध तों महाभाग,
इतिहास मूर्तिमंतचि ! आला ह्या भाषणें जया राग. ६

राहे माझ्यापुढतीं उभा, प्रभा दिव्य भोंवतीं फांके,
यद्यपि गभीर दिसली सरोष मुद्रा म्हणोनि मी धाकें ! ७

त्याची पिंगट दाढी नाभीवरि रुळतसे सदा वातें,
पांडुजटा–घुमटानें भूतकथाभुवन झांकिलें होतें. ८

तन्नयन दूरदर्शी खदिरांगारासमान त्या कालीं
होउनि, मज वाटे कीं एकसरें मेघगर्जना झाली. ९

( ३ )

रे मूढ तरुण पुरुषा ! जा, जा, !– येथूनि चालता हो जा !
सोडित उष्ण श्वासां बैसुनि राहे सदा लताकुंजां ! १०

कामी तरुण जनांच्या विविध मनोवृत्ति मूर्तिमंत, तशा
चेष्टा, अनंगलेखहि वर्णी कविता करोनि गोड अशा. ११

ज्या वाचुनि विरहार्ता रामा कामातुरा सुखें रडती,
नरसिंह रणधुरंधर जन तेही स्त्रैण–बायले घडती ! १२

( ४ )

धिक्कार असो मूर्खा ! रे यासाठींच काय मीं केलें
तव नव मन सावध्र जें अज्ञानतमामधीं असे निजलें ? १३

कौरव–पांडव–विक्रम वर्णुनि रक्तासवेंचि वीररस
अंगी खेळविला तव तो का व्हाया पुढें असा विरस ? १४

गाजी शिवाजि, बाजी, रणपटु–रघुनाथ ‘ भीमकर्मा ’ जो,
त्यांचे महत्पराक्रम निज हृत्पटिं बघुनि मन तुझें लाजो ! १५

ते हृदयावरि कोरुनि बाहु तुझे स्फुरविले सदा ज्यानें,
त्याच्या उपकाराची केलिस का फेड ह्याच वचनानें ? १६

पानिपतावरि भाऊ न्हाऊनी म्लेंछ शोणितें निजला,
विश्वासघात होतां त्यानें भाऊपणा जणों त्यजिला ! १७

हें वृत्त ऐकवोनी कोमल तव नयन साश्रु आरक्त
मीं करविले, न जाणुनि मूढा होशिल असा विषयरक्त ! १८

ह्याकरितां तुज कथितों, कृतघ्न होउनि मला न फसवावें,
परि निज कृतिनें माझे सारे तूं हेतु सिद्धिला न्यावे. १९

समरीं असंख्य पडले हळहळ ऐकोनि वाटते फार,
परि देशहिताकरितां मरणें वीरास हाच बडिवार ! २०

औरंगजेब, दुसरा बाजी, कृत्या तशीच आनंदी,
निंदुनि, शिवाजि, पहिले बाजि, अहल्यादि सुजन कां वंदी ? २१

दुर्जन निंदास्पद जरि, करिति महत्कार्य ते स्वदुश्चरितीं;
वाईटाहुनि बरवें, हीनाहुनि चांगलें उघड करिती ! २२

लोकांच्या दुष्कृतिचा दैन्याचा, करिसि जेविं कंटाळा,
तैसा स्वातंत्र्याचा प्रेमा निस्सीम बाळगीं, बाळा ! २३

तो मज पासोनि तुला मिळवाया श्रम किती बरें पडले ?
त्याचें स्मरण धरोनी कांहिंतरी चीज पाहिजे घडलें ! २४

म्हणुनि स्त्रैण रसाचा वाहे ज्यामाजि पूर त्या कविता,
संगीत नाटकेंही जळोत कादंबऱ्या, मुला आतां ! २५

रे ! तरुण देशबांधव झाले. ना शक्तिहीन तव सारे
वाचूनि पुस्तकें हीं ? तूंही धरितोस मार्ग तो कां रे ? २६

जरि आर्य–माय गाय स्वतंत्र खाटिक– करांतुनी करणें
तुजला असेल तरि मग इतिहासाचेंच पाय बा धरणें. २७

‘कवि’ पद मिळवायाची तृष्णा तुजला असेल अनिवार,
तरि ती पूर्ण कराया देतो मम सर्वसंग्रहागार ! २८

घे, हीं पूर्वजचरितें वीररसानें उचंबळों आलीं;
ह्यांच्या सुकाव्यमाला स्वदेशहितचिंतकांस तूं घालीं ! २९

प्रहरण—हरणानें तव गेला लोकांतरास विक्रम रे !
आतां जोम तरी वा दवडुं नको जो तनूंत शेष उरे ! ३०

(५)

ऐसें वदोनि झाला सहसा तेथेंच गुप्त इतिहास.
हितवाद अनुसराया पात्र असे हा मदीय बंधूंस. ३१

प्रकाशन— करमणूक.
ता. २५–४–९६.

## ३. विपर्यास

अमंगल द्योतक कार्तिकाची
होती निशा वद्य अमावसीची.
व्यापूनि गेलें नभ अंधकारें,
चकाकती भासुर त्यांत तारे. १

निवांत वातावरणांत होतें,
हेमंतशीतें निज शासनातें
आरंभियेलें जणुं गाजवाया
कठोर राजांसहि लाजवाया २

न लोटली यामहि यामिनी ती,
दे रूप तीचें तरि फार भीती;
गमे विदारोनि महामुखातें
काळी भुजंगी जग आज खाते. ३

अहो ! तिनें पुण्यपुरासभोंतीं
देवोनि काळ्या अपुल्या कनातीं,
केलें महाराष्ट्र-विभूषणाचें
स्वरूप तों फार अभद्र साचें. ४

तरू तमोवेष्टित त्या पुराचे
पाहोनि भासे गण हे भुतांचे,
होवोनिया निश्चल तिष्ठले कीं
पौरांसि न्याया यमधर्म-लोकीं. ५

तों श्वान कांहीं मिळुनी श्मशानीं
करीत कोलाहल विव्हळोनी;
लागे दिवाभीत ‘ हु हू ’ कराया,
काळास दे स्फूर्तिच संहराया. ६

किती चिता त्या क्षणिं लाविलेल्या
हो त्या किती अर्धचि पेटलेल्या;
प्रदीप्त होवोनि किती जळाया
चोहींकडे लागत ढांसळाया. ७

भासे न कल्लोळ चिताग्निचे ते,
तें मूर्तिमान् बांधवदुःख चेते;
शवास्थिभंग–ध्वनि ते न साचे,
सुहृज्जनांच्या मृदुशा उरांचे. ८

प्रकाश कांहीं, तम तेंवि कांहीं,
ज्वालाहि कांहीं, घनधूम कांहीं,
मूकत्व कांहीं, रुदनेंहि तैशीं,
स्पर्धी असें तें स्थल रौरवाशीं. ९

नांदे पुरीमाजि तया प्रसंगीं
भयाण औदास्यचि सर्व जागीं;
मध्येंच आर्त्त स्वर दे जनांतें
पुनः पुन्हां जीवितसंशयातें. १०

प्रचंडशा ग्रंथिक सन्निपातें
खड्गाचियें पाजुनि दिव्य पातें,
संपात त्याचे जहरी अहो ते
पौरावरी चालविलेच होते ! ११

ज्या ज्या जनीं घाय तयें करावा,
तो तो गतप्राणचि शीघ्र व्हावा !
पडोनि ऐसा चिरकाल घाला
किती विपर्यास पुण्यांत झाला ! १२

जें नित्यही मंडित पंडितांनीं,
रंगेल, हौसी, रसिका जनांनीं;
तें रम्य, लोकप्रिय, सर्वमान्य,
झालें पुणें संप्रति शून्य-शून्य ! १३

जें स्थान आरोग्यखनी म्हणोनी
सेवीत दूरस्थहि कौतुकांनीं,
संसर्गही आज तदीय नाशी
कुग्रामवासी मलिनां जनांसी. १४

जैं शेंवती, चंपक, मोतियाचा
आमोद तो मोदद यावयाचा,
त्या राजमार्गांतुनि गंधकाचा
दुर्गंध ये संप्रति डांबराचा ! १५

ज्या ज्या पथीं संचरितां जनांतें
विलासिनीविभ्रम दे भ्रमातें,
त्यामाजि आजी नृपदूत देती
स्वदर्शनानें यमदूत-भीती ! १६

शौकी जनांनीं उपभोगिलेले
जेथें गळावे मृदुपुष्प झेले
तेथें पथीं त्या अशुभा शुभांचीं
प्रदीप्त खंडें पडतात साचीं ! १७

द्वारें सुरंगीं शुभ तोरणांनीं
जीं शोभलीं चारु गजाननांनीं.
तीं मृत्युचीं आणि परीक्षणाचीं
भेसूर चिन्हें धरितात साचीं ! १८

ज्या मंदिरीं गानविशारदांनीं
आलाप घ्यावे मधुर स्वरांनीं,
तेथें मृतांच्या स्नित बांधवांचे
विलाप होती करुणारवांचे ! १९

दीपप्रभा ज्यांतुनि नित्य रात्रीं
विराजती तेंवि दिवा सुगात्री,
वातायनीं त्या पसरोनि जाळीं
स्वभक्ष्य आतां धरितात कोळी. २०

ज्या पाठशालांतुनि बालकांचा
अस्पष्ट पाठध्वनि यावयाचा
त्यांतूनि त्या शुद्ध उजाड होतां
भुंकार भुंगे करितात आतां. २१

नाना ऋतूंतील वसुंधरेचे
प्रसाद जैं नित्य मिळावयाचे
समृद्ध सौभाग्य असें पुण्याचें
जी ‘ मंडई ’ तीसहि दैन्य साचें २२

असंख्य टाळ्या पडुनी तयांचा
ध्वनी जिथें नित्य घुमावयाचा,
त्या नाटयशालाहि सभागृहें तीं
पाकोळिचे पंखहि नादवीती ! २३

पेठा, चवाठे विविधें दुकानें,
सुरम्य आराम, किताबखाने,
क्रीडास्थलें संचय ते जलाचे,
माहेर सारें जणुं शून्यतेचें! २४

अहो! विपर्यास असा पुण्याचा
तया महाराष्ट्र-विभूषणाचा
ऐकोनि चित्तीं भ्रम घालि घाला!
वक्षासि लक्षावधि वेध झाला! २५

प्रकाशन— करमणूक.
ता. १-१-१८.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 35369 वि:
क्रमांक नों. दि.

## ४. मानिनी

छी छी ! नको भृकुटिभंग करूं असा गे !
सुभ्रू तुझें हितचि मीं तुजलागि सांगें;
भ्रूभंग निर्दय भयंकर कर्कशेतें
शोभे न हा तुजसमान सुकोमलेतें. १

फुल्लाब्जवैभव जया नयनीं लुटावें,
त्यांतून कां कटु कटाक्ष असे सुटावे?
ह्यांनीं पती, अधिपति, नृपती तुझा हा
घायाळ होय कमलाक्षि! पहा पहा हा ! २

धिक्कारयुक्त तव नेत्रकटाक्षयोगें
चंद्राननें तव मुखासहि डाग लागे !
तेणें घडे रुचिर कांति तदीय तैशी
चंद्रप्रभा मलिन ती ग्रहणांत जैशी. ३

सौम्ये ! तुझें यशहि आकुल हो तयांनीं;
तें पुंडरीक जणुं चंड समीरणांनीं.
भ्रूभंग धिक्कृतिकटाक्ष, तरी न त्राही
ते सर्वथा अनुचित प्रियही न पाहीं. ४

वर्षाऋतूंमधील पल्वल पावसाचें.
रागेजलें वदन हें तव तेंवि साचें;
कीं अप्रसन्न, धन, अप्रिय लोचनांसी,
हेंही विशोभित म्हणोनि समान त्याशीं ! ५

राहील हें जंव धरोनि असाच राग
पाहील कांत तव कां तंव सानुराग?
साहीलही नच बघूं जरि तो अशाला
वाहील तन्मति तरी अधरीं कशाला? ६

गे! जो तुझा पति, तुझा प्रभु, जीव दूजा,
जो रक्षिता, प्रमुख जो अधिराज तूझा,
जो काळजी निशिदिनीं तव जीविताची
वाही तशीच तुझिया उपजीविकेची; ७

राहोनि निर्भय गृहीं स्वसुखासनातें
आराम तूं करिसि मानिनि! शांत चित्तें,
तेव्हां हिमातपहि सोसुनि वारिधारा
जो कष्टवी तव सुखास्तव देह सारा; ८

प्राणेश तो श्रमुनि येउनिही अगारीं
न प्रार्थितो तव करीं करभार भारी;
प्रीती सुधामधुर नेत्रकटाक्ष आणि
आज्ञानुवर्तन, तयास असे शिराणी! ९

देतो उदंड ऋण तो तुज जें तयाचें
आनृण्य हें किति किती तरि अल्प साचें!
त्याच्या अनंत बघतां उपकारराशी
कांहींच हा विनिमयो न गमे तयाशीं १०

राजासि आदर जसा सकल प्रजेनें
देणें तसाच पतिलाहि कुलांगनेनें;
उच्छृंखला, पिशुन, खिन्नमुखी सदाही
जी कर्कशा, खचित ती गृहिणीच नाहीं! ११

इच्छेनुरूप पतिच्या न च आचरे जे
लोकीं ‘ कलत्र ’ पद हें तिजला न साजे;
वाटे उदार, अनुरक्त अशा पतीतें
निर्लज्ज, कुत्सित, कलिप्रिय वैरिणी ते ! १२

जेथें अहंमति झुगारुनि ऐक्यभावा
साधावयास गृहिणीजन लीन व्हावा,
तेथें विरोध करितां बघुनी तयातें
त्याच्या विमूढ मतिची मज कींव येते ! १३

जेथें स्वयें वचनतत्परता धरावी,
आराधनाचि अनुरागभरें करावी,
तेथें प्रभुत्व अधिकारहि गाजवाया
कां इच्छितात न कळे अबला मला ह्या ! १४

जी स्निग्ध आणि सुकुमार तनू स्त्रियांची
पद्मांतरंग–उपमा धरि सार्थ साची,
पाषाणसाम्य हृदयांत तिच्या बसावें
ह्याहूनि लांछन निकृष्ट कसें असावें ! १५

प्रकाशन–मनोरंजन, वर्ष- ३
एप्रिल–मे १८९८.

## ५. स्वदेशप्रीति

" Breathes there a man with soul so dead,
Who never to himself hath said
This is my native land ! "

Sir W. Scott.

जित्रंतमृत भूवरी कुणि असेल का हो असा?
महाकुलकलंक, जो सकल मानवांही तसा!
स्वदेश, – निज जन्मभू, – कधिं न बापुडा जो स्मरे;
मनींहि अथवा न घे कधिं तदीय नामाक्षरें! १

फिरोनि परदेश जो कुशलरूप जातां घरा,
स्वदेश बघण्यास हो मनिं जरा नही हांवरा;
असेल तरि का असा नरपशु कुठें भूवरी,
अवश्य तरि जा, पहा निरखुनी तया सत्वरीं! २

पदें उपपदें महा मिळुनि नामकंथा भली
विशालहि, खुशाल त्या जरि नराधमें वाहिली,
करीं जल भरी जरी सतत इंदिरा मंदिरीं—
तदीय तरि ती खरी क्षणिक तत्सुखाची सरी. ३

वृथा उपपदें, पदें नवनिधीहि त्याचे वृथा!
वृथाचि अधिकार तो सकल मीपणाही वृथा!
जितां मृतचि तो असे, विमल कीर्तिला पारखा,
रजामधुनि जन्मला, पुढति ही रजांचा सखा! ४

न शोक करण्यास तो विषय, मान द्याया न तो,
न काव्यरचनास तो विषय गान गाया न तो !
निरर्थकचि जन्मुनी, विकिरवत् जिणें नेउनी,
अधोमुखन जोडुनी, तनुस जाय तो सोडुनी ! ५

प्रकाशन—करमणूक.
ऑगस्ट १८९८.

## ६. दत्तवियोग

“ यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ ।
समेत्य च व्यपेयाताम् तद्वद्भूतसमागमः ॥ ”

कुटुनियां कटु कंटक कल्पना,
प्रसवतुल्यहि सोसुनि वेदना,
करुनि घाव पदावयवांवरी,
घडिति अक्षरबंध कसा तरी ! १

कविकुलास कलंक असे किती
धरणिधूलिमधीं खळ लोळती !
म्हणविती कवि ते जरि आपणां,
तरि म्हणूं करिती जनवंचना ! २

स्वकृतिनें परि जो जन भारती
सजवितो जणुं कीं दुसरी रती;
त्यजुनि अन्य विचार तयास मी
कवि म्हणोनि सदा शिरसा नमीं. ३

जरि तदीय समागम हो मला
तरि म्हणेन सुरेश्वर लाभला !
परि असा कवि या वसुधेवरी
झळकतो विरळाच कुठें तरी. ४

मग तदीय समागम–लाभ तो
मजसि संतत कोठुनि लाभतो ?
परि अहो ! कविरत्न असें भलें
सुकृतिनें सहजीं मज लाभलें ! ५

समजलों किति धन्य तदा मला !
अमित हर्ष किती मज जाहला !
त्यजुनियां कितिदां व्यवसायही
धरुनि ती बसलों कविता–वही. ६

विकसतांच सरोज सरोवरीं,
मधुप तो लुटितो मधुमाधुरी ;
सरस दत्त कवीसह मी तसा
सतत सेवितसे कविता रसा. ७

सकल मोह जगांतिल त्यापुढें
मग अम्हां गमले तृण बापुडे !
न कविता परमामृत-सेवनीं
न कळतां सरल्या दिनयामिनी ! ८

सुख मिळेल सदैव असें मला
ग्रह असाच मनें मम घेतला ;
तंव अहा ! कटु काळ निशामुखीं
श्रवणिं दंश करी, जणुं वासुकी ! ९

समजलें विषमज्वर येउनी
कवि पडे अति निश्चल होउनी !
संवगडी विषमामधिं सांपडे,
परि तयांतिल मोह मला घडे. १०

द्रुतविलंबित जाउनि भेटलों,
प्रकृति पाहुनि दुःखित जाहलों;
परि असाध्य न ती दिसली मला
कविसखाहि हताश न जाहला. ११

दिसुनि उज्ज्वल मालवितो दिवा,
दिसुनि रुग्ण वरा; मुकतो जिवा;
उतरला ज्वर यद्यपि भासला
तरि पुन्हां अनिवारचि वाढला! १२

कठिण लोह जरी अति तापुनी
पडतसे मृदु भस्मचि होउनी;
तरि शरीरकथा मग ती किती?
कवितनू पडली अवनीप्रती. १३

बघुनि तें, मम देह गमे मला
क्षणभरी मृततुल्यचि जाहला!
पडुनि अंधतमीं जडभावना
जणुं घडे तनुलाहि तशी मना! १४

फिरुनि रोम तनूवरि ऊठले,
खळखळां नयनीं जळ लोटलें;
धडकला घनघाव उरावरी,
करपलें मृदु काळिज अंतरीं! १५

सकळ जेथिन तेथ झुगारुनी,
सवगडी विरहानलिं लोटुनी,
कविसख्या! परलोकचि तो भला
वद कसा सदया रुचला तुला! १६

उडुनि उंच नभीं तव कल्पना
चकित गा ! करिते मम लोचनां ;
विविधशा विषयीं तुझिया कृती
मज मयूरकलापचि भासती ! १७

'बघसि अंत किती तरि राजसे, '
मधुर 'कोकिलकूजित' ही तसें ;
सरस 'मुग्ध' अशी 'कलिका' हि ती,
वदुं अशा मधुरा कविता किती ! १८

श्रुतिमनोहरसा कवितौघ तो
विमल गांगजलासम वाहतो ;
कुणिहि जो रस त्यांतिल चाखतों
अनुभवी अमृतानुभवास तो. १९

करुनि त्यांत सदैव निजज्जना
परम हर्ष घडे रसिकां जनां ;
परम वस्तु निरंतर सेवुनी
परम हर्ष कसा नुपजे मनीं ? २०

सुरवधूहुनि मंजुळ बोलकी,
तव सतार अतां धरि मौन कीं !
सवत-बोल वरी रुचले तुला,
म्हणूनि ये रुसवा जणुं कीं तिला ! २१

धरिसि तूं पदवी तरि तूजला
दुरभिमान तिचा नच जाहला ;
सुजनता रसिकत्वहि लीनता,
भरतभूविषयीं अनुरागिता ; २२

गुण अमोल असे किति आठवूं ?
विरह शोक कुठें तव सांठवूं ?
अतिसुखासचि जे गुण कारण,
करिति संप्रति वक्षविदारण ! २३

जलनिधीमधिं एक दुजास तें
मिळुनि काष्ठ फिरोनि दुरावतें,
बघुनि त्यासम संगम आपुला
अति हताशचि हा जन जाहला ! २४

परि असो जंव राहिन भूवरी,
तंव तुझ्या कवितेंतिल माधुरी
सतत सेवुनि मानिन धन्यता;
कवियशें मज भेटत जा अतां. २५

कविवरा धरिसी निज अंतरीं
प्रणय उत्कट ज्या कवितेवरी,
सुरपुरींतहि ती अधिदेवता
कविपदस्थ करो ! तुजला अतां २६

तुजवरी कविमान–परंपरा
सतत वर्षुनि कीर्ति निरंतरा,—
सुखद शाश्वत शांति मिळेहि ती
मुनि जिला परमार्थचि मानिती. २७

प्रकाशन–सयाजीविजय
१८९९ (मार्च); काव्यदोहन.
दत्तांची कविता. १९२२.

मराठी ग्रंथ सं... ...ळगत.
अनुक्रम ...३६३८१... ... वि: ... ... ......
क्रमांक ...................... नों दि २२-११-६...

## ७. घनाभिनंदन

" जल्दसमय एषः प्राणिनां प्राणहेतु : "

— कालिदास.

( शिखरिणी )

अहो आला आला ! नवजलद हा अंबरपथीं,
बसोनी वायूच्या अतिचपल-वेगोयुत रथीं ;
पहा ! नानारंगी विकट धनु त्याचें विलसतें,
विजेची ही दोरी फिरफिरुनि झंकार करिते. १

महानादें ज्याच्या सकलहि नभोमंडल कसें
दणाणोनी गेलें झडुनि रणवाद्यें रण जसें
उडे झंजावातें अपरिमित धूली दशदिशां,
तयानें त्या जैशा दिसति करिणी कोपविवशा. २

खळा दुष्काळाशीं करुनि घनघोरा ऽ जि घन हा
तया संहारूं ये जणुं जमवुनी सैन्य-निवहा ;
क्षणामाजी त्यानें उदयगिरि कावीज करुनी,
नभोमध्य-प्रांतीं गडबड दिली कीं उडवुनी ! ३

समुद्राऐशी ही तुमुल चमु ज्याची चहुंकडे
किती वेगें व्यापी गगन, लवही ठेवि नुघडें ;
प्रचंडा मार्तंडाप्रतिहि सहसा घेरुनि वळें
तिनें त्याचें केलें हरण बहुधा तेज सगळें. ४

घनच्छायायोगें कितितरि चमत्कार घडला
        पहा कीं सृष्टीचा अवचित जणों नूर फिरला;
पदार्थांची कांती नयनसुभग श्यामल दिसे,
        तयामध्यें कांहीं नवलपरिचा हर्ष विलसे ! ५

विझोनीयां आहे प्रखर खदिरांगारसम ते,
        किती आतां वातावरण तनुला हें सुखवितें !
जणों कीं वायूला जलदगुरुनें आज अपुली
        जगाच्या तापातें शमन करुं दीक्षाच दिधली. ६

घनाच्या ध्यानानें जग निजपणातें विसरलें,
        म्हणोनी तें भासे जलधरसम श्याम बनलें;
निवाराया आला जलद निजसंताप म्हणुनी
        उडोनी ग्लानी ये सहजचि नवोत्साह भुवनीं.' ७

दयासिंधो मेघा ! अघटित तुझा होय महिमा,
        नसे ठावा त्यांचा कुठुनि वदवे तो मग अम्हां ?.
तुझ्या छायामात्रें घडति जरि ह्या अद्भुत कृती,
        तरी वृष्टी होतां कृति मग घडेना कवण ती ! ८

विचारोनी पाहे जरि तव महौदार्य तरि, तो
        पती भूगोलाचा कृपणहि दरिद्रीच दिसतो;
तुझ्या श्रीमंतीचा किमपि मिळतां अंश नृपती
        जगामध्यें श्रीमान् म्हणुनि बहु डौलें मिरविती ! ९

धनाची धान्याची अवनिवरि होणें विपुलता,
        तसें सर्वांभूतीं कुशलहि निजोद्योगवशता,
मनःशांती, राष्ट्रोन्नति, सुख, समाधानहि जनीं,
        कृपेची हीं तूझ्या विलसति फलें भव्य भुवनीं. १०

मराठी ग्रंथ संग्रहालय ... अनुक्रम ...३६३८१...... वि: .. ..........
क्रमांक ...................... नों दि: २२-११-६

## ७. घनाभिनंदन

" जल्दसमय एषः प्राणिनां प्राणहेतु : "

— कालिदास.

( शिखरिणी )

अहो आला आला ! नवजलद हा अंबरपथीं,
बसोनी वायूच्या अतिचपल-वेगोयुत रथीं;
पहा ! नानारंगी विकट धनु त्याचें विलसतें,
विजेची ही दोरी फिरफिरुनि झंकार करिते. १

महानादें ज्याच्या सकलहि नभोमंडल कसें
दणाणोनी गेलें झडुनि रणवाद्यें रण जसें
उडे झंजावातें अपरिमित धूली दशदिशां,
तयानें त्या जैशा दिसति करिणी कोपविवशा. २

खळा दुष्काळाशीं करुनि घनघोरा ऽ जि घन हा
तया संहारूं ये जणुं जमवुनी सैन्य-निवहा;
क्षणामाजी त्यानें उदयगिरि काबीज करुनी,
नभोमध्य-प्रांतीं गडबड दिली कीं उडवुनी ! ३

समुद्राऐशी ही तुमुल चमु ज्याची चहुंकडे
किती वेगें व्यापी गगन, लवही ठेवि नुघडें;
प्रचंडा मार्तंडाप्रतिहि सहसा घेरुनि बळें
तिनें त्याचें केलें हरण बहुधा तेज सगळें. ४

घनच्छायायोगें कितितरि चमत्कार घडला
पहा कीं सृष्टीचा अवचित जणों नूर फिरला;
पदार्थांची कांती नयनसुभग श्यामल दिसे,
तयामध्यें कांहीं नवलपरिचा हर्ष विलसे! ५

विझोनीयां आहे प्रखर खदिरांगारसम ते,
किती आतां वातावरण तनुला हें सुखवितें!
जणों कीं वायूला जलदगुरुनें आज अपुली
जगाच्या तापातें शमन करुं दीक्षाच दिधली. ६

घनाच्या ध्यानानें जग निजपणातें विसरलें,
म्हणोनी तें भासे जलधरसम श्याम बनलें;
निवाराया आला जलद निजसंताप म्हणुनी
उडोनी ग्लानी ये सहजचि नवोत्साह भुवनीं.' ७

दयासिंधो मेघा! अघटित तुझा होय महिमा,
नसे ठावा त्यांचा कुठुनि वदवे तो मग अम्हां?.
तुझ्या छायामात्रें घडति जरि ह्या अद्भुत कृती,
तरी वृष्टी होतां कृति मग घडेना कवण ती! ८

विचारोनी पाहे जरि तव महौदार्य तरि, तो
पती भूगोलाचा कृपणहि दरिद्रीच दिसतो;
तुझ्या श्रीमंतीचा किमपि मिळतां अंश नृपती
जगामध्यें श्रीमान् म्हणुनि बहु डौलें मिरविती! ९

धनाची धान्याची अवनिवरि होणें विपुलता,
तसें सर्वांभूतीं कुशलहि निजोद्योगवशता,
मनःशांती, राष्ट्रोन्नति, सुख, समाधानहि जनीं,
कृपेची हीं तुझ्या विलसति फलें भव्य भुवनीं. १०

वहू कां बोलावें ? सकलहि जगत्-जीवन घना !
तुझ्या आधीनत्वें खचित असतें विश्वशरणा !
जगज्जेता, तोही जरि तव कृपापांग न मिळे,
तरी दीना मीनासमचि निरुपायें तळमळे ! ११

कृपा जेथें तूझी विलसत असे श्री जणुं तिथें,
न ती जेथें ऐसें स्थल दहनभूमीच गमतें;
असे ह्याचा घेणें अनुभवच कोणासहि जरी,
विलोकावी तेणें तरि भरतभू ह्या अवसरीं. १२

असो पाषाणानें हृदय मग त्याचें बनविलें,
स्थिती ही पाहोनी फुटतिल तया पाझर भले !
तुझ्या ऐसे मेघा असति जन जे आर्द्रहृदयी,
तयांतें येईल द्रव मग न कां ह्याहि समयीं ? १३

कृपापारावारा ! तरि न लवही लाव अवधी,
अतां ओती ओती मधुमधुरसा तो जलनिधी,
पहा गेल्या साऱ्या सुकुनि सरसी आणि सरिता,
वियोगें भर्त्याच्या झुरुनि झुरुनी जेंवि वनिता. १४

जयांच्या पर्णांतें खुडुनिच बहू जीव जगले,
परी आतां ज्यांच्यावरि चुकुनिही पान नुरलें,
वनामाजीं ज्यांतें रसरहित निष्पत्र बघुनी,
मुनी वाटे गेले खरतर तपानेंच सुकुनी; १५
अशा या वृक्षांचे वनपवन विस्तार हलवी,
जणों त्या योगानें तरुगण असा भाव कळवी;
अगा मेघा ! ये ये, करि अमृतवृष्टी क्षितिवरी,
मृतप्रायां लोकां निववि जिववी तूं झडकरी. १६

असंख्यातें शेतें जणुं पडित भूमीच पडल्या,
नव्हे दैना त्यांनीं निज तुज बघोनी उघडल्या;
असंख्याता धेनू, वृषभ, महिषी, आदिकरुनी
पशू जें राष्ट्राचें धन निधन ने त्यांस हरुनी ! १७

तयांचे सांगाडे सडसडुनि वातावरण हें
महा दुर्गंधानें भरुनि जनतेला नच सहे.
किती अस्थी चर्में विकुनि परदेशीं दवडिलीं,
तरी जागोजागीं गिरिसम नवी रास पडली. १८

क्षुधेनें तृष्णेनें कळवळुनियां कर्षक किती,
परागंदा झाले त्यजुनि वतनें आणि घरटीं ;
किती खेडीं गांवें विजन बनुनी तेंवि दिसती
जशीं चैतन्याच्या विरहित शरीरेंच नुसतीं ! १९

किती अल्पें मोलें दिनभरि महाकष्ट करिती,
कदान्नानें तेव्हां किमपि जठराग्नी शमविती ;
कितेकांहीं कांहींतरि उदरगर्तेंत भरुनी
युगा ऐसे नेले दिवस नयनीं प्राण धरुनी ! २०

किती दारोदारीं क्षुधित फिरती थोर नगरीं,
परी त्या सर्वांचें पुरजन कसा पोषण करी ?
पती पत्नी टाकी, विकिति किति माता स्वतनुजां !
क्षुधा प्रेमाचाही खचित हरिते सर्व गमजा. २१

क्षुधा, तृष्णा, व्याधी, प्रखर रविचा ताप वरुनी
अनर्थांहीं ऐशा मरति बहु गेलेहि मरुनी ;
तयायोगें आतां भरतवसुधा ही दिसतसे,
दवाग्निज्वालांहीं हुतवन विषादास्पद जसें ! २२

अशा दग्धारण्यामधिं अझुनि जे जीव जगती,
उदारा ते सारे निशिदिनिं तुझा ध्यास धरिती ;
तयातें सर्वांतें तशिच मजला जी दृढतरा
महोत्कंठा लागे किमपि कथितों ती जलधरा ! २३

( पृथ्वी )

कदा नव जलें तुझीं वरसतील पृथ्वीप्रती ?
कदा नद-नद्यांतुनी उचमळोनि तीं धांवती ?
कदा तरि वनस्थलीं चमकतील पाचेपरी ?
जलार्द्र पवनें कदा डुलति रे तरू वल्लरी ? २४

सुतुंग गिरिच्या शिरीं सजल मेघमाला कदा
करोनि अवलंबना वरसतील धो धो सदा ?
कुडे, पळस, कंदली विविध जातिच्या औषधी
तुवां सतत न्हाणितां हरितशा बघे मी कधीं ? २५

कडयावरुनियां उड्या धडधडां पयें टाकिती,
करोनि गुरुगर्जना निकट--देश नादाविती,
दुधापरि जलौघ ते मज पहावयातें कदा
उदंड मिळतील गा फिरुनियां उदारांबुदा ! २६

वना उपवनांतल्या भिजुनि भूमि वर्षाजलें
तयावरुनि सांचती चहुंकडे कदा पल्वलें ?
यथेष्ट जल त्यांतलें पिउनि, पूर्ण आनंदुनी
विनोदपर केधवां निघति दर्दुरांचे ध्वनी ? २७

प्रसन्न तरुकोटरीं कुणि तदीय शाखांवरी
विहंग जणुं न्हाउनी बसति हर्षुनी अंतरीं ;

पिसें करिति चंचुनी विमल, सुस्वरें कूजती,
अशे खग, असे तरू, मज पुन्हां कदा दीसती ? २८

कदा बकुल, चंपही फुलुनि केतकी, मोगरे,
गुलाब, निशिगंध, तद्विविध गंध तो विस्तरे ?
प्रसन्न कमलें कदा निज पराग तीं गाळिती ?
कदा मधुप तन्मधू लुटुनि घ्यावया धांवती ? २९

कदा बहर येउनी विपुल पारिजातांवरी
तदीय मधु गंध तो दरवळेल रे अंबरीं ?
तदीय सुमनास्तरें हरित भूमि ते झांकतां
फुलें टिपुनि घ्यावया निघति केधवां योषिता ? ३०

नवीन तृण खाउनी, तत्र नवामृत प्राशुनी,
रवंथ करिती सुखें हिरवळीवरी बैसुनी ;
सुतुंदिलवपू असे वृषभ, धेनुही वत्सला,
फिरोनि मिळतील गा कधिं तरी बघाया मला ? ३१

अकिंचन कृषीवलां मिळुनियां तगाई–धनें,
तसें वृषभ, बीज हीं कृषि करावया साधनें,
फिरोनि इरलीं शिरीं गरम घोंगड्या घालुनी
स्वकर्मरत ते असे कधिं बघेन शेतांतुनी ३२

यदा मग कमोद ते लवुनि आपुल्या लोंगरें
प्रमोदकर मानसा वितरितील आमोद रे,
अनेकविध शस्य तें चहुंकडेहि जोमावुनी
तयें नयनरम्य ही फिरुनि हो यदा मेदिनी, ३३

फिटेल अमुची तदा सकळ पांग, जी संप्रती
अम्हांस बहु वृश्चिकासदृश दशुनी जाचिती ;

स्वबंधुजन सर्व हा प्रगतिच्या पथा लागुनी
स्मरेल सुख सेवितां त्वदुपकार रात्रंदिनीं. ३४

तरी, अयि दयानिधे जलधरा ! अतां सत्वरीं
सुखप्रद अम्हांवरी सतत साउली तूं करीं;
करीं अमृतवृष्टि तूं लवकरी धरित्रीवरी,
तुझ्याविण कुणी नसे इतर जो अम्हां उद्धरी. ३५

मयूर जयघोष हे बघ तुझा करूं लागले !
अनाथ निज लोचनीं स्रवति शीतलाश्रू–जलें !
समस्त जन चातकापरि घना तुला पाहतो !
उदीरितजयस्वनें गगनमंडपीं वाहतो ! ३६

प्रकाशन—सयाजीविजय
ता. १०-६-१९००
इंदुप्रकाश व करमणूक.

## ८. माधवनिधन

"O good gray head which all men knew,
O voice from which their omens all men drew,
O iron nerve to true occasion true,
O fallen at length, that tower of strength,
Which stood four-square to the winds that blew."

—Tennyson.

अहो ! दिन असोनि हा विबुधसूर्य कां लोपला ?
अहो ! चहुंकडे तमःपट असा कसा व्यापला ?
अहो ! विकट कंदरापरि मुखास वासोनि, हा !
अकांड करि तांडवा असुर होय कीं काळ हा ? १

विडंबुनि जगास तो भयद हांस कां हांसतो ?
उगारुनिहि फांस तो कवण त्या जना फांसतो ?
अहा ! समजलेंचि, तो पतन होय मुंबापुरीं
तया सुनयपालका विबुध माधवाच्या वरी ! २

अहो ! हृदय भेदलें, बधिर कर्ण हे जाहले,
अहो ! शिथिल हो तनू मन विमोह कीं पावलें.
अहो ! नयन ढाळिती कढत अश्रुधारा महा,
अहो ! भरतभूवरी पवि-निपात हो काय हा ? ३

जनांस नय दे सदा सरल रामशास्त्री जसा,
तया अदय काळ हा अनय दे कसा हो असा !

स्वदेश-शिवसाधनीं जणुं मृकंडुचा नंदन,
अशास धजला कसा यम करावया बंधन ? ४

महाधम यमा ! तमा तुजसि का कशाची नसे ?
हिरेहि जणुं कोळसे म्हणुनि जाळिसी तूं कसे !
अदंड्य जन दंडितो मद उदंड तो दावुनी,
न 'दंडधर' षंढ तो मज गमे म्हणावा जनीं. ५

जयें सकल जन्महीं दृढ सरस्वती सेविली,
जयें न तदुपासनीं निज तनुक्षिती ठेविली,
जयें सुरगुरूपरी सरस भाषणें बोलुनी
अनेक समयीं दिले बुधसमाज आंदोलुनी ; ६

पडोनि मतभेद जो प्रबल केसरी संगतीं
लढे प्रणयलीलया, बुध जया रणीं रंगती,
स्वनंदनवनास तो परततां दुजा केसरी,
कुणासह बरोबरी करिल हो अतां केसरी ! ७

स्वबांधवसुधारणा-पथ जयें सदा दाविले,
तयांस 'परिषद्' मिषें प्रणयबंधनीं गोविलें,
सुधारक-जनाग्रणी वश परास तो झालिया,
पुन्हां अवलिया तसा कवण ये पुढें व्हावया ! ८

अनाथ अबला, तसे अमित शिष्यही दीनसे,
निजाश्रय उदार जो किमपि त्याजला देतसे,
अनेकविध पुस्तकें, सदुपयुक्त संस्था तशा,
जणों सुतसुताचि जो धरि करांत सप्रेमशा ; ९

स्वकीय मधुरा गिरा चलित विश्वविद्यालयीं
करा ! म्हणुनि गर्जला बुधजनांत तो अक्षयीं,

असा तनुमनें धनें प्रगतिला स्वभाषेच्चिया
असे सतत वाहिला, मरण हाय ! आलें तया. १०

अहो ! खळबळोनि ये हृदय, कांपते लेखणी,
गळे तरि खळे न हें जळ मदीय नेत्रांतुनी,
लिहोत लिहिणार ते बहुत ह्यावरी चांगलें,
अजाण जन बोललों किमपि जें मनीं वागलें. ११

परंतु न सुचे मला अधिक ह्याहुनी संप्रति,
असे विनति मात्र जो सकल शक्तिमान् त्याप्रतिः-
जसें गुणनिधान भो प्रभु ! हरोनि नेलेंस तें,
तसें परत आणुनी त्वरित देइं तूं आमुतें. १२

भरतभुवनीं राहोनी जो स्वकीयगुणें तिला
सुरभुवनिंची शोभा द्याया सदैव झटे मला,
गुणिजन असा कां नेलासी प्रभो गुणसागरा !
सुरतरुपरी भूलोकीं तो असो शशिशेखरा ! १३

प्रकाशन—सयाजीविजय
फेब्रुवारी, १९०१.

## १. कविसंदेश

( १ )

देवी सरस्वतीच्या प्रिय नंदनहो ! तुम्हां असो नमन.
हा देह दूर आहे तुमच्या संमेलनीं असोन मन.
प्रत्यक्ष तूमच्या हा समागमाच्या सुखास अंतरला,
हरला उपाय यद्यपि, याचा वाटे महा विषाद मला.

संसारांतिल कोडीं सोडवुनी युक्तिनें तुम्हीं आलां,
एकत्र पुण्यनगरीं–सरस्वतीच्याच मंदिरीं-झालां.
संमीलित विद्वानीं खचित महाराष्ट्रदेश–भाषेला
न्यायास उन्नतीतें बहु दिन यत्न-प्रयत्नही केला.

आतां तिची समुन्नति व्हावी, करितां म्हणूनि आयास,
हेतु प्रशंसनीयचि अनुमोदन हें मदीय हो त्यास.
स्वीकृत कार्यामाजीं असणारीं संकटें निवाराया
योजालचि सदुपायां, सांगू अल्पज्ञ काय मी वायां ?

तरि जो चिटनीसांच्या विनंतिपत्रें मनास आठविला
संदेश एक तो हा, विनयप्रेमासमेत पाठविला.
तो सावधान ऐकुनि होइल कांहीं विचार त्यावरतीं
तरि मग आनंदाची भरती येइल मना अनावर ती.

( २ )

अर्वाचीन कवींचा आदर नाहीं. नसो ! परी लोकीं
त्यांच्याविषयीं संप्रति अनुकंपाही नसेच अवलोकीं !

संभावना तयांची दुसरी ऐकूं न येतसे खास ;
परि गरलासम टीका, व्याजस्तुति, वा यथेष्ट उपहास !
प्राचीन कवींपासुनि कोणी लागति पिढ्याच तोडाया
अर्वाचीन कवींच्या, पिढ्या न वाटे उरेंच फोडाया !
वर्तवितात भविष्यहि कोणी जोशी असें खुलाशाचें
कीं, कवि सांप्रत कालीं पूर्वींच्या सारखे न व्हायाचे !
अर्वाचीन कविवरि साक्षर वर्गांतले अभिप्राय
यापरि सांगुनि, वदतों तद्विषयीं मजसि वाटतें काय.

(३)

कवि, तत्त्वज्ञहि, पंडित, कलानिधी, राजकारणी, वीर,
धर्मज्ञ आणि योगी ह्यांचें हें भरतखंड माहेर.
गुण भूमीचाच या कीं, नरमणि हे तिजमधूनि निपजावे,
त्यांनीं निज किरणांनीं अन्यांचे नयनसंघ दिपवावें.
निर्मुनि कुसुमित वन तें, भ्रमर जरी घातला न जन्माला,
फुलवुनि रसाल, कोकिल न निर्मितां दोष ये विधात्याला.
माझा समानधर्मा होइल निर्माण भूवरी कालें,
सिद्धान्तवाक्य ऐसें कानीं भवभूतिचें न कां आलें ?
भासादि कवि पुरातन, ह्यांच्या कृतिचा धरोनि अभिमान,
जन मम नव वस्तूचा बहुधा करितील आज अवमान ;
प्रारंभीं ही शंका आली ह्या तरुण कालिदासाला,
तोच महाकवि, – नोहे सर्व कवींचा शिरोमणी झाला.
तोच पुरातन नूतन काव्यांविषयीं अपक्षपातानें
काय अभिप्राय पहा लिहितो निज नाटकांत हातानें :–


स्थळप्रत. २२

प्राचीन म्हणुनि जितुकें तितुकें नामी न सर्व मानावें,
केवळ नवीन यास्तव न काव्य लोकांत निंदिलें जावें.

अर्थात् परंपरेनें पूर्वकवींची धरोनियां कांस,
एकसहा नव कविंचा न करावा केधवाहि उपहास.

कविराज, राजयोगी, राजगुरू, हे स्व-' दासबोधां '-त
" आतां आहेत, पुढें होणार, " कवी तयांस नमितात.

ह्यावरुनि सिद्ध होतें, स्वामींच्या मानसा विकार नसे,
समकालीनहि भावी कविंविषयीं तन्मनांत मान वसे.

" होणार " पदावरुनी स्वामींची निश्चयोक्ति समजावी.
' कवि होणें शक्य नसे ' भ्रामक वचनें अशीं न बोलावीं.

यत्काव्य-गायनानें सारा बंगाल आज हालविला,
अर्वाचीनचि कवि तो मग कां पंक्तींतुनी न घालविला ?

जरि वंगांत निपजला, न महाराष्ट्रांत काय निपजेल ?
' कवि होणें शक्य नसे ' अविचाराचेंच वाक्य साजेल.

आशीर्वाद समर्थें दिला न तेथें कदा निराशा हो ;
तद्वचन सिद्ध, तैसा सिद्ध न होईल आमुचा टाहो.

पाश्चात्य कल्पनांनीं नवकाव्या लागलें नवें वळण,
मुरल्या न कल्पना त्या, गमेल नवकाव्य तोंवरी दळण.

जेव्हांहि कल्पना त्या कविहृदयांमाजि पूर्ण पचतील,
तेव्हां अधिक मनोहर नवीन रचना कवीहि रचतील.

संप्रति भाषावृद्धी, होत असे नव्य-कल्पनापचन ;
ऐशा स्थितींत कविला कां बोलावें उगीच कटु वचन ?

ज्या काव्यानें लोकीं तुडुंबुनी देशाभिमान राहील,
ज्या काव्यानें त्यांच्या देहीं देशाभिमान वाहील,

ज्या काव्यानें द्वैतें जन-हृदयांतून शीघ्र ओसरती,
ज्या काव्यानें येते ऐक्यरसाची तया महाभरती,

ज्या काव्यानें मोठे मोठे प्रतिबंध तेहि फोडून
ती संघशक्ति धो धो वाहे सीमा स्वकीय सोडून;

ज्या काव्यानें उसळति ह्या शक्तीचे तरंग मोठाले,
देशोद्धार–सुधाकर मग आकर्षी तया उचित काळें.

ऐशीं उदात्त, उज्ज्वल, काव्यें केवळ अहो! समाधीनें
साध्य कवींना होती; परि नच ते ग्रासल्यास आधीनें.

कविचा आधी दुसरा अठराविश्‍व्याशिवाय काय असे?
तो जन्मसिद्ध त्याचा! कविताशक्ती जशी तयांत वसे.

निरसन या आधीचें राजाश्रय एकला करूं शकला;
परि त्या समाश्रयाला कविजन हतदैव आजला मुकला!

आतां, रचावया कवि बसेल केवलसमाधिची कविता,
तोंवरि लोकाश्रय तरि आहे का हो तयास वांचविता?

नुसती सहानुभूती नाहीं! आश्रय कशास बोलावा?
टीका उपहासांनीं उलटा तत्पृष्ठभाग सोलावा!

काबाडकष्ट दिनभर करोनियां रुक्ष अन्न जेवावें,
रात्रींहि जागुनी निज कवितांनीं देशबंधु सेवावे,

आणि तयांचा विनिमय घ्यावा पूर्वोक्त बांधवांकरवीं;
किति कठिण ही कसोटी! तुमच्या हृदया न काय पाझरवी?

बोलाहो ! बोलाहो ! स्थिति ही अनुकंपनीय कां नाहीं
अर्वाचीन कवींची ? ऐकुनि सोडूं नकाच कानांहीं

संप्रति अवर्षणानें, तापानें कोळपून जे गेले,
त्या पारिजातकांवरि फुलतिल वर्षाऋतूंत हो झेले !

जायां करूं नका हो ! हिमकालीं खुंट हे प्रहारांनीं;
लवतिल हेच वसंतीं द्राक्षाच्या गोड गोड भारांनीं !

शैलोशैलीं माणिक, गजोगजीं जरि न जाहलें मोतीं,
सर्वत्र साधु, चंदन नसले, तरि ते मुळीं न का होती ?

ह्याच कवींतुनि कोणी प्रभुसत्तेनें लिहील हो कविता;
काव्यासह विजयध्वज निज देशाचा दिगंत फडकविता.

यास्तव सहानुभूती ठेवा, कांहीं करा अशी सोय,
कीं कविंची, भाषेची, देशाचीही समुन्नती होय.

प्रकाशन—इंदुप्रकाश व
' काव्यदोहन ' पुस्तकद्वारा.

## १०. युवराजवियोग

ज्यानें युवराजाच्या शुभ गीतें गाइलीं सुलग्नाचीं
त्यानेंच कां लिहावी अशुभ कथा तद्वियोग–विघ्नाची ?
परि हा सगळा आहे खेळ–विपर्यास–खास काळाचा.
विधिनेंच लेख लिहिला चुकतो तो केंवि हो कपाळाचा !
पांच दिनांपरि झालीं पांचचि वर्षें तदीय लग्नातें,
तों भवबंध तयांनीं युवराज्ञीचेंहि तोडिलें नातें.
भावी राज्यसुखाची नाहीं तिळमात्र ठेविली परवा,
परवां परलोकीं ते गेले, करितात लोक शोकरवा.
नवल न जनशोकाचें, प्रजाच कीं राजनिष्ठ ती आहे ;
परि ही निसर्गदेवी उदास झाली ! न वातही वाहे.
काळानें कपटानें वाटे युवराजघात केल्यानें
दिनराज खिन्न झाला, मुख झांकी अभ्ररूप शेल्यानें.
मंद प्रभा तयाची नोहे, सारा विषाद हा पसरे ;
तरुवेली, नरनारी, दिसती पांडुर उदास एकसरें.
राजपथीं त्या कालीं असति उभे त्यजुनि हालचालींला ;
वाटे तटस्थ झाले दुर्दैवाची बघोनियां लीला.
किलबिल न करिति पक्षी, सारा व्यवहार जाहला शांत ;
जनताशब्द निमाला, राजमहालांत होय आक्रांत !

सूचवि कूच कराया स्वार शिपायांस दहनभूमिकडे ;
तों करुणगीत–वादन करी उराचे शतावधी तुकडे !
शस्त्रें उलटीं धरिलीं, आदरिली मूकता शिपायांनीं
चालति मंदगतीनें स्वारांचे हय, पदाति पायांनीं.
वाद्यसमूह सभोंतीं करुणरवें गाढ शोक विस्तारी ;
ये पालखींत मागुनि युवराजांची अखेरची स्वारी.
जो युवराज गजावरि विलसे उदयाचलीं जसा इंदू,
तो न उठाया निजला ! खेदाचा खवळला महासिंधू !
हे राजचिन्हहो ! हा पाहुनि निस्तेज ह्यास दूषवितां ?
जरि गादीवरि बसता, हाच तुम्हांला स्वयें विभूषविता !

प्रख्यात भोसल्यांची तनया सौभाग्यमंडिता चिमणा !
गुजराथराजलक्ष्मी, त्या देवीचाच बाळ हा चिमणा !
जननीमुखचंद्राचें शोभे प्रतिबिंब याचहो वदनीं !
खग्रास हाय झालें ! न दिसेल श्रीसयाजिच्या सदनीं !
उन्मत्त, लीन, राजा, रंक, यमा ! शरण तो तुझ्या चरणां,
मरणास पावतां तो जातो किती दीन होउनी सरणा !
वेश अमंगल करुनी स्मशानयात्रेस थोर जन आले,
युवराच्या मागें भासे कीं शोकपूर हा चाले !
त्या पूरासरसा तो मृत्यूच्या नृत्यभूमिला गेला !
गेला ! परतुनि येना, सयाजिनें मारितांहि हांकेला !
न हयारोहण आतां न गजारोहणहि त्या चितावहना !
क्रव्यादग्निस्थापन झालें ! आरंभ हाय हो दहना !

गर्जे तोफ धडाडा, कडकडती बंदुकांचिया रांगा,
बधिर श्रवण जहाले, आले रोमांच तेधवा आंगा.
वैधव्य–व्यसनानें नाडुनि पद्मावतीस भार्येला,
गेलास राजपुत्रा ! करुनि पदाघात काय आर्येला !
ध्वज नृपमनोरथाचा भगवा झेंडाहि ‘ मांडवी ’ वरला,
पाडुनि फत्तेसिंहा ! पथ न तुवां हाय हा भला धरला !

वणवा सुतशोकाचा तव जनकाच्या उरःस्थलीं भडके ;
क्रव्यादग्नि भयंकर तुझ्या चितेचाच हा जसा धडके.
राग, द्वेष, तसे मद बहुपरिचे, कोणतीहि मोठाई,
विरघळते, गळते गे, जळोनि जाते चिते ! तुझ्या ठायीं.
दिसती तवप्रतापें दोष मृताचे हरोनि गुण तितुके ;
सोन्यास आंच मिळतां जळोनि मळ, कांति तेवढी झळके.
सुखशीतल छत्र शिरीं राज्यधुरंधर सयाजिरायाचें
असतां युवराजांनीं विशेष तें काय हो करायाचें ?
अश्वारोहणपटुता तथापि संपादिली असे यांनीं ;
कौतुक नृपास झालें अनेक वेळीं तदीय मृगयांनीं.
दिधली प्रथम परीक्षा केला अभ्यास आंग्लदेशांत,
भिन्नाचार–विचारहि ह्या देशीं पाहिले विदेशांत.
नाना खात्यांतुनि ते शिकले जाऊनि काम सरकारी ;
अक्षर असें असे, कीं पाहुनि हो लेखकांस लाचारी.
आयांग्ल पद्धतींचे नानापरि खेळ खेळती नामी ;
आटोपुनि खेळ परी, गेले देऊनि दुःख परिणामीं !

कुठवर खेद करावा आतां? होणार गोष्ट ती झाली;
नित्यानित्यविवेकें सुज्ञ नृपा! धैर्य ठेव या कालीं.
सांत्वन युवराज्ञीचें सोडोनी धीर केंवि करिशील?
धरणें संकट समयीं धैर्य, असें हेंच थोरजन-शील.
पद्मावतीस मानीं दुसरे जणुं काय इंदिराराजे,
सांभाळ बाळकातें प्रतापसिंहास. हेच युवराजे.
विश्वनियामक शक्ती फत्तेसिंहास उत्तमा गतिला
देवो! संप्रति याविण न सुचे हितवाद माझिया मतिला.

प्रकाशन—मनोरंजन
ऑक्टोबर १९०८.

## ११. कारंजें

हें अवलोकुनि कारंजें
गा हृदया रसिका रंजें ॥ ध्रु० ॥

रविप्रकाशा-माझारीं
याचें तेजोमय वारी
चमके, मुकेच गगनाचे
घ्याया थैथै जणुं नाचे; हें० १

पडुनि चंद्रिका यास करी
धवल हिमाहुनि नवलपरी;
विलसति किति या जलधारा
शुद्ध रुप्याच्या जणुं तारा. हें० २

ह्या बिंदूंचे तों होती
गोल अमोल विमल मोती.
हंसोत अथवा जवाहिरे
मी तों म्हणतों यांस हिरे! हें० ३

होतां जल पवनाकुल तें
फूलचि जणुं डुलतें झुलतें.
न दिसो तयांत तारांनीं
उमगे मंजु तुषारांनीं. हें० ४

सततोत्साहें, आनंदें,
उडतें पडतें निज छंदें ;
पडुनहि उंच उडायाला
याला श्रम न कदा झाला. हें० ५

सुदिन-दुर्दिनीं उल्हासें
हांसे सम सुंदर भासे ;
खालीं वरती सतत गती,
गती विराम तया मग ती. हें० ६

शील करी जें तद् घटना,
ना तें शक्यचि आकलना ;
शाश्वत अशाश्वती ज्याला,
तीच शाश्वती मग त्याला. हें० ७

स्पृहावंत जरि निरंतरीं
तरीहि निस्पृह निरंतरीं
तमें तमोमय हें असतें,
तेजें तेजोमय दिसतें. हें० ८

अभिनव, सतत, जरी लहरी,
उन्नत, चिंताजाल हरी ;
गुणगुणुनी गुणगण हे तूं
तूंहि असें हो हा हेतू. हें० ९

प्रकाशन —मनोरंजन व
रसतरंगिणी, १९१०.

## १२. कुंजकूजन

(दिंडी)

कृष्णपक्षींचा चंद्र कलाहीन
पश्चिमेच्या क्षितिजांत होय लीन,
भागलेला जणुं जरठसा प्रवासी
लागलाहे खालतीं बसायासी. १

दीर्घसूत्री ती रात्र चंद्रजाया
पूर्व गोलातें त्यजुनि निघे जाया;
उदयसंधी येतांच आळशातें
स्वयें तंद्रा सोडोनि जशी जाते. २

बाल-दिनकर तो उदयगिरिशिराला
प्रयासानें आरूढ जणों झाला;
मृदुल दुलईसम धवल धुकें त्यानें
निज करांहीं सारिलें आळसानें. ३

अरुण किरणें मंदोष्ण तयाचीं तीं
पडुनि आकाशीं लाल छटा देती;
प्रेमरंगें जणुं बालरवि-चितारी
किरणकलमांनीं गगनपट चितारी. ४

सुखद त्याचें तें उष्ण पसरताहे,
तरिहि कमती हेमंतशीत नोहे;

असुनि अर्थोष्मा जेंवि लोभियाचें
दैन्य म्हणुनी कधिंही न जावयाचें ! ५

अझुनि ठेवुनि निज गाल गालुशीतें
बिछान्यांतचि असतील आळशी ते;
अशा समयीं मधुरमधुर या रवानें
आळवितसे हा कोण गौरवानें ? ६

कुठूनि येते ही शब्दसुधा धारा ?
हिनें भरिला कीं निकट भाग सारा !
अहो ! बघताहें चकित लोचनांहीं,
उगम हीचा तरि दिसत मला नाहीं. ७

कोण तूं गा कोठील कवणियाचा ?
कुठें केला अभ्यास गायनाचा ?
कोण झाला गुरुराय तुज तयाचा ? ८

असिसि कलरव कीं काय सतारीचा ?
दिव्य सुस्वर कीं अमर–सुंदरींचा ?
मूर्तिमंतचि कीं सामवेद साचा ?
सांग मजला तें सांग सुधावाचा ? ९

जिच्यामाजीं प्रतिबिंब तुझें राहे,
वस्तु लोकीं कोणती अशी आहे. ?
सरसहृदयी मेघ तो स्वातिचाही
तुझ्या सरिचा जरि म्हणूं तरी नाहीं. १०

कर्णरूपी उघडिल्या शिंपल्यांत
वचनबिंदू जे तुझे उतरतात,


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.

अमित सोज्वलसें तयांचियें पाणी
रुचिर मोत्यांसहि गौणताच आणी. ११

वेणुनादें माधवें मधुवनांत
ब्रह्म बिंबवुनी प्रणयिजनमनांत,
परमहर्षाचा परमलाभ त्यांतें
करुनि दिधला, ऐकोनि ठाउकें तें. १२

परी त्याची अनुभूति मला नाहीं.
न हो किंबहुना मना कल्पनाही
आजि तूझ्या परिसोनि गायनातें
किमपि त्याचें अनुमान मला होतें. १३

काळसर्पाहुनि जे महाविखारी
असे दुर्जन त्यांनाहि जिंकणारी,
चंद्रमणिसम रसिकांस झरविणारी,
होय वाणी तव अमृतगर्वहारी. १४

पहा ! विस्मय चहुंकडे प्रसारीत,
गाढ जिज्ञासा रसिकमनिं भरीत,
उष्णसंगें अनुराग संचरीत,
गिरा विचरे ही पवन-लकेरींत. १५

उदासांचें औदास्य-तम हरोनी,
निराशांचें नैराश्य, निवारोनी,
व्यथितहृदयांची व्यथा शांतवोनी,
विलसते ते उल्हास उपजवोनी. १६

तरी अद्‌भुतरस असा निर्मिणारा,
सरस मानस उचमळुनि आणणारा,

हेंच नंदनवन करुनि दाविणारा,
कोण असशी तूं दिव्य गुणागारा ? १७

गुच्छ जैसा काश्मीर-गुलाबाचा
हरितपर्णांमधिं गुप्त असे साचा,
तरी, परिमल चहुंकडे तयाचा तो
दरवळोनी रसिकांस मोहवीतो. १८

लपुनि कोठें तरि विहंगमा तैसा
नादसंगम वितरोनि मधुर ऐसा,
गड्या, मजला तूं वेड लावियेलें;
तरी सांगे त्वां गेह कुठें केलें. १९

असाधारण गुण असुनि असा अंगीं,
कासया तूं बससि गूढ जागीं ?
वसत असतां कीं नित्य विजनवासीं
येत आहे थोरवी गुणिजनांसी ? २०

दिव्य तेजोवलयांत विचारांच्या
लीन होउनियां कवी सुधावाचा
वदे नैसर्गिक काव्य, तसा तूंही
गासि गायन हें विस्मयप्रवाही. २१

काव्य तूझें ज्यांतोनि उगम पावे,
विषय लोकीं ते कोणते असावे ?
लोल सलिलें, कोणतीं उपवनें तीं ?
माळ किंवा कोणत्या शैलपंक्ती ? २२

रम्य देखावे नभोमंडलाचे ?
प्रेम किंवा तूझिया प्रिय जनाचें ?

अपरिचय कीं संसारविपत्तींचा
उगम आहे ह्या काव्यनिर्झरीचा ? २३

अगा गंधर्वा ? अगा विहगराया !
चित्तचातक हा आत्मवश कराया
तुझ्या हृदयीं कोणते तरि विचार
असति हृदयंगम जेहि काव्यसार ? २४

ठाउका जो आनंद तव मनाला,
लेश त्याचा देशील काय याला ?
शिकवि शिकवी तव शब्दमोहिनी ते
त्याहि जिव्हेतें सहजकर्कशेतें. २५

अरे इतुक्यांतचि मौन असें कां हें
तुवां धरिलें ? हें उचित तुला नोहे.
असुनि कवि मी तुज करित विनंती ही
अविनयें कां अवमानितोस तीही ? २६

होय तूझा व्यवयास-बंधु गा मी,
सतनुवाङ्मन मी रसिकजन-लगामीं;
बघुनि तूझा गुण दिव्य, निरभिमानी
करी विनती, ती सुजनपणें मानीं. २७

गुणविहीना गुणमणी गमति काचा,
गुणी हेवा करितात गुणिजनांचा;
परी गुणवान् गुणिजनांचा चहाता
विरल विरलचि तो सरल जन पहातां, २८

लक्ष पक्षी लक्षिले आजवेरी
रंगरूपें शब्देंहि मनोहारी;

परी करणारा यापरी बहारी
नाहिं नाहीं कुणि कुंजवनविहारी. २९

अगा गंधर्वा ! तरी लताऽगारीं
छेडिं छेडीं तूं फिरुनि रागदारी;
तिच्या श्रवणाचा, तुझ्या दर्शनाचा
लाभ झाल्याविण मी न हलायाचा. ३०

हाच वाङ्मधु हृदयांत सांठवीन;
काव्यरूपें रसिकांस पाठवीन;
तरी, तव ते बहुमोल बोल बोल !
देइं दर्शन दृष्टीस या विलोल. ३१

अहो, परि हा भ्रम काय मला झाला !
प्रार्थिताहें मी काय हें कुणाला ?
वनेचर जी स्वातंत्र्यसुधास्वादी ?
कासया तो साहील मम उपाधी ? ३२

काय म्हणुनी शिकवील मला हो तो ?
आणि शिकवोनी काय कवी होतो ?
कदा नोहे ! रससिद्ध कवी जो कीं
स्वयंभू तो अवतरत असे लोकीं. ३३

स्वयं काव्यस्फूर्तीस पावणारा,
स्वयं नादब्रह्मांत गुंगणारा,
शब्दसृष्टीचा चतुर विधाता तो
जगन्मोहन या खगापरी गातो. ३४

कुठें वाणी या कुंजकूजनाची ?
कुठें माझी वैखरी ! खरतराची !

कुठें निर्मल जीवंत झरा तीचा !
कुठें कर्दम मत्काव्यपल्वलींचा ! ३५

कुठें त्याचें निश्चिंत अंतरंग !
कुठें माझे दुर्मनो--मनोभंग !
कुठें त्याचा स्वातंत्र्यवनविहार !
कुठें जीवित परंतंत्र हें असार ! ३६

निराशेनें जाहलों उदासीन,
कवित्वाचा मद होय मनीं लीन ;
गमे सारें जग जीर्णवन मला हें,
ज्यांत एकचि मी जीव वृथा आहे ! ३७

अहो, इतुक्यामधिं काय नवल झालें
प्रेम–बिंबचि कीं भानुचें–उदेलें !
आणि तेणें निमिषांत उपवनाला,
नव्हे, आलें चैतन्य या जगाला ! ३८

हृदयरूपी जो प्रेमकोश, त्यातें
व्यक्त करुनी जणुं सहृदयांतें,
जडांलाही चैतन्य द्यावयाला,
कुंजकूजन लागला गावयाला. ३९

जसा त्याचा रव कर्णमनोहारीं,
तसा होई प्रतिरवहि सभोंवारी ;
जणों उपवनही कुंजकूजनाचे
असुनि नादब्रह्मांत लीन नाचे. ४०

धन्य असशी तूं कुंजकूजना गा !
गाइं गाईं निज गान महाभागा !

तुझ्या गानें होईल खलभुजंग
वशहि तरि तो मग कां न रमारंग ! ४१

पंचमांतिल आलाप कोकिलांचे,
नादसंयोगहि तंतुवादनांचे;
काव्यमकरंदहि महाकविजनांचे,
वृथा येथें जाहले वृथा साचे ! ४२

परमसीमा ही दिव्य माधुरीची
मनुजवाणीनें कधिं न कळायाची;
स्वाद हीचा रसिकांस जरी व्हावा,
तरी त्यांनीं रथ हाच आयकावा. ४३

वसंततिलका

जें जें निसर्गरमणीय म्हणोनि कांहीं
निर्माण होउनि जगीं विलसोनि राही,
सौंदर्य तें नयनगोचर होय साचें,
अज्ञेयशा भुवनसुंदर ईश्वराचें. ४४

विश्वास ठेवुनि मनांत असा विवेकें,
विश्वास जे निरखिती प्रणयातिरेकें,
तद्वैभवीं असति लीनहि कौतुकानें,
त्यांनाच ही कृति समर्पण आदरानें. ४५

प्रकाशन — १ मनोरंजन, २ काव्यरत्नावली १९०४,
३ रसतरंगिणी १९१०.

## १३. कालार्णव

तव ठाव न कळे विराटा !
वर्षे या तुझिया लाटा. सागरा ! १

हें गहन शोकजल सारें
अश्रूंच्या लवणें खारें. सागरा ! २

ये तुला ओहटी, भरती,
मर्यादा नहि तुज परती ! सागरा ! ३

तूं नश्वरतेचीं तीरें
ज्यापिसी स्वैर निज नीरें. सागरा ! ४

जरि विटसी कवळ गिळाया,
तरि गर्जसि अधिक मिळाया ! सागरा ! ५

नहि भूतदया-लव जेथें
अवशेष ओकिसी तेथें ! सागरा ! ६

ठकविसी शांत असतांना,
क्षोभलिया प्रलय जनांना ! सागरा ! ७

तुजवरुनि तरुनि जाणारा
मग कोण असेल अपारा ! सागरा ! ८

प्रकाशन-मनोरंजन,
एप्रिल, १९१०.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 93८७9

## १४. कवितारति

अये कविमनोभवे, सहजसंभवे, स्वामिनी,
सुवर्णमय देहिनी, नवरसात्मके, भामिनी,
प्रसादमयजीविते, अनुविचार-संचारिणी,
चमत्कृतिविलासिनी, रसिक-सन्मनोहारिणी. १

यदा भगवती गिरा परम मंजु वीणागुणां
स्वयें चलन देउनी करितसे तवाऽवाहना,
यदा मधुर साम तो म्हणति सर्व गंधर्व ते,
मनोहर सुरांगनावलय तें यदा नाचतें. २

अशेष तव वैभवें करुनि वेद पारायणा,
यदा स्तवितसे विधी किमपि आदिनारायणा,
यदा स्वरतरंग हे मिळुनि एकमेकांमधीं
प्रसार बहु पावतो तव अनन्य नादांबुधी, ३

यदाहि कविते ! तुझी परम माधुरी यापरी
उचंबळुनि राहते सकल देवलोकान्तरीं,
तदा त्यजुनि आपुली सहजयोगनिद्रा हरी
प्रसन्न नयनीं सुरांवरि सुधाभिषेका करी. ४

अगम्य तनुवाङ्मना प्रति असे जगन्नायक,
असा निगम गाति ते सुरपुरींतले गायक;
तथापि कविते ! प्रभू वशहि कीर्तनें जाहला,
न कीर्तन तुझ्याविणें, म्हणुनि साध्य तो तूजला. ५

तुझी पडुनि मोहनी अवतरेहि साकार तो,
        स्वदासजन तारितो, खल अशेष संहारितो;
अये सकळही भयें चळचळां जया कांपती
        करी वश अशा शिवा तुजमुळेंच लंकापती. ६

न मोहबल चालतें लवहि ज्या त्रिमूर्तीवरी,
        वशीकरण त्यांजला करिसि तूं जरी यापरी,
तरी मग अम्हां जनांप्रति अनेक मोहाकुलां
        तुवां स्ववश केलिया नवल काय ? सांगे मला. ७

प्रसाद घडतां तुझा सहज नाभिमूलांतुनी
        अनन्य लहरी उठे तनुसि टाकि ते व्यापुनी;
तिच्या प्रसरणासवें सकल देह हेलावतो,
        क्षणैक चपलौघ कीं जणुं शिरांतुनी धांवतो. ८

मुखामधुनि एकदां गदगदा तदा ये ध्वनी,
        स्वयें उचमळोनि ये हृदय, नीर ये लोचनीं;
न काव्यविषयाविना इतर भानही राहतें,
        रसात्मक पदावली मग मनोहरा वाहते. ९

करोत करणार ते किमपि कल्पना यावरी
        रसज्ञ कविबंधु तो अनुभवील हें अंतरीं;
परंतु अनुभूति ही मजसि तीन वर्षें नसे,
        अहा ! प्रियजनांवरी प्रियजनें रुसावें कसें ? १०

तुझ्यास्तव उपेक्षिल्या बहुविधा सुविद्या कला,
        तुझ्यास्तव न तीं पदें, उपपदें मिळालीं मला;
तुझ्यास्तव हुजूरचा जरि गुलाम झालों स्वतां,
        तुझ्यास्तवचि गांजलों तरि निबंधनातें अतां. ११

तुझ्यास्तव न लोभतां विभवमार्ग मीं टाळले,
तुझ्यास्तव सखे ! मला स्वजन तेहि कंटाळले ;
तुझ्यास्तवचि हेलना मम गृहावधानीं घडे,
तुझ्यास्तव जनाहुनी विजय हा मला आवडे. १२

तुझ्यास्तव तुझ्यापरी मृदुल देहिनी गेहिनी
अनेक समयीं दिली ढकलुनी, अये मोहिनी !
तुझ्यास्तव जुमानिलें नहि सुबंधु नारायणा,
सदा न सदुपासिलें किमपि सूर्यनारायणा. १३

निशा दशदिशांसही गवसणी यदा घालिते,
सुषुप्ति निज मोहनी स्थिरचरांवरी टाकिते,
प्रशांत समयीं अशा भ्रमसि जेथ लीलावती,
अतंद्रितचि तेथ हा अनुसरे तुझा सोबती. १४

मुठींत नवतीमिषें कनकवालुका वाळिली,
परंतु तुजसंगतीं रमुनि तीहि म्यां गाळिली ;
अशाहि अहितामुळें मन न भंगलें, रंगलें
सदा तव समागमीं गमलिं जंगलें मंगलें. १५

शरीरसुख सोडुनी, विभवपाश ते तोडुनी,
निजाप्त मन मोडुनी, अहित सर्वथा जोडुनी,
तुझ्या प्रणयबंधनीं सतत गुंतुनी जो वसे,
रुसोनि कवितासखी ! विमुख त्यास व्हावें कसें ? १६

तुझे स्मरण होतसे मजसि राहुनी राहुनी,
उदास मन जाहलें विरह साहुनी साहुनी ;
तुझें श्रवण मीं करीं, मनन, घेतला ध्यास ना !
त्वदन्य हृदयेश्वरी ! मम जिवास ना वासना. १७

किती दिवस आणखी तळमळूं तुझ्या कारणें ?
वियोगविष पाजुनी उचित का मला मारणें ?
नको, करुं नको असें, सकल संग मी त्यागितों,
प्रसन्न परि हो मला, वर अनन्य हा मागतों. १८

तुझा प्रणयभानु हा प्रखर या क्षणीं जाहला,
मनोधन तयामुळें सरसरां स्रवूं लागला,
सतेज रसबिन्दु ते हृदयशक्तिनें झेलले,
जिवा म्हणुनि धीवरें मज दिलीं सुमुक्ताफळें. १९

फिरे कलमवज्र हें वचन मौक्तिकांच्या वरी,
ममायुगुण गोंवुनी बनवितों तयांच्या सरी;
अशा सरस घालितों तुजसि मीं सरीच्या सरी
प्रसाद परि सुंदरी ! मजवरी करीं गे करीं. २०

अहा ! भ्रम–परंतु हा भ्रम अगाध–कां हो मला ?
न पूर्व-कवि तत्कृती, स्मरति कां मला सोज्ज्वला ?
तयाकृतिमिषें पहा किति अलंकृतींनीं भलें
सुरम्य कवितावपू नखशिखान्त हें शोभलें. २१

कचांवरि तिच्या पहा कविवरेण्य मुक्तेश्वरें
किती वचनमौक्तिकें रुचिर गुंफिलीं हीं बरें !
भ्रमें-प्रणयसंभ्रमें मणिललाम हा मानुनी
समर्थ-कृत बोध ती निज शिरास घे बांधुनी. २२
प्रसिद्ध रघुनाथ ह्या रसिक पंडितानें तिला
नवादिरस घोंटुनी तिलक लाल हा लाविला.
सुनील कमलप्रभा, अलिविलास हीं वामनें
दिलीं नयनमंडनें रचुनि कृष्णलीलांजनें २३


स्थळप्रत.

श्रुतींमधुनि घातलीं परमदिव्य देवद्वयें
स्वकाव्य–मणिमंडनें, झळकती किती तीं स्वयें !
नथ ग्रथुनि घालितां वचनमौक्तिकें श्रीधरें
किती सरल नासिका विलसतें मुखश्री बरें! २४

स्वकीय परमामृतें–नहि परंतु–मंद स्मितें
मुकुंद कवि भूषवी विशद कुंदसे दंत ते ;
सुवर्णमणि, पोतही मधुनि कृष्णभक्तीमिषें
गळेसरचि बांधिलें अढळ एकनाथें कसे ? २५

विराजति गळ्यांत ह्या किति अभंगचंद्रावली
जयांतुनि तुका–यशोधवल चंद्रिका फांकली.
न संतचरितें महीपति हिला भरी कंकणें
सुवृत्त मणिबंधनीं असुनि कां तयां शंकणें ? २६

अहो सगनभाउनें रसिकराज होनाजिनें
दिली इजसि मंदिली विरल कंचुकी प्रीतिनें
सुवर्ण जरिचीं बुटें, यमक गोलकल्लोलसे,
मयूर कविचा न हा कृतिकलाप, शालू असे. २७

कटीस कटिबंध ही जडित मेखला आयती,
यतीहि झुलवावया अमृतराय हे काय ती ?
किती श्रुतिमनोहरा रसिक रामजोशी–कृती
कृती न कविते ! तुझीं करिती नूपुरें झंकृती. २८

पुरातन अतां कुणी असति जे मराठी कवी,
तदीय रचनांस मीं समजतों मुद्या जोडवीं;
अशा कविगणें जिला सजविली स्ववाग्भूषणें
तिला वचन भूषणें मम नव्हेत, हीं दूषणें ! २९

असोत; जरि दूषणें, तरिहि तीं करीं धारण
पुराण कविंनीं तुला नटविली असाधारण ;
म्हणोनि वरवर्णिनी ! तुजसि दृष्ट लागेल कीं !
न ती वचन-लांछनें मम कदापि होई सखी !

प्रकाशन—मनोरंजन—रसतरंगिणी.
१९१०.

## १५. वसंतमाधव

(१)

आला वसंत कवि-कोकिल हाहि आला
आलापितो, सुचवितो अरुणोदयाला;
हा ‘ ऊठ ऊठ ’ म्हणतो जणुं भारताला,
ऐका ! पहा उठुनि या प्रतिभारताला. १

वाल्मीकि हा जणुं दुजा दिसतो न कांहीं,
आलाप मात्र निघती अमृतप्रवाही !
वाङ्मोहनी किमपि साधियली जयांनीं
कोठें वसोत मग ते नहि मानहानी ! २

ही दिग्वधू तदनुरूप पतीस लाजे,
झाली सुवर्णरसतुल्यचि काय साजे !
आरक्त ही बघुनि हो अनुरक्त भानू,
हा प्रेमरंग उभयांतिल काय वानूं ! ३

तेजोनिधान पद ‘ देव ’ यथार्थ ज्याला,
दिव्यासनास रवि तो अधिरूढ झाला;
आहे तदीय नववर्षसखा सवें तो—
दृष्टींत सख्य असल्यास दिसोनि येतो. ४

हे सारखे वरद, मंगल अन्तरंगें,
आले जगांत उदया उभयानुषंगें;

जे कां समान हृदयें अथवा स्वभावें,
त्यांना अभिन्न गणिती जन एक भावें. ५

आहेत दोन मधु माधव तुल्य मास
केला वसंतऋतु एकचि तत्समास ;
हेही सखे मिळुनि ‘ मित्र ’ पदांत तैसे
नारायणीं, नर, विराजति एक ऐसे. ६

जे सारखे असति सुंदर आकृतीनें,
त्यांहूनि पूज्य सम सुंदर जे कृतीनें ;
हा मित्रयोग रुचिराऽकृतिचाच नोहे,
तत्तुल्य चारुचरितांतहि योग आहे. ७

येतांच एक उदया करितो दिनाचा—
प्रारंभ, अन्य करितो तरि मंगलाचा ;
एके प्रकाश परिपूर्ण दिशे दिशेला
आनंद तोंच इतरें जगतांत केला. ८

वृक्षावरी किलकिलाट वनोवनाला—
झाला ध्वनी गजबजोनि जनीं निघाला ;
कांहीं विहंगम टिपेवरिच्या सुरांनीं
गातात तों गुरव हे सनया सुरांनीं. ९

कोठें घुमोनि असती जंव पारवे, तों
कोठें मृदंगरव साम्य तदीय देतो ;
हे आम्र जों कुणि फलें, कुणि मोहरांनीं,
तों शोभती जनगृहें ध्वजतोरणांनीं. १०

हीं पावनें उपवनें पवनें, हिमानें,
हीं अंगणेंहि जन–मार्जन–सिंचनानें ;

पुष्पें अनेकविध गाळिति रम्य वल्ली
गेहांगना विविध घालिति रंगवल्ली. ११

या कोंकरांस, करडांसहि वासरांना
येतात हर्षलहरी लहरी मुलांना;
चेंडूसमान कुरणांतुनि तीं उडाया
हीं लागलीं परि घरांतचि बागडाया. १२

वन्यस्थलें, हिमगिरी, बहु निर्झरांनीं
न्हाती तसेच जनही विपुला जलांनीं;
आपापुलें करिति ते जरि धर्म–कर्म
कांहींत यापरि दिसे तरि तुलय सर्मः— १३

कुंजांत गुंजन घुमे बहु बंभरांचें,
देवालयांत इकडे उदरंभरांचें;
हे ध्यान-मौन धरिती बक भक्ष्यसाधू,
लोकीं असे बहुत हंत! महंत–साधू! १४

यांच्या वरोनि अपुली फिरवोनि दृष्टी,
अन्यत्र हीच निरखूं निमिषैक सृष्टी;
सारे हिच्यांत भरले नहि कायसाधू;
कोणी खरेच असती गुरु आणि साधू. १५

आहे अशेष— जनजीवन हेतु जो कां,
सर्वप्रबोधक नियामक सर्व लोकां;
जो एक अंतिम गती, गुरु राघवाचा
तो सूर्य हा टळरतां गुरु अन्य कैंचा! १६

सर्वत्र जें भरूनियां उरलें अनंत,
खंब्रह्म जें निगम गाउनि घे उसंत;

निःसंग, निर्मल, निरंतर अंतराला—
वांचूनि त्या गुरु कुठें बघतां निराळा ? १७

जो स्पर्शतां त्रिविध ताप लयास नेतो,
न्हाया प्रसन्न मन भिन्न सुगंध देतो,
जीवांस सर्व जगतासहि जो जिव्हाळा,
तो संत संतत असे कसला उन्हाळा ? १८

वर्षाव हो ! कडकडाट उडो विजांचा !
ज्याचा न निश्चय म्हणोनि ढळावयाचा;
दिव्यौषधी किमपि ते रस संग्रहाला,
दावूं अशा कितितरी सुमहंतमाला ? १९

कष्टोनि तिष्ठति कुठें तरि काननाला,
बोलाविती निज विहंगमुखें जनांला,
छाया करोनि अनुकूल फलांस देती;
या सज्जनीं चहुंकडे भरलीं वनें तीं ! २०

विश्वंभरा जननि दैवत जानकीचें,
आहे क्षमा किमपि हें व्रत-शील-जीचें,
आम्हांस जी धरितसे मरणान्त उर्वी-
अंकास, ती नहि सती ? नहि काय गुर्वी ? २१

दोन्ही तटें करुनि अन्नमयें अम्हांला,
पाजावया धरुनि धांवति संभ्रमाला;
आम्हांस ज्या करिति पावन आणि शांत,
दावूं सती किति अशा निज भारतांत ? २२

हा तों गभीर, अति शांत अनन्तपार,
औदार्य हें उचमळे न जलप्रसार

लक्ष्मीपिता, उगम जीवन-जीवनाला
हा सिद्ध आणि गुरु बोधक शोधकांला. २३

क्षारोदकें पिउनि यांतुनि मेघमाला
ज्या ओतिती अमृतरूप निधी अम्हांला,
त्याही सती, न दिसती परि वर्तमानीं
वासंतवेष धरिला असतां वनांनीं. २४

वेली, तरू, विलसले नवपल्लवांहीं,
हे झोंकदार बहु लोक नवांबरांहीं;
पुष्पेंच भूषण लता वनवासिनीतें!
रत्नें, सुवर्ण, गजरे—हि सुवासिनीतें! २५

आला गुलाब-सुमनांप्रति जो विकास,
उल्हास तोंच इकडे रमणीमुखांस;
एकैक त्यांतुनि जसा निघतोसुगंधी—
उद्गार यांतुनि तसा प्रणयानुबंधी! २६

देती लताभ्रमर तों नयनभ्रमाला,
रामाकटाक्ष परि हे भवसंभ्रमाला;
या संभ्रमांतचि अहो, पडले--बुडाले,--
ज्ञानी, यमी, समरसिंह तळास गेले! २८

हे भृंग दंग दिसती मधुसेवनांत,
नानाविधें वनचरें चरती वनांत;
पक्ष्यांपुढें अलगलें फल ये स्वयें तें,
पूर्णत्व आज अमुच्या पुरणास येतें! २८

जे कां पलाशकुसुमांतिल रंगराग,
ते अंगराग जनतेंतहि रंग—राग!

या उत्सवें सुदिन आज तदीय गेला,
गेला सहस्रकर भेटुनि पश्चिमेला. २९

( २ )

संध्या न ही परि गुलाल रमे वसंत,
वायू न, ये अभिनयें नट हा वसंत;
तारे ? जवाहिर ! कसा झळके वसंत,
हा कोहिनूर ! नहि शुक्र तुझा वसंत ! ३०

हें वारियंत्र नच, नाचतसे वसंत,
हा मल्लिकांस न विकास हंसे वसंत;
हा भृंगनाद नहि गुंगतसे वसंत,
नोहे परग अनुराग भरी वसंत ! ३१

नाहीं सुधाकर, सुधा वरसे वसंत !
सारा निसर्ग मजला सजला वसंत !
वेड्या ! अरे तुजसि जो दिसतो वसंत,
तो हा अनंत ! भरला, उरला अनंत ! ३२

कस्तूरिचा असुनि कंद निजान्तरालीं
जैसा तिला हुडकितो मृग भोंवतालीं,
तैसाच तूं ! नहि मनोगत माधवाला,
तद्बिंब जें बघसि त्या मधुमाधवाला ! ३३

योगी मनांत सुमनोहर हा पहाती,
प्रेमासवें खळखळां नयनी वहाती
कीं, बिंब रम्य दिसतें इतुकें जयाचें,
प्रत्यक्ष वैभव असेल कसें तयाचें ! ३४

तें पाहणें तुज असे, तरि नेत्र झांकीं,
झांकीं तुझे श्रवण, चिंतन अन्य टाकीं;
तूं शांत हो, मन तुझें चळवूं नको तें,
अभ्यंतरीं नवल हें बघ काय होतें! ३५

येथें नसोनि मुरली रव रम्य चाले!
येथें न चंदन तरी वपु गार झालें!
येथें नसोनि रवि, तेजचि तेज आहे!
मध्यें मनोनयन हो! बघवे न साहे! ३६

लागे रसाल नसतां रस गोड येथें!
येथें सुगंध सुटले सुमनाविणें ते!
कार्यें कशीं घडति? कारण जेथ नाहीं,
शंका इथें धरुं नको सुजना मना! ही. ३७

आहे विधान तव संशयवारणाचें,
येथें वसे सकल कारण कारणांचें;
येथें म्हणोनि जितुकेहि विविष्ट झाले,
ते संयमी मग इथेंच तदा रिझाले. ३८

माझ्या मना! संवगड्या थिजलास कां रे?
गेली कुठें चपलता तव चार सारे?
फेंकोनि दे गवसणी तव मूर्छना ही,
हो सावधान! रसिका निरखोनि पाहीं! ३९

आनंदसिंधु! नहि अंत न पार याला,
नानाविधोपनिषदें श्रुति गाति याला;
आनंद, यास दुसरे न तरंग तात!
तेजें जयावरि असंख्य तरंगतात. ४०

देदीप्यमान जलधी वडवानलें तो,
तैसाच हा मजसि दिव्य दिसोनि येतो;
हा चित्कलामय कलाप अनंत ज्याचा
तो नाथ हा बघ अनंत जगांयुगांचा. ४१

कोटी विजा गरगरां फिरतात भोंतीं,
ज्योतीमधें किमपि एक नमो नमो ती !
येथें मना विरमली जरि वेदवाणी,
वाणी तरी मग किती मम दीनवाणी ! ४२

येथें नसे बल, नसे गति वा तियेतें,
येथें महामनहि उन्मनतेस येतें !
येथें असे किमपि हें तरी काय आहे ?
येथेंच तें बघ मना नहि अन्यथा हें. ४३

येथें अगा ! उगम त्या निगमागमांचे,
येथें रहस्य उघडे स्थिरजंगमांचें;
हो राम-धर्म-सुमनोघटनाहि येथें,
गाण्डीवशक्ति मिळवी नर पार्थ येथें. ४४

येथोनि आदिकवि कोकिलसा अगा, तो
रामायणासम मनोरम काव्य गातो;
‘ संगीत ’ सर्व जगतांतिल एक गीता,
ये तीहि येथुनि पुराणपतिप्रणीता. ४५

येथें गुरू विसरले परकेपणाला,
जाणोनि जाणविति आपण आपणांला ;
विद्या, कला, कुशलता, सकला गुणांचें
माहेर हेंच तव पूर्वज नैपुणांचें. ४६

सारांश, जें म्हणुनि आज तुझ्यांत नाहीं,
येथोनि जें मिळविलें तव पूर्वजांहीं;
गेलेंच तें; जरि पुन्हां मिळवावयाचें,
या ज्योतिरूप करिं साधन माधवाचें. ४७

रे या दयाघन रमा-धव साधनाला
वेंचावया तुज नको ऋणको! धनाला;
लावोनि नित्य लय एक अनन्यभावें
ध्यावेंच यामधिं निरंतर लीन व्हावें ४८

जैशी मधांत गढते मधुमक्षिका ही,
तैसाच तूं सतत यांत निमग्न राहीं;
हें केलियास मग किंबहुना वदावें—
होशील हाच दुसरा प्रकृतिप्रभावें! ४९

तूं शिल्पकार तुझिया भवितव्यतेचा,
घे लाभ या करुनि यास्तव दिव्यतेचा;
अक्षय्य हो नखशिखान्त नवा वसंत–
हा जेंवि माधव वसंत अनाद्यनंत! ५०

रे, हा पुरातन वसंत जया शरीरीं
खेळेल तो नर कदा न करील 'री री'!
त्याला असेल जडला क्षय दैवयोगें,
हा घालवील तरि तोहि निजप्रयोगें. ५१

आहे जशी किमपि ऐच्छिक शक्ति याला,
राहील होउनि तशी वश ती तयाला;
तो वास दिव्य–बलवंत करील जेथें,
वासंतवैभव सदैव वसेल तेथें. ५२


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 3639....... दि: ..................

संवत्सर-प्रतिपदा सुमुहूर्त आज,
आरंभितां त्वरित यावरि होय काज;
प्रेमानुपान तरि लावुनियां पसंत,
तूं घे म्हणोनि “ जय माधव !” हा वसंत. ५३

प्रकाशन—करमणूक-वसंत अंक
१-४-१९११
अभिनवकाव्यमाला, भा. २. १९१४.

## १६. हिंदवंदना

जिच्यावरि वितान हें गगन इंद्रनीलापरी,
जिच्या तळपतो शिरीं हिमगिरी किरीटापरी,
जिच्यावरि नद्या झरे, नहि जवाहिरें गोमटीं,
जिच्या धन वनस्पती, परि न पैठणी पोपटी. १

जिचें पदकपीठ हें, जन म्हणोत लंका रिते,
सुवर्णकलशापरी पदतलें अलंकारिते;
अशा सुकलशावरी, विपुल मुक्तरत्नासनीं,
जिला विधि विराजवी, किमपि धन्य तो या जनीं! २

जिला जलधिरूप हा वरुण अर्घ्यपाद्यें करी,
जिलाहि अभिषेकितो वरुनि मंत्रघोषें हरी,
जिला सजविते उषा, अरुण मंगलें दे महा,
जिला रवि निवेदितो बहुविधान्न-नैवेद्य हा; ३

पलाश फुलल्यामुळें सकळ रंगतां जंगलें,
रसाल-फल-तोरणें डुलुनि राहतां मंगलें,
वनीं झुलुनि राहतां ध्वनि सरंध्र वंशांतले,
जिला मधु निवेदिती मधुपयक्ष कोशांतलें; ४

जिच्या खुलति केशरी फुलमळे ललाटास ते,
गुलाब–सुविकास, तें स्मित जिचें मला भासतें;
जिचीं अमृतमंडलें मृगमदें सुगंधी किती!
किती भरतबालकें जननि वत्सला धन्य ती! ५

अनेक वनदेवता करिति वायनें, श्रीफळें
समर्पिति उपायनें, बहु विडे, फळें, पोफळें;
जिच्यावरुनि चामरें फिरवितात गंगावनीं,
जिला मलयवात हे करिति विंझणें चंदनीं; ६

फुलें वरुनि वर्षती सुरतरूच गंधर्व कीं!
मयूर-नट नाचती अभिनयें लता-नर्तकी,
जिला रमविती महाकवि–विहंग संगीतकीं,
जिचें हृदय होतसे ध्वनितरंग-रंगीत कीं! ७

जिचे विजयदुंदुभी करिति गर्जना केसरी,
अशेषजनवंद्य ही जननि राजराजेश्वरी,
जिला बघुनि संभवे किमपि काव्यसंवेदना,
तिलाच 'उदयोऽस्तु ते!' म्हणुनि ही असे वंदना. ८

अतीव मधुराश्रुनें पद धुवोनि देवी! तुझे,
तयांस निजमानसामधिल वाहिलीं अंबुजें;
शराव न शरीर हें, धुमति धूप हे प्राण तों,
तुझ्यावरुनि जीव हा रुचिर दीप ओंवाळितों. ९

अये जननि माझिया हृदयरूप कुंडांतला
न भाव परि हव्यवाट् धगधगाट हा पेटला;
न काव्य तव हव्य हें, तुज दिली तदीयाहुती,
अशेष निज ओज ही वरुनि आज्य–पूर्णाहुती. १०

फिरोनि 'उदयोऽस्तु ते!' म्हणुनि ही असे वंदना,
मिलिन्दनयने! पहा जननि हिंद बंदीजना;
तटस्थ कर जोडुनी तुजपुढें उभा राहतों,
अशेष मम भावना नयनिं योजुनी पाहतों; ११

अये भुवनसुंदरी ! दिससि गे जशी जानकी.
तिलाहि उपमान तूं, तुजसि ती, नसे आन कीं,
तुला बघत राहतां हरपते क्षुधा वा तृषा,
तुझी शपथ सांगतों, वचन हें नव्हे गे मृषा. १२

जसें किमपि रूप हें, गुण तसेच: वानूं किती !
जणों गगनदीप ते झळकतात, मोजूं किती !
तटस्थ मन होतसे, जणुं अनन्तपारापुढें
पयोनिधिपुढें नवें जनित बाळ तें बापुडें. १३

तुझे गिरि, तुझ्या शिला, बहुपरी तुझ्या वालुका,
तुझें खनिज, सन्मणी, रस तुझे, तुझ्या मृत्तिका,
महार्णव तुझा, तुझे विविध धाकुटे सागर,
तयांतुनि कितेक तों दिसति मुक्त वैरागर. १४

मुखें, नद, नद्या तुझ्या, धबधबे तुझे कालवे,
झरे, अमृत पाझरे ! रजतरूप ओढे नवे,
सरें, कमलपल्वलें, विपुल कूप, वापी किती,
रुची गुणहि भिन्न ते ; प्रकृति भिन्न तैशा कृती. १५

अनेक गवतें तुझीं, विविध कंदमूळें तुझीं,
तुझे तरु, तुझ्या लता, गुणनिधान पत्रें तुझीं,
अनेक गुण-गंधिनी तव सुरम्य रंगी फुलें,
किती रसगुणाढ्य तीं तव अनेक रंगी फळें ! १६

अमोल गुणवंत तीं असति भिन्न बीजें किती !
अनेकविध धान्य तें तव वदूं वदान्ये ! किती !
अगाध गुणवर्णनीं भरुनि राहिल्या संहिता !
हितार्थ अमुच्या किती असति देवि ! भारांकिता ! १७

अनंत कृमिराष्ट्र हें ! नृपति रेशमाचा किडा
न शेष दिसतो तिथें अजगर प्रभू रोकडा !
अनेकविध मक्षिका, मधुकरीच राणी असे,
पतंग सगळेच तों मिरवितात राजे जसे ! १८

तुझीं जलचरें अहो ! किमपि सृष्टि ही दूसरी,
तिमी, मकर, हे प्रभू करिति राज्य हीच्यावरी ;
विशाल मृगराष्ट्र हें ! असति सिंह सिंहासनीं,
विशाल खगराष्ट्र हें ! गरुड नेमिले शासनीं ; १९

तुझीं निबिड काननें, नभ जिथें दिसे ना दिसे,
भयाण दिनरूपही, रजनिरूप तेथें कसें ?
विशाल कुरणें तुझीं, कळप, ज्यांत खिल्लार तें
चरोनि गलघंटिका विचरतां टणत्कारितें ; २०

खळीं, तव जिराइतें, तव समृद्ध बागाइतें,
जयामधुनि धांवती उदकपाट सैराट ते,
सुमंगल मनोहरा डुलति दाट आम्रावली,
विशाल वट ते तुझे, सुखद सर्वदा सांवली ; २१

निरामय, निवांत तीं तरुततींत खेडीं तुझीं,
अनेक – रचनागुणान्वित अनेक गांवें तुझीं,
तुझीं लघुपुरें परोपरि अनेक पेठा तुझ्या,
महानगर – बंदरें, विविध राजधान्या तुझ्या ; २२

स्थळें कितिक यांतलीं अति पुरातनत्वामुळें
महत्त्व तरि पावती कितिक देवधर्मामुळें ;
प्रसिद्ध असती जरी कुणि निजेतिहासामुळें,
तरी धरिति थोरवी कुणि निजोद्यमांच्या बळें ; २३

कुणांत धनधान्यता तरि कुणांत वाग्देवता,
कलाकुशलता वसे तरि कुणांत लावण्यता;
निसर्गरमणीयता, तरि कुणांत आरोग्यता,
तुझ्या बहुविध स्थलीं बहुविधा अशी योग्यता. २४

तुझे विविध जातिचे, प्रकृति-रीतिचे शोक ते,
तदीय पुरुषार्थ ते, विविध मौज वा शौक ते,
मदीय नयनांपुढें बहुत चित्रमेघांपरी
कलाप पसरोनियां करिति मन्मती बावरी! २५

युगानुयुग चालली तव असंख्य राजावळी
प्रचंड घटयंत्रशी गुणजलें उणी आगळी
स्वकीय गुणकर्म जें जल तिनें तुला वाहिलें,
सतीर्थ इतिहास ते भरुनि अंबुधी राहिले. २६

युगानुयुग जे तुझे मुनि उपासुनी भर्ग तो,
कुशाग्र मतिनें इथें वसविती महास्वर्ग तो,
सुदिव्य निज दर्शनीं दश दिशांतुनी ते स्वतां
बघोनि, म्हणती जनां भरियली गुणातीतता! २७

तदीय उपनेत्र तें सहज ठेवितों नेत्रकीं,
क्षणैक अवलोकितों धरुनि भाव सर्वत्र कीं;
खरेंच! दिसतें अतां सकल एक चैतन्य तें,
तुझें सकल रूप हें दिसतसे परंब्रह्म तें. २८

इथें गुण अनन्य हा उरतसे गुणातीतता,
इथें परमकाव्य हें धरुनि राहणें मूकता;
इथें उटजवास हा सुखद वैजयंतापरी,
इथें मज निजैकता गुणवती, सती, सुंदरी. २९

इथें लवणभाकरी अमृत हेंच माझें मला,
इथें मखमला मला गमति माझिया कंबला ;
इथें त्रिविधताप ही मलयचंदनाची उटी,
इथें विकट संकटें सुमनमाळ ही गोमटी. ३०

इथें परमतत्त्व ही निज अजिंक्य संपन्नता,
इथें सकळ लाभलें दिसतसेच तें लाभतां ;
इथें तनुनिपात हा किमपि योग सर्वांगसा,
इथें तनुवियोग हा सहजसा समाधी जसा. ३१

तनूस परमा गती विलय झालिया भारतीं,
मनास परमोन्नती विलय केलिया भारतीं;
सुकीर्ति जरि भारतीं तरि कशास रंभा, रती?
अशेष भुवनें, सुखें, वसति भारतीं भारतीं. ३२

तुझ्या उदरिं जन्मलों, मज नसो पुन्हां जन्मणें,
परं च असलें, तरी जननि हिंद हो! मी म्हणें.
फिरोनि ‘उदयोऽस्तु ते!’ म्हणुनि हिंद! ही वंदना ;
अशेष तव नंदनां करि कृतार्थ बंदीजना. ३३

तुझा प्रणयपाश हा कसुनि राहिला सारखा,
न मुक्त जगतांतही मनुज माझियासारखा ;
अये जननि हिंद! हा किमपि इंद्रजालापरी!
कसे जसजसा तसा अधिक मोचनातें करी! ३४

प्रकाशन– करमणूक
दिल्लीदरबार–जादा अंक.
२३. १२. ११.

## १७. अद्‌भुत वीणा

( चाल–केशवकरणी. अगाध लीला. )

( १ )

विश्वामाजीं सात चमत्कृति म्हणती पंडित, कवी,
असे ही परि वीणा आठवी. १

घोंटुंनी कर्कश तर्क-वंश तो दोन तया जोडिले
भोपळे द्यावा – पृथिवी भले. २

बहु भुवनांच्या पडद्यावरुनी सु-मनोगुण धांवती,
इथुनि ते स्वर्गाला पावती. ३

वाजवुनी ते गायन करिती वाग्देवीच्या सख्या
स्वरांनीं गंधर्वासारख्या. ४

तदंगुलींतुनि खेळतसे जणुं सुधाच कीं साच ते—
ब्रह्म तैं थै थै कीं नाचतें ? ५

वीणेसंगें संगम पावति, दिव्य स्वर धांवती
सभोंतीं अनंत नादाचिती. ६

( २ )

शांत गभीरहि उदात्त ऐसा मध्यम लावुनि महा
गातसे करुणकुमारी पहा ! ७

सचिंत चर्चा या देवीची नहि ती दुःखामुळें
तिच्यांतिल तत्त्व असे वेगळें. ८

परमेशाच्या कारुण्याचा मनीं पडोनी ठसा,
तशाचा होय मुखीं कवडसा. ९

हिच्या स्वराच्या प्रतिध्वनीपरि ही वीणा बोलते,
नादलय गगनीं आंदोलतें. १०

गान नव्हे हा करुणरसाचा सागर हेलावला,
असें हें परिसुनि भासे मला. ११

(३)

अनुतापाच्या नेत्रांतुनि जीं ठळक महा सोज्ज्वळें
गळालीं खळखळ मुक्ताफळें, १२

हार तयांचा हृदयीं झळके निटिलावरि बिजवरा
जियेच्या इंदुकलेचा खरा. १३

ती ही देवी सहानुभूती प्रेमाश्रू गाळिते,
रुणझुण वीणागुण चाळिते. १४

जगताचीं सुखदुःखे हीच्या मनोगतासंगतीं
मिळोनी ध्वनिचित्रें रंगती. १५

(४)

अनंत तरुचीं फुलें सुगंधी कधीं न कोमेजती,
कचांतुनि तीच जिच्या साजती, १६

शुक्रासम ती संतत कांती नयनांतुनि धांवते
विसांवा निरंतरीं पावते. १७

तिथेंच जीच्या मुखबिंबाचा प्रसन्न दिसतो ठसा,
चंद्रमा आदर्शांतुनि जसा. १८

हीच हिच्यापरि मनोमोहिनी आशागौरी दिसे,
लाविते ही जगताला पिसें ! १९

सारे तारे ऐकुनि हीचा अमृतध्वनि सारिखा
पावती अति संभ्रम हारिखा. २०

नायक संख्यातीत जगांचा बघते तितक्यांतुनी
किती ही तृषार्तशा लोचनीं ! २१

परमानंदीं विलीन झाली ही आपुलिया मनें,
मुखानें करिते हरिकीर्तनें. २२

अनंत हस्तीं अनंत जीवां अनंत वर दे सदा
वाहवी उदारतेच्या नदा, २३

तदौदार्य कीं ब्रह्मपुत्र तो या देवी मानसा
सोडुनि मुखगामी हो जसा. २४

गाते दृढतम भावतंतुतें संतत ही वाजवी
भाविनी ब्रह्मांडें गाजवी. २५

या गानाच्या तुंग तरंगीं विभुवैभव तळपतें
चंद्रिका जणुं सागरिं झळकते ! २६

(६)

विरल धवलसें विलसे जीचें वसन धुक्यासारखें,
कांति ही व्याधासम लखलखे, २७

हृदयामाजीं स्फुरण पावुनी नयनांतुनि ते प्रभा
जियेच्या झळके विद्युन्निभा, २८

तया प्रभेच्या झोतासरशीं प्रकाशमय ही क्षणीं
घालते जगताला गवसणी ! २९

थरकति तारे किरणमिषानें पुलकित दिसती मला
मंगल गातां ही प्रेमला. ३०

(७)

मेरुगिरीचीं मणिमय शिखरें अरुणवर्ण जी करी
शाश्वत उषःप्रभा सुंदरी, ३१

पाहुनी तीचें महैश्वर्य तें सदैव वैभव महा
तयांची ही करिताहे स्पृहा, ३२

दिसे हिला कीं, उदयोन्मुख त्या दिव्य अनंतामधीं
आपुल्या परमहिताचा निधी, ३३

म्हणोनि ही ह्या उषेलाच घे श्वासें आकर्षुनी
योगिनी देवी उत्कर्षिणी. ३४

यत्नांतिल जी रत्नचारुता, प्रभाव इच्छेंतला,
तयांचा घोष हिनें घेतला. ३५

(८)

सरस्वतीच्या दक्षिण चरणीं सहा देवतावरी
जी निज अधिकारासन धरी, ३६

मणिमुकुटानें मुखचर्येनें उपासना ती दिसे
बिंबचि वाग्देवीचें जसें. ३७

साहींचेही गुणौघ तीच्या मनांत लय पावती,
नद्या जणुं महार्णवीं मावती. ३८

तिच्या मनाचे तरंग मिळुनी वाग्देवी मानसा
होतसे सागर संगम जसा. ३९

झणिं वीणागुण झणत्कारिते किती निपुण ती पहा !
देवी संगीतचि हें महा ! ४०

भूलोकाहुनि सुरलोकीं तें दिव्य लयें धांवतें,
तिथेंही प्रतिध्वनी पावतें. ४१



मराठी ग्रंथ सं... स्थळप्रत.
अनुक्रम 30329 दि.

स्थिर-जंगम जे ऐकुनि गाती हृदयंगम गान तें
करूं या ! उपासना—गान तें. ४२

(९)

त्या गानाचे प्रतिध्वनी ही अद्‌भुतवीणा करी
संतत झडते अभ्यंतरीं. ४३

कधीं न हीचा नाद ऐकतो, कधीं न ही पाहतो.
वृथा तो नर नरता वाहतो ! ४४

शुद्ध नसे तो, पूर्णहि नोहे सदैव दैवी कला
तयाची गेली सागरतला. ४५

अज्ञानाच्या घनांधकारीं ठाव नसे जेथला,
समाधी तेथ तिनें घेतला. ४६

शार्दूल विक्रीडित

प्याला आणि पितोहि जो सतत ही वीणासुधास्यंदनें
त्याला सर्व जनें तशींच विजनें झालीं वनें नंदनें;
त्याला वत्सल देवता लगबगां देतात आलिंगनें,
त्याला सर्व परिस्थितींत मिळती तीं दिव्य आनंदनें. ४७

## १८. अश्रुकरभार

अर्वाचीन कवींच्या विलससि अग्रेसरांत तूं आर्या!
आर्या तव रसिकांना आवडल्या–जाहल्या शिरोधार्या. १

साधी प्रसन्न सुमधुर तव भाषेची अनन्य तैं शैली
गंगाधरा ! विराजे धवलगिरी–तुल्य कीर्तिच्या शैलीं. २

कादंबरी-कथानक विरूपितां ठेविलीस जी सरणी,
कथितिल कथा कवी ते धरोत ती आपल्या सदा स्मरणीं. ३

लिहिती ग्रंथ मराठी त्यांना जी "प्रार्थना" तुवां केली,
गेली न ती वृथा तद्-हृदयीं आहे करोनियां केली. ४

सप्रेम "मोगऱ्याचीं फुलें" दिलीं त्वां मदीय हातांत,
तीं लाटिलीं कुणीं तरि, मजपाशीं नसति आज हा तात! ५

गेलीं! तरी स्वकीय स्नेह सुगंधी करोनि तीं गेलीं,
दिसती न मोगरे तरि बहार त्यांनीं मला गमे केली. ६

निज काव्यवाङ्मयाचीं केलीं सिंहावलोकनें ज्यांनीं,
तुजसि गुणी• गुणराणी गौरविती ते यथार्थ अभिमानी. ७

साधा रे साधा तूं साधो ! स्नेहाळ आणि उपकारी,
कृत्रिम तुला न ठावें साह्य तुझें जाहलें मला भारी. ८

भेटेन केधवां तरि, पंत ! अशी धरुनि मीं असे खंत,
होते भेट कशाला ? पंतांचा हाय जाहला अंत ! ९

आतां दिवंगताशीं स्नेहाच्या विनिमयास आधार,
एकचि उरला; तो हा दिला तुला केवलाश्रु–करभार. १०

अश्रूंवांचुनि दुसरें येथें स्वर्गीयसें दिसेना तें;
ह्यांनींच तेथल्याशीं बांधव येथील बांधिती नातें. ११

कीं दहिंवरेंचि साचीं करुणरसाचीं सुदिव्य निर्मळ तीं,
मुखकमलावरि गळती, प्रणयरवीच्या प्रभेंत झळझळती. १२

घेवोनि हृद्गताला जंव नेत्रांतूनि चालती धारा,
तंव निर्वाणपदींही तारेवांचून पोंचती तारा. १३

प्रेमाचें काव्याचें सुखदुःखाचें असेल जरि कांहीं
पर्यवसान अनुत्तम, तरि तें अश्रूविना दुजें नाहीं. १४

नाहीं स्पृहा कशाची, माझें रडणें नसेचि मोलाचें,
कविमित्रा! तुजवरिच्या प्रेमाचें हें तया अमोलाचें. १५

गेलेच मोगरे कवि! नेले नंदनवनांत दूतांनीं
येती परत कशाचे! पिउनि सुधा रंगले दिवंगांनीं. १६

आतां रिक्त तयांची येथिल मंडित करावया जागा
येतो पुढें कवण तो? पाहूं द्या मज तया महाभागा. १७

प्रकाशन–नवयुग
एप्रिल, १९१५.

## १९. महाराष्ट्र-दर्शन

“ नित्यं ब्रह्म यथा स्मरन्ति मुनयो हंसा यथा मानसम्।
सारङ्गा जलदागमं, वनगजा ध्यायन्ति रेवां यथा; ॥
युष्मद्दर्शनलालसा प्रतिदिनं युष्मान्स्मरामो वयम्।
धन्यश्चिन्तित वासरोऽयमुदितो यत्रावयोः संगमः ॥ १ ॥”

पृथ्वी

सचेतन सुमुर्तिमान् मजपुढें महाराष्ट्र हा,
द्वितीय मम जीव हा, हृदय हा, जिव्हाळाचि हा;
रसाल कवितेस हा उगम, तींतलें ओज हा,
तुडुंब भरला दिसे प्रणय हा, महानंद हा. १

सबाष्प नयनें, उभा जवळ, पाहतो यास मी,
निघे न परि शब्दही, मन जणों भ्रमे संभ्रमीं;
अति प्रणय ज्यांमधीं, रुचिर दर्शनीं त्यांमधीं
असाच घडणार हा मधुर मुग्धतेचा विधी. २

अहो नयन चांगले असुनिही दिसेना मला,
मुका नसुनि तोतरा सहज बोलवेना मला;
मतीहि ढळली नसे, तरी कसें सुचेना मला?
किती मन उचंबळे! परि न दावितां ये मला. ३

तयांतिल तरंग हे थडकती तरंगांवरी,
उभे पुलक राहिले स्फुरणशील अंगांवरी;
मृणाल–बिसतंतुला मृदुल बंध जी लाजवी,
तयें नखशिखान्तसा जखडिला इथें हा कवी; ४

कुणी न बघती तया किमपि बंधना कोमला,
विमुक्त दिसतो जरी, तरि न हालवे हो मला !
महा प्रबल शृंखला दगड घालुनी तोडवे,
कसोनि परि बंध हा मज न तोडवे सोडवे. ५

बऱ्या निगड बंधनीं घडति ज्या मना वेदना,
महा कठिण ह्या परी प्रणय–बंध–संवेदना !
किती सुखद दुःख हें ! अमृतही फिकें यापुढें,
गमेल मज मुक्तिचें सुखहि यापुढें बापुडें. ६

किती दिवस भेटलों न हि मदीय राष्ट्रा ! तुला
खरेंच ! न विचारिलें कुशलही सुराष्ट्रा ! तुला;
अगा ! वद खुशाल तूं असशि कां जिवाच्या जिवा !
तुझ्यासह न बोललों म्हणुनि रोष केला तुवां ? ७

परी क्वचित मौन हें प्रवचनें करी प्रीतिचीं,
तयांत हृदयंगमें असतिही प्रमेयें तिचीं;
मुकें कमल बोलतें, मधुर काय उद्गार ते !
किती भ्रमर ऐकती हितगुजांतलें सार तें ! ८

न येति परिसावया हृदय जेधवां कांपतें,
रसाल फुलल्यावरी घुमति पंचमालाप ते;
तरी, करुं नको असें, धरुं नको मनीं किंतुला,
तुला समजतों किती प्रिय, नसे तयाची तुला. ९

तुला कधिं बघेन मी म्हणुनि नित्य खंतावलों,
तुलाच मम वाङ्मनें परि करावया धांवलों;
स्वबंधु, अभिराम तूं, मजसि भेटसी राम तूं,
तुला बघुनि येतसे भरत-भाव माझा उतूं. १०

विराज झणिं माझिया हृदयरूप सिंहासनीं,
स्वयेंचि अभिषेकितों नयनसिंधुच्या सिंचनीं ;
इथें प्रणयमंत्र हे प्रणवमंत्र घोषापरी,
इथें सु-कवनें तुरे, भरिति मंगलें माधुरी. ११

स्वराज्य मन आमुचें तदुपरी महाराष्ट्र ! तूं
प्रभामय विराजसी असिसि राजसा राम तूं ;
बघोनि उदयाचलीं मदभिराम-चंद्रा ! तुला
चकोर कवि हा तुझा उडुनि आज आलंबला. १२

अनंत विमलान्तरीं तरति कल्पनेचीं पिसें,
अखंड तव मंडला-विण मला न कांहीं दिसे;
सतेज अनुराग दे तुजसि आङ्ग्लनामा रवी
पिशंग तुज रंग ये उदयकालची थोरवी. १३

अशेष घडतील या तव कला त्वरें सोज्ज्वला,
विशेष दिसशील तूं प्रिय सुराष्ट्र-चंद्रा ! मला ;
अनंत अवधी-मधीं तव कृपा सुधास्यंदिनी
जणों धवल चंद्रिका अनुभवीन आनंदिनी. १४

अगा जिवलगा ! तुला त्यजुनि सांग जाऊं कुठें ?
वनांत कवनास या रुदनतुल्य गाऊं कुठें ?
तुझ्यास्तव भवांतले प्रबल पाश तोडीन मी,
परी कधिं न मोडिलें मन तुझें न मोडीन मी. १५

तुझ्यास्तव शरौघही हृदयवज्र साहील हें,
परी दुखवलास तूं कुसुम तों न राहील हें.
असें–अदय, अंतकें–हृदय भेदिलें, छेदिलें
तरी प्रणय तत्त्व हें तुजसि मीं दिलें तें दिलें. १६

मला तव उपासका व्रत तुझीच आराधना,
कसें करुनि साधतां सकल साधली साधना;
सुराष्ट्र ! तुजकारणीं विधि मला असा जन्मवी,
प्रसन्न न करी तुझें मन तरी कशाचा कवी ! १७

परेमधिल शब्दहो ! क्षणिं उभे रहा कीं रहा !
वसंतपवनावरी झुळझुळां वहा हो वहा !
म्हणा प्रणयगान या मदभिरामचंद्रास या !
न ये परत वाल्मिकी ! हटुनि बैसतां कासया. १८

चारुचामर

जड भाव पार्थिव राहिले बहु खालती पृथिवीवरी,
नुसतें अनंत सभोंवतीं दिसतें महा जलधीपरी;
विलसे तयावरि चिन्मयी तव चंद्रिका अमृतोपमा,
बघ रामचंद्र ! तुझीच ही प्रिय जानकी अथवा रमा. १९

श्रुति, तत्त्व, शास्त्र, कला तसे इतिहास वाङ्मय जाणते
तव लोक हे अवलोकितों ग्रह–तारकादि-समान ते;
अयि राष्ट्र, ह्या जनतेंतुनी तव तत्त्व एकचि वागतें,
स्थिरजंगमांतुनि ज्यापरी परमात्मतेज विभागतें. २०

परमात्मतेज तसें तुझें अधिकोन तत्त्व वसे जसें,
जय, वंदनें, अभिनंदनें जन पावती सहजीं तसे;
परि तन्निधी यतिंना जसा, कविंना तसा गमनीय तूं,
कमनीय तूं, रमणीय तूं, जगतासही नमनीय तूं. २१

प्रकाशन–नवयुग,
जून १९१५.

## २०. धन्यवाद

[ कै. सौ. रमाबाई काटदरे यांस ]

देवी! तुझा पति कवी रस जाणणारा,
येथें परंतु चतुरे, चकला विचारा!
तो काव्य अंतिम तुझें म्हणतो अपूर्ण,
गेलीस तूं करुनि तें परि पूर्ण पूर्ण. १

जें पूर्ण होय सहजीं स्वयमेव त्याला
द्यावा विजोड मग जोडुनि कासयाला?
जाणोनि तात्त्विक तयांतिल आशयातें
सोडील माधव रमा-धव संशयातें. २

ठेवावयास्तव सदा निज नांव मागें
जो ध्यास, वेड अथवा तुजलागि लागे,
उद्विग्न त्यांत असतां तुज नीज येते,
तों स्वप्न तूं बघसि, अन्य म्हणूं नये तें. ३

होतें खरोखरचि तें लटिक्या जगाचें,
त्यांतील नाम अथवा नहि रूप साचें;
तें आज ना तरि उद्यां जरि जाय नाशा,
आशा तदीय करणें म्हणजे दुराशा. ४

हा स्वप्न-भास लटिका, सगळा पसारा,
यांतील यत्नहि असाच असार सारा;

तत्त्वार्थ हा करुनि सूचित थांबलेलें
तें लीलयाच तव काव्य इतीस गेलें. ५

मृत्कुंभसंभृत जरी असलें, असेना !
पीयूष ! यांत मज दोष मुळीं दिसेना.
मानोनि देशभगिनी ! तव हा प्रसाद
प्यालों, तुला कळवितों बहु धन्यवाद. ६

प्रकाशन–नवयुग,
जानेवारी १९१६.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम 373८१ वि: ...
क्रमांक ... नों. वि: ...

## २१. समजूत

( राग—असावरी. )

राग नको आणूं ॥ कुमारा ॥ राग० ॥ ध्रुव० ॥

मन्मन सागर वात्सल्याचा,
अंत न लागे तुजला याचा,
यांत अनल तो तव वचनाचा
विझला परमाणू । कुमारा ॥ राग० ॥ १ ॥

तव ताताच्या निधनें झाला
जो व्रण माझ्या मृदु हृदयाला,
त्वद्गुणतैलें भरुनि निघाला,
हें सुख किति वानूं ॥ कुमारा ॥ राग० ॥ २ ॥

दत्तमनाचा घेउनि शेला
ये भेटाया या आशेला,
ती ममता दे या ममतेला,
दत्त तुला मानूं । कुमारा ॥ राग० ॥ ३ ॥

लडिवाळा तूं प्रियतर कैसा ?
किंबहुना हा भास्कर जैसा
तूंहि मला जो दुखविल ऐसा
भेद नको जाणूं । कुमारा ॥ राग० ॥ ४ ॥

शावक तूं मम कविगरुडाचें,
करपंजरिं या येउनि नाचें;
चल पाहूं ये ! काव्य यशाचें
धवलगिरी सानू । कुमारा ॥ राग० ॥ ५ ॥

प्रकाशन–नवयुग,
फेब्रुवारी १९१६.

## २२. कविवर्य लेंभे यांची कविता.

" She moves a goddess, she looks a queen. "
— Homer's Iliad.

ही येतांच उठोनि कौतुक जणों नेत्रांतुनी पाहतें,
धांवोनी अवधान ये लगबगां, कानीं उभें राहतें;
देण्याला बहुमान मान लवते, उल्हास ये मानसा,
वाटे आज शरत्-प्रभात नटुनी ही येतसे राजसा. १

हंसाचें गतिचित्र दाविति,—किती नामी पदन्यास हे !
भाषेची सरणी रसज्ञ कविला साधे न अन्यास हें.
ऐशीं रम्य विशेषणें विलसतां स्नेहाळ संबोधनें,
व्हाया सन्मुख चित्त चुंबकमणी ते कासया शोधणें ! २

ह्या पंक्ती मजला हळूच म्हणती अभ्यंतरीं बाहुनी,
वायूच्या झुळुकी सुखावह तुम्हां होतात का याहुनी ?
आम्हीही मृदु आणि कोमल असूं, मंजूळसें गातसूं,
आम्हां सोडुनि त्यांस वानिति कवी येतें तयांचें हंसूं. ३

सारी सुंदर, सौम्य, गोड रचना देते प्रसादासवें
प्रेमानंद मनीं भरोनि, नयनीं ही वाहवी आसवें;
ना गंधर्वपुरांत उंच तळपे होवोनि सौदामिनी,
सत्ता सद् हृदयावरी करितसे, ही भूवरी भामिनी— ४

देवी वागतसे जणों दिसतसे गंभीर राणी जशी,
हीचें दर्शन वाचकांस म्हणजे आहे शिराणी जशी.

ओजानें करुण – प्रधानरस ही जीवंतसा दाखवी,
निर्माता जन जो हिचा निपुण तो आहे कवी हो कवी ! ५

माझा मित्र असो नसो मम तया सप्रेम हीं वंदनें,
तो दीर्घायु असो, सुखांत विलसो सन्नंदिनीनंदनें;
अर्वाचीन कवींत मान मिळवो अग्रेसराचा सदा,
त्याला नित्य असो प्रसन्न कविता कीर्ती तशी संपदा. ६

प्रकाशन — नवयुग
सप्टेंबर १९१६.

## २३. काय हो चमत्कार !

" भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि "

—कालिदास.

( १ )

आबालवृद्ध जनहो, ऐकुनि घ्या सावधान कानांहीं
काव्यकथा कथितों ती; असा चमत्कार ऐकिला नाहीं
बहु राजकारणीं ज्या चमकविलें तेज रंगरावानें,
सर्वस्व रामचरणीं अर्पण केलें अनन्य भावानें,
त्या सरदार नराचें आहे गोदावरी-वरी ओढें—
गांव सुरम्य असें कीं तयाकडे मन वरीवरी ओढे.
घनदाट आंबराया, सुपीक काळ्याकभिन्नशा जमिनी,
विमल निरामय गोदा, ध्यान करावें खुशाल संयमिनीं
ग्रामपंतींचा वाडा भव्य असा, चिमुकलाच बाजार,
निर्मळ घरदारांच्या शेतकऱ्यांचा विशेष शेजार.

( २ )

पूर्वीं एक धनाजी म्हणुनि कुळंबी वसे अशा गांवीं,
गावी कीर्ति तयाची गांवकऱ्यांनीं दुजांस सांगावी.
राबे शेतामाजीं धरुनि अहोरात्र तो चिकाटीला,
ऐदी शेतकऱ्यांपरि न संकटांच्या करी हकाटीला.

यापरि परिश्रमानें निज कार्यामाजि दक्ष राहून,
झाला सधन धनाजी कृषि करणाऱ्या जनेतरांहून.
जंव नंदनवन-वैभव आणुनि त्यानें मळ्यांत सांठविलें,
तंव गृह राजाऊनें ओढ्यांतिल इंद्रभवन थाटविलें.
स्थल, जल, वस्त्रें, पात्रें, निर्मळ ती टापटीप सर्वांची
ठेवी; प्रेमळ वागे, ओळख भोळीस त्या न गर्वाची.
नमुनेदार धनाजी, धनीण त्याची बघोनि राजाऊ,
ज्याला त्याला वाटे, क्षणभरि त्यांच्याकडे चला जाऊं.
' पाटिल ' ' पाटिल ' म्हणुनी जो तो गौरव करी धनाजीचा,
पण नवल काय? लोकीं गौरव नसतोचि निर्धनाजीचा.

( ३ )

तीं एकजीव दोघें असुनि असे त्यांस दूसरा जीव,
कन्या ' जिऊ ' म्हणोनी; तत्प्रेमालय—रसाल राजीव!
गोधूमवर्ण तीचा हरणाच्या पाडसापरी डोळे,
स्नेहाळ वदन नामी, प्रसन्न विधुबिंब जेंवि वाटोळें.
तो केशपाश काळा, भाळावरि लांब आडवें कुंकू,
जणुं म्हणति शब्द तीचे आम्ही कोकिलरवासही जिंकूं.
घेती पाटिल साड्या हौसेच्या रेशमी किनारीच्या,
ऐनेदार खडीच्या झळकति चोळ्या तया कुमारीच्या.
साधींच कंकणें तीं, कदा तदाकार नागमोडीचे,
शोभति शुद्ध रुप्याचे तयांवरी गोल गोठ जोडीचे.
येतां सुदिन सणाचा पुतळ्यांची गाळ ती गळां घाली;
तेव्हां शृंगाराच्या माहित नव्हत्या नव्या तऱ्हा चाली.
जाई आईसंगें मळ्यांत किंवा खळ्यांत ही कन्या;

साधी निसर्गसुंदर दिस तदा देवता जणों वन्या.
अपवादास्पद जितकी रूपवती गुणवतीहि ती तितकी,
बहुधा गुणरूपांचें व्यस्तचि दिसतें प्रमाण मूर्तींत कीं !
कांतीव सूत, ऐशा येत तिला शेवया वळायाला,
ह्या फेण्या ! म्हणुनि तिच्या लोकभ्रम कुरडयांवरी झाला.
लावोनि गुळवणी वा पुरण करी सार ती मजेदार;
ऐसें कीं तें सेवुनि हुशार व्हावा मनुष्य बेजार.
गुलगुलित मलमलीपरि करी झराझर कशा पुरणपोळ्या,
काढुनि सुंदर कशिदा तिनें शिवाव्याहि रेखिल्या चोळ्या.
ती निंदणी, खुरपणी, जाणे बारीक काम शेतीचें,
केवळ राजाऊचें वळण जसें उतरलें तसें तीचें.

( ४ )

ऐशा जिऊस आले बहु कर्षक मागणीस घालाया;
परि पाटील धजेना त्यांतिल एकासही तिला द्याया.
कांहीं ना तरि कांहीं स्थळांत ये आढळोनि कमताई.
त्याला जिऊ लहानचि, वाटे इतकी करूं नये घाई.
थोर घरंदाजाला, तरुणाला, सुगुणरूपवंताला
द्यावी निज कन्या ही उत्कंठा कोणत्या न ताताला ?
त्या चिंवट मोहजालीं पाटिलबाबाहि गुंतले गेले,
त्याहीं पुष्कळ व्याही आले तैसेच पावते केले.
कन्या धन परक्याचें तें विधिनें जाय नेमिल्या ठाया,
जाणोनि लागले ते स्वस्थ मनानें स्वकाल कंठाया.
तंव यौवनें हळू हळु ठेवियलें त्या जिऊंत पाऊल
मायेमुळें धनाजी त्याची ऐकूं शके न चाहूल.

( ५ )

ग्रामस्थ तरुण कर्षक, उपनावें म्हणत ज्यास ‘ घायाळ, ’
त्यास जिऊनें केलें अपांगबाणें क्षणांत घायाळ !
प्रथम विकाराची ती प्रथमचि ये त्याचिया मना भरती;
थरथर कापूं लागे, आले रोमांचही वपूवरती.
रसना शुष्क जहाली, शब्द निघेना मुखांतुनी नीट,
लागे हृदय उठाया, घाबरला तो असूनही धीट.
विसरोनि भान सारें ध्यान जिऊचेंच लागलें त्याला.
त्याला दोष कशाला द्यावा ? आधीं अहो, विधात्याला.
तो विषमता भवाची संतत ठेवी विजोड जोडून,
तोडुनि सजोड टाकी तन्मृदु हृदयेंहि तोच फोडून.
त्याच्याच योजनेनें पाटिल नेई मळ्यांत मदतीला,
शिवबा घायाळाला, तो निरखी तैं जिऊस सुदतीला.
दर्शन, सहवास, पुढें भाषण, अनुनय तयांमधें चाले;
प्रेमाचें परिपोषण अशा क्रमें परिचयासवें झालें.
ती पाडाचे आंबे मिळतां शिवबास आदरें देई,
ताजा सुरस उसाचा शिवबा आधीं जिऊकडे नेई.

( ६ )

एके दिनीं सकाळीं शेतांतिल लोक पांगले गेले,
हें पाहुनि शिवबांनीं प्रेमाचें मागणें तिला केलें.
किन्नरमिथुनासम तीं द्राक्षीच्या रम्य मंडपाखालीं
कांहीं गुंजन करितां अदृश्य तेथेंचि दृष्टिला झालीं.
एका क्षणप्रभावें बनलीं अन्योन्य मित्र जिवलग तीं.

लगबगती भेटाया, भेट न होतां मनांत तगमगतीं.
भारोनि टाकिलीं जणुं जादूच्या पूर्णसिद्ध मंत्रानें;
वागति भिन्न जनांमधिं तथापि विजनांत एक तंत्रानें.
प्रेमाचा ओढा हा संथ सरळसा कदाहि वाहीना.
सूक्त महाकविचें हें सत्य जहाल्याविनाहि राहीना.

( ७ )

हिरव्यागार गव्हांचे लोंबर भाजुनि खळ्यामधें मळले.
ओंब्या तयार झाल्या; प्रियजन चित्तांत फार तळमळले.
आडोसाच दिसेना घाया ध्यास त्यांस तो घांस;
हृदयांतिल उकळीनें नच राहवलें परंतु दोघांस.
तेथिल जनदृष्टीला चुकवोनी नव नवाळ ती ताजी
प्रेमी परस्परांच्या घालिति सस्मित अशा मुखांमाजीं.
भुरकोनि कोरड्याला अधरसुधा गोड! मारिती मुरका.
हाय जिऊ! हा शिवबा! नाशाला जाहलांत आतुर कां?
रे, पाहिलें तुम्हांला पाळत ठेवोनि त्या धनाजीनें.
काय? धनाजीनें? नहि, त्याच्या रूपें अहो यमाजीनें!
हे प्रेममद्यपीहो! स्वपिता–संगोपिताच जो दिसला,
त्याचा रूपविपर्यय नेणुनि धुन्दीमधें तुम्ही फसलां.
शिवबा! प्रमदवनांतिल बोराचा जाहलास भक्षक ना?
तो बघ तुज डसला, बसला होता तयांत तक्षक ना!
ह्याची परि क्षिती-तुज-भान कसें रें न राहिलें राया!
पण, भवितव्य न येतें ज्ञानी पुरुषासही निवाराया.
जीव जीऊस्तव टाकीं, आतां स्वगृहास जाऊनी बैस;
होणार जें तयाला सादर–बैसोनि तेथ–तूं ऐस.

(८)

झाली सकाळ गगनीं सूर्य वरी कासराभरी आला,
थंडी थडी करितां आले शेतांत लोक कामाला.
झुंजुरकांच उठोनी सर्वां आधीं मळ्यांत आलेले
आशाळभूत शिवबा होते मोटेवरीच वसलेले.
आलाप उंच त्यांचे येणारांच्या पडोनिया कानीं,
आश्चर्य फार केलें रेंगळणारांतल्या अनेकांनीं.
आज धनाजी आला सर्वांमागुन हळूच शेतांत,
विहिरींतिल पाण्यापरि सखोल, मौनीहि तो दिसे शांत.
सविनोद 'कारबारी!' अशी न दे आज हांक शिवबांला.
हें वैपरित्य पाहुनि गेला त्यांच्या उरीं जणों भाला.
ते प्रश्न करिति कांहीं, पाटिल उत्तर उणें न दे नीट.
कळलें घायाळाला, कीं आला यांस आपला वीट.
राजाऊ न जिऊही आज दिसे. पण कसें विचारावें?
सैरावैरा त्यांचें मन वनवातापरी तदा धांवे.
त्यांना काम सुचेना, आणियलेली रुचे न भाकरि ती.
कांहीं निमित्त सांगुनि धनाजिला राम राम ते करिती.

(९)

तिसरा प्रहर सरोनी रवि चाले मावळावया खालीं.
पिंगटवर्ण जसा तो वनलक्ष्मीही तशीच ती झाली.
ह्या समयीं प्रति वस्तू म्लान, उदासीन भोंवतीं दिसली.
शिवबाची समदुःखी सृष्टी देखील काय हिरमुसली!
दुःखी घायाळानें खालीं घालोनि मान मौनातें
सेवोनि वाट धरिली संगें घेवोनि आपलें नातें.

जणुं फाटक्या मनामधिं ह्रदयाचे सर्व बांधुनी तुकडे,
तो मंद पावलें तीं जिकडे नेतील चालला तिकडे.
श्वासहि मंद वहाती, बाष्पानें पथ दिसोनि अंधुक तो
वाटे तयास जातो आज घरीं कीं धुक्यांत या चुकतो.
गांवांत ये कसा तरि, गमे जिऊला बघोनि मग जावें;
पाटिलबावा ह्यांच्या जाय घरावरुनि तो अशा भावें.
तों कुलुप सायखेडी आलें त्यांच्या दिसोनि दाराला.
घायाळ 'आ!' करोनी आकाशाच्या बघे विदाराला.
हें जग शून्य जहालें, हालेना जागचा उभा राही,
कांहीं एक न बोले, नुसता तो शून्य दृष्टिनें पाही.
एका वाटसरानें त्याला यापरि बघोनि थिजलेला,
हातीं धरोनि त्याच्या घरांत नेऊनि पोंचता केला.

(१०)

धांदल!– एकचि गजबज तेथ उडाली तया सभोंतालीं.
त्याचे वडील, त्याचीं भावंडें, जवळचीं जमा झालीं.
करिती प्रश्न परोपरि उत्तर म्हणुनी मिळे न एकाचें.
मग काय हो पुसावे तरंग केवळ अजाण लोकांचे?
कांहीं डसलें याला, कोणी म्हणती कुठें तरी भ्याला,
गेला झपाटला तों वदति कुणी वायु जाहला ह्याला.
रखमाऊनें त्याच्या डोक्यावर गार शिंपिलें पाणी.
कांहीं सावध झाला, तुटक विसंगत अशी वदे वाणी :—
"कोन तुमी? राजाऊ! पन इत्का राग ह्यो कशापाई?
"नग कारबार तुमचा! जिऊ म्हनुन् कां हितं दिसत नाई?
"म्यां राम राम क्येला. पाटिल नव्ह का खळ्यात ह्ये आलं?

“ कोन जिऊ ? जात्वो मी घरास. पन ह्ये असं कसं जालं !
“ येडा जाला येडा ! ” रखमाऊनें निदान हें केलें.
ती त्यास धरुन बसली. वडील पाटिलबुवांकडे गेले.

## ( ११ )

नुक्ती परगांवाहुनि आली होती घरास राजाऊ.
कोंडाजीस म्हणे “ या ! लइ जाली रात, द्या दिवा लाऊ. ”
पाटील तोंचि आले. केलें आश्चर्य ऐकुनी त्यांनीं;
गेला निरोप घेउनि म्हणति, पुढें–हात ठेविती कानीं.
संशयसंभ्रम सगळा. मग म्हातारा पुसे, “ करूं काय ?
पाटिल, उपाय सांगा, माझे हो आज मोडले पाय ! ”
देउनि धीर धनाजी बोले, “ दावा कुण्या शहाण्याला ;
पैसेहि घ्या हवे तर कांहीं द्यायास वैद्य-वाण्याला.”
तो कष्टानें उठला. सौदा घे जवळच्या दुकानांत,
येउनि रखमाऊच्या कुजबुजला चार शब्द कानांत.
दोघें तटस्थ झालीं, आलीं शिवबा तदा जिथें निजला;
वक्षःप्रदेश त्याचा वात्सल्याच्या टिपें टिपें भिजला.
अंगावरोनि फिरवी म्हातारा तेंवि हात म्हातारी;
म्हणती देवा ! मारीं तूं आम्हांला परंतु हा तारीं.
खाई पिई न कांहीं भरावया त्यास लागला ताप.
बडबड ऐकुनि त्याची गडबडली वृद्ध माउली बाप.
जे जे उपाय करिती, अपाय ते तेच लागले व्हाया.
दैवगती फिरवाया भगीरथाचे प्रयत्नही वायां.
हां हां म्हणतां जाउनि कांट्याचा नायटा विकोपाला,
तिसरे दिनीं यमानें सायंकालींच घातला घाला !



[illegible]

'शिवबा !' म्हणोनि फोडी रखमाऊ माय धाय हंबरडे
पाषाणही दुभंगति ऐसा तो दीनजनकदंब रडे.
रखमाऊ, कोंडाजी, सर्व मुलें करिति एक आक्रांत ;
ऐकुनि पाटिल आले, म्हणति धरा धीर व्हा जरा शांत.
सांत्वन करोनि त्यांचें सर्वांचें घेउनी पुढाकार,
आला प्रसंग वेंचुनि धनहि धनाजीच पाडती पार.
जिकडे तिकडे झाला स्वस्थपणा एक लोटतां मास ;
रूढीस अनुसरोनी जो तो लागे स्वकीय कामास.

(१२)

शिशिर ऋतूची थंडी. फिरकूं देना कुणास बाहेर.
काळोख्या रजनीचें विश्व जहालें भयाण माहेर.
तारे बघोनि भासे काळ सहस्राक्ष हे वटारोनी
भोंतीं स्वभक्ष्य शोधी तंद्रा आलस्य दूर सारोनी.
खारी हवा सुटोनी कांटा येउनि शरीर हें थरके ;
काय शरीरकथा ती त्यांतिल काळीजही जरी चरके ?
शकट खड्यांतुनि धांवे त्याच्या ध्वनितुल्य दांत खडखडती ;
हुंकार करुनि वारा वाहे, ऐकुनि उरेंच धडधडती.
सळसळ वाजति पानें, रात्र करी किर्र् किर्र् संततशी ;
किंकाळे टिटवी त्या सटवीला नहि जरा उसंत कशी.
लागोनि गाढ निद्रा सुनाट झाली अशेष जनवसती ;
कोठें विवळति कोल्हीं तों कोठें ग्रामसिंह वसवसती.

(१३)

ऐशा शून्य, भयानक, काळोख्या मध्यरात्र समयाला
दिंडोरी या गांवीं, गाडी यावी, असा ध्वनी झाला.

दगडू झुंजाराच्या दाराशीं एक थांबलें भिरकें;
खडखड कवाड झालें ' जिऊ ! ' अशी हांक अंतरीं शिरके.
खडबडुनि होय जागा, देई झुंजार कान वांकोन;
तंव ' जिउ जिऊ ! ' अशी ये साद पुन्हां, तो तदा पुसे ' कोन ? '
" उगडा कवाड उगडा " ह्यो नव्ह परका, मनुक्श वळकीचा;
" मी वोढयाहुन् आल्वो न्यिरोप घ्येउन्शनी धनाजीचा. "
ऐशी गडबड होतां उठति घरांतील माणसें सारीं;
उघडुनि कवाड आले, दगडू झुंजार ठाकले दारीं.
तिरपा हात दिव्याला लावुनि शिवबापुढेंच तो धरिती;
' या पाव्हनं ! ' म्हणोनी स्वागत ते विस्मित स्मितें करिती.
इतक्यांत लगबगीनें उठुनि जिऊ ये मनीं सुखावोनी:
मामामागुनि वांकुनि निरखी हरिखोनि शिर तुकावोनी;
" ह्ये बैल भडकल्येती, वोढा घ्येती घराकडे जाया;
" पाटिल मला म्हँगालं घ्ये भिरकं जा जिऊस अनाया.
" झुंजाराला दंड्वत् सांगुन् घ्येउन्शनी तिला ये तू
" रात्वोरात घराला. जिउवर त्येंचा लई–लई ह्येतू !
" थंडी-वारं-म्हुन्सटि बनातबी ह्ये बगा दिली संगं.
" अट्पा क्लिगिविगि आता." ऐकुनी झुंजार जाहले दंग.
माणूस पाटलांचा, वस्तू, खाणाखुणा, तयां पटल्या.
किंतू परि वेळेचा ये निकडीचा तसाच शेवटल्या.
होती तथापि शक्ती या समयाला अजिंक्य शिवबाची.
दगडू मामा बघती जाउनि भिरक्यांत बैसली भाची !
बैल कशाचे ? वारें ! निघोनि गेलेंहि भिर्र तें भिरकें !
झुंजाराचें काळिज मांजरपाटापरी उभें चिरकें.

93809

(१४)

वस्तुस्थितिचा गंधहि जिऊस नव्हता भिऊन जायातें
सहजचि त्या देहाशीं वागे सप्रेम जेंवि जाया ते.
स्पर्शुनि त्यास म्हणे ती “काल्यावानीच जालया आंगे;”
“माझ्या जिवा!” म्हणे तो, “क्वोनासाटी खरंच तूं सांग!”
या थंडी–वाऱ्यानं माजा ग्येला परान गे रानी!
“त्येवी स्वोसुन् आल्वो धावत न्याया तुला भुतावानी.
“ड्वोक लईच दुक्तय् घे काई ते कसून बांदाया
(च्वोळीवाचुन् संगें नाई काईच आनलें राया!)
“चालल, घे या वस्ती, च्वोळीबी वांदत्वों कपाळाला.
“माजी कपाळाची दिसेल व्हय रातची सकाळाला?”
प्रेमा! तव राज्यामधिं अघटित म्हणुनी न एकही बाकी.
हृदयत्राण जिऊचें करिति शिरस्त्राण तेंच शिवबा कीं!
हें कृत्य होतसे तों आलें ओढें, – धनाजिचें दार.
शिवबा म्हणती, “येत्वो स्वोडुन् ह्ये बैल, हांक तर मार.”
जाय जिऊ दाराशीं, गेले घायाळ बैल सोडाया;
जे गेले ते गेले गंगथडींतील आपल्या ठाया.

(१५)

इकडे हांक जिऊची गेली भेदूनि तातमर्मा ते
तिजला घरांत घ्याया येती मारोनि हात कर्मातें.
उघडोनि दार पुशिती. जिऊ? कशी सांग येथ आलीस.
कोण बरोबर होतें? ऐशा रात्रीं न काय भ्यालीस?
ऐसें कैसें पुसतां? उलट विचारोनि सर्व सांगे ती;
ऐकोनि दंपतीच्या अंगाला घाम–शाहरे येती.

डोळ्यांला अंधारी येउनि दोघेंहि बैसलीं खालीं;
वाणी कुंठित होउनि आईबापें तटस्थ तीं झालीं.
इतक्यांत पाटलांना सुचलें, कीं सत्य तें हिला कळतां,
बिथरेल भेदरोनी मलाहि येईल ही न आकळतां.
स्त्रीला संकेतानें दाबुनि म्हणतात, शेक लेकीला;
ह्या आजच्या हिंवानें आले सारेहि लोक टेंकीला.
गोठ्यांत जाउनी मी बैलांचा शोध घेउनी येतों.
थकले असतिल. त्यांना वैरण नसल्यास टाकुनी देतों.
येवोनि पाहती, तों ते होते देत लांब सुसकारे,
तोंडास फेंस येउनि घामानें चिंब जाहले सारे.
हे दामटीत नेले, मनांत म्हणती, परंतु शिवबानें?
कीं नांव करुनि त्याचें केलें हें काम अन्य भिवबानें!
मुलगी म्हणते चोळी त्यांस दिली मीं कपाळ बांधाया;
यांतील सत्यता मी जाउनि बघतों उद्यांच त्या ठायां.
होउनि भूत तयानें जर हें केलें असेल साचार,
चोळी तिथें दिसेलचि. नातर घेतों हिचा समाचार.

(१६)

ह्या निश्चयाप्रमाणें पाटिल त्या अंत्य भूमिला गेले;
लावुनि मजूर त्यांनीं उत्खात स्थान नेमकें केलें.
दिसली! ती बघ चोळी कंवचीला करकचून आवळली.
ओळख नीट, धनाजी! प्रेमाची खूण, सत्यता कळली!
भंगोनि हृदय ज्याचें परगांवीं पळविलीस लेकीला,
तो हाच दाविणारा देहान्तांतहि अपूर्व नेकीला!
ह्यानें अंध तमांतुनि हिमांतुनी करुनियां प्रवासातें,

आणोनि पोंचवीली तुझी जिऊ ती तुझ्या निवासातें.
थंडींत गारठोनी, उन्हांत भाजुनि, भिजोनि धारांनीं,
ह्यानेंच कष्ट केले मळ्या–खळ्यांतील त्या उभ्या रानीं.
रात्रीं राखण केली, जागुनि देवोनि तोंड चोरांशीं,
ह्यानेंच घातल्या बा तव धान्यांच्या तुझ्या घरीं राशी.
त्वां वाक्प्रहार करितां दुःसह संतप्त आयसाहून,
गेला घरीं बिचारा निमूट घायाळ घाय साहून.
सुतशोक मायबापां, तुमच्या जीवांस जीव देवोनी,
ह्यानें प्रेमापायीं त्यजिला निज देह येथ येवोनी.
झरुनि कलेवर गेलें, भुईंत अवशेष राहिलीं हाडें,
बघतो निराश, हंसतो हताश, दावोनि दांत दाभाडें.
बघतो, हंसतो, म्हणतो, कीं मीं चोळीच बांधिली भाळीं !
प्रेमानंदीं पडलों इथें, धनाजी, जिऊस संभाळीं !
त्याच सतीनें केला हा प्रेमाचा अमोल आहेर,
मम बहुमान जयाचा सोडुनि नेऊं नकोस बाहेर.
प्रेमीं वा संग्रामीं भग्नहृदय जे हताश मरतात,
ते, जगतांत तयांहुनि तात ! महामान्य वीर ठरतात.
बारे ! जिऊ सतीची, प्रीतीची त्वांच राखिली वाजू.
तूं सालस, नेकीचा, प्रेमळ नायक जगांत नांवाजूं.
ह्या मानवरत्नाची पारख पाटील ! जाहली असती,
तर संसारसुखाला भाग्यला अटक आपल्या नसती.
परि तें कसें घडावें ? कांहीं रत्नें, फुलेंहि मानव ते
न्हाया दृष्ट दिसावे, चतुर निसर्गास हें न मानवतें.
अतएव, जेंवि होतें अमोल नररत्न हें तसें झांकीं.
कां थिजलास धनाजी ! गेल्याचा शोक हा वृथा. जा की !

पाटिल घरास आले, पायपिटी ये करीत झुंझार.
पाहुनि जिऊस, ऐकुनि तेथिल इतिहास जाहला गार.
दिन दोन चार राहुनि धीर दिलासा दिला धनाजीला;
झुंजार परत गेला सोंपुनि मातापित्यांस भाचीला.
झांकेल सत्य कैसें ? कुठवर राहूं शकेल झांकून ?
कळलें जिऊस शिवबा गेले मज एकटीस टाकून !
ज्या तरुच्या आधारें जगोनि राहून जाय वर वेल,
तो पडलाच तिच्यानें जीव उभारी कुठोंनि धरवेल ?
खाणें पिणें रुचेना. कमी कमी होतसे तदाहार,
ऐहिक संबंधांचा, विषयांचा ये तिला तिरस्कार.
बैसे तिथेंच बैसे, उभी तिथें सारखी उभी राही,
पाही अहेतुनें तरि सहसा जलपूर लोचनीं वाही.
थरकत अधर मनाशीं क्वचित् वदे कांपरेंहि चांचरतें,
त्यांतूनि ' कारबारी ! ' ऐकूं ये एवढेंच ओझरतें.
प्रकृतीविषयीं पुसतां ती कंटाळुनि म्हणे बरी आहे.
तंव ती तीव्र निराशा निःश्वासांसंगतीं तिच्या वाहे.
कांहीं चैन पडेना. शिवबाचा लागला निदिध्यास.
दिवसंदिवस सतीच्या देहाचा होत चालला ऱ्हास.
आधीनें मन दुबळें, व्याधीनें जाहलें तनू दीन;
खिळली अंथरुणाला ती लव अवधीमधीं पराधीन.
उपचारांची नव्हती उणीव. एकहि परंतु चालेना.
होतां होतां मदतीविना तिचा हात तीस हालेना.
पिंगट कळा मुखावरि, हातांपायांचिया जशा काड्या,
अस्वाभाविक होउनि तिच्या वहायास लागल्या नाड्या.

घेवोनि पथ्य कांहीं एके रात्रीस लागला डोळा,
" आल्यें आल्यें ! " ऐसा तंव ती उठली करोनि आरोळा.
मुलगी भ्याली म्हणुनी पाटिल दचकुनि उठोनि सांवरती,
तों दार उघडुनी ती वीजचि गेली चतुष्पथावरती.
त्रेधा उडुनि धनाजी धांपा टाकीत जाउनी पाही ;
कुत्रीं विवळत असती. मनुष्य त्याच्याविना तिथें नाहीं !
जीव जिऊ हा पावे शिवबारूपी शिवांत आराम.
कां रडतसां धनाजी ! राजाऊ ! राम आळवा राम.

प्रकाशन–नवयुग.
जून १९११.

## २४. उत्कंठिता.

" आगन्तुं कृतचित्तोऽपि
दैवान्नायाति यत्प्रियः ।
तदनागमदुःखेन
विरहोत्कंठिता तु सा ॥ "

[ चाल– लावणीची. ]

(१)

पथापथांतुनि छायेछायेमधुनि किती हिंडतें,
जागोजाग तुला धुंडतें,
रम्य रुपेरी खळखळणाऱ्या ओढ्याओढ्यावरी
फिरतें ओढवुनी बावरी,
तरुराजींच्या वळणामाजीं, सीमांच्या संगमीं,
भ्रमतें पडुनि तुझ्या संभ्रमीं;
वळतें निराश मी मागती,
जळतें अपुली बघतां गती,
भलते विचार मनिं वागती,
सैरावैरा धांवुनि वेडें हें मन वाऱ्यावरी,
येतसे परतुनि थाऱ्यावरी.

(२)

खेदभरानें रात्रंदिन हें तनु माझें तापतें,
अंतर प्रेमानें व्यापतें,

येशिल नाथा! पुन्हां कधीं ह्या खंतीनें सारखी
अनाथा तळमळते ही सखी;
किती निसासे त्यजितें, झिजतें, मी बरळें, विव्हळें,
वियोगें अशी तुझ्या आहळें;
पाडुनि या हृदयाला घरे,
करुनी शांतीचें खोबरें,
छळिती किती विपदा-संघ रे !
कुणी कुणाच्या प्रेमावर कधिं असा बिबा फांसला
असे का? सांग सख्या तूं मला.

(३)

हें स्थल केवल भूतलवटिंचें नंदनवन साजतें,
जाहलें उदास परि आज तें!
येथिल मौजांवरुनी माझें दुःखचि फैलावलें,
सुखांना ग्रहण तयें लावलें!
मधुर सुगंधी बहु रंगेला वसंत मज भेटतो
वृथा! कीं विरह तयें पेटतो.
पालवी रमवीना कोंनला,
ताजा गुलाबही कोमला,
वाटे नको! असें हो मला,
कीं उपभोगी नेउनियां जें भोगांवरि वासना,
सजणा! त्वां हरिलें त्या मना.

( ४ )

बहु रंगांचें मोहर, झेले, कीं मधुचीं वैभवें,
पहाटीं अभिनव होतीं दंवें;

सुमनसुवासें दरवळलेल्या कुंजातें हालवी
परिमल झुळुक कशी कालवी ;
हे देखावे दिपविति डोळे केवळ राजावळी,
भंवत्या सर्पगती हिरवळी,
आंबे तम ज्यांतुनि दाटतें,
कोकिल बोलाविति भाट ते,
किलबिल संगीतच वाटतें,
वनदेवीच्या सुमार्दवाचा सुमधुरतेचा निधी !
तरि मज हा रमवीना कधीं.

(५)

हे तत्त्वांनो ! मी बडबडतें, व्यामोहा पावतें,
जिवाची ज्योत विझूं पाहते !
प्राणविसांव्या महाशया ! कां उशीर करिसी असा ?
मन्मनीं सवार हो ये कसा !
असला काल करालहि उभा,
तरि ये त्याची न धरीं मुभा,
दावी मुखचंद्राची प्रभा,
ये ये वेगें या करपाशीं-हृदयाशीं राजसा !
जिव्हाळा रामच माझा जसा.

प्रकाशन-महाराष्ट्रसाहित्य,
मुंबई. १९२०

## २५. शारदे !

जातीच्या सुमनापरी धवल जें, सद्गंध जें कोंवळें,
दर्भाच्याच तुऱ्यापरी शुचि तसें अत्यंत जें सोंवळें,
लोहाळ्यासम नीट जें, तरि तुला वाटेल तैसें वळे,
लोहातुल्य दुजांस, चुंबकगुणें तूंतेंच जें आकळे ; १

जें हंसासम उंच उंच गगनीं वातांतुनी पोहलें,
यानांतोनि सुकल्पनामय महा-मेरूस आरोहिलें,
माघारें गरुडापरी उतरुनी नीडांत जें राहिलें,
तें माझें मन शारदेस तुजला प्रेमेंच मीं वाहिलें. २

प्रेमानंद जया मनीं समरसे त्या काव्यमोदासवें,
त्यायोगें नयनांमधूनि गळती मोत्यें न तीं आंसवें,
पाणीदार, अमोल, दुर्मिळ, अशीं तीं चौगुणीं गुंफिलीं,
ज्या स्नेहाळ मनें ममत्व धरुनी देवीस तूंतें दिलीं ; ३

प्रेमी, सोज्ज्वल, तें उदात्त मन, जें वेडें तुझ्याकारणें,
त्याचीं सर्वहि ईप्सितें पुरवुनी त्वां फेडणें पारणें.

प्रकाशन— मनोरंजन, वासंती
१९२८ १९२९

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत. 

## २६. प्रेमाचें संक्रमण

जेव्हां रम्य सुवर्णचंपक असें तारुण्य कोमेजतें,
होतें अंधक तारकांसम तसें नेत्रांतलें तेज तें;
कष्टानें शिणतां शरीरबल हें ओहोटतें जेधवां,
चिंतेनें मन कांचतें बसुनियां आघातही केधवां. १

होतां पौरुष ह्यापरी मग उणें तो प्राप्तिचा साजरा
जेव्हां होउनि वाहतो झुळझुळां बारीक ऐसा झरा,
माया, आप्तजनांमधील ममता थंडावते जेधवां,
प्रेमाचें अनुकूल संक्रमण तें व्हावें कुठें तेधवां ? २

स्वर्गाच्या पद उंबऱ्यांतुनि पुढें जों एक संस्थापलें,
तों जायास दुजें इथें दिसतसे उत्थापलें आपलें;
सारा लोक फिका–मळूल–दिसतो हा खिन्नसा जेधवां,
प्रेमाचें अनुकूल संक्रमण तें व्हावें कुठें तेधवां ? ३

कोडें फार कठीण अप्रिय असें येवोनि माझ्यापुढें,
येथें आणि परत्र या अडकित्यामाजीं जिवाजी पडे;
एकांतीं मग बैसलों त्यजुनियां चिंता वृथा शोचनें,
हातांनीं दडपूनि घट्ट धरिलीं मीं आपुलीं लोचनें. ४

केलीं सर्व निजेन्द्रियें वळवुनी अंतर्मुखीं जेधवां,
प्रेमाचें अनुकूल संक्रमण तें झालें पुढें तेधवां.
मीं जागा असतां अलौकिक असें जें स्वप्न हें पाहिलें,
माझ्या हृत्पटलावरी उमटुनी अक्षय्य तें राहिलें. ५


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत. १११

आधीं भासतसे महा तुमुल हा संग्राम कीं माजला ?
होवोनी नभ धुंद धूसर रणीं कल्लोळही गाजला;
पल्लेदार कृपाण ते चमकती ज्यांतोनि लक्षावधी,
वीरश्री भरतीस येउनि तिचा आंदोळला अंबुधी. ६

भासे नंतर घोर वादळ महावातांतुनी चाललें,
भोंतीं काय विजा ! किती गडगडे ! ब्रह्मांडही हाललें !
हा आवेग हळू हळू मग पुढें मंदावला जेधवां,
प्रेमाचें अनुकूल संक्रमण हें लागे दिसों तेधवां. ७

साऱ्या दिव्य विजा थिरावुनि पडे जें एक त्यांचें कडें,
अंतर्बाह्य तयामधोनि तळपे चैतन्य तें फांकडें !
तेजाचाच झरा, किती द्युतिशिखा फैलावती, नाचती,
गायत्री जणुं ठाकली मजपुढें ज्वालामुखी साच ती. ८

त्या तेजोवल्यांतल्या मजसि ना केंद्राकडे पाहवे,
जिज्ञासेस न राहवे परि तदा, ती त्याकडे वाहवे;
वृत्ती एकवटोनि सर्व मग मीं अभ्यंतरीं प्रेरिल्या,
त्या ध्येयाहुनि भावना इतर तों होत्याच अव्हेरिल्या. ९

केंद्रांतून अतीव मंजुळ पुढें वाद्यांचिये बोल ते
येऊं लागति यापरी विशद कीं कोणी जणों बोलतें;
वाणी ती नव्हती, तरी तिजमधें ओथंबलें आगळें
दिव्य प्रेम किती ! अहा निवळ तो वाटे जिव्हाळा गळे ! १०

भाषा त्या स्वर-संगमांतुनि वसे जी, म्यां असें मानिलें,
तीचें केवळ शब्दचित्र म्हणुनी आहे पुढें वानिलें : —
ये माझ्याजवळीं तुझी करितसे खंती किती मी बरें !
मोहानें भुरळोनि कां भ्रमसि, हा व्यामोह आतां पुरे ! ११

मायावी रचना सुरम्य वरुनी जी भोंवतीं भासते,
ती तूंतें भुलवावया उभविली; जाणीं वृथाऽभास ते.
त्यांतें होउनियां पराङ्मुख मला,–मातें–सदा तूं पहा.
तूं माझी सय ठेव; ये विलग ये, मातें मिळोनी रहा. १२

माझ्यापासुनि दूर दूर वससी, जें दुःख तेणें तुला,
त्याचाही कटु-कंटकानुभव हा आला तुला जंतुला;
आतां सावध हो, स्मरोनि मजला तूं लीन माझ्यांत हो,
गेलें दुःख लयास जाणुनि तुला स्वानंद,–आनंद हो! १३

ह्या बोलासरशी समोर सहसा मीं जी उडी मारिली,
ती ज्योतिर्वलयीं अचूक शिरुनी, वेगें पुढें सारिली;
तेजोराशिमधीं मदीय कणिका तेथें मिळे जेधवां,
प्रेमाचें किती गोड संक्रमण तें झालें म्हणूं तेधवां! १४

प्रकाशन–रत्नाकर, पुणें.
१९२८.

# २७. प्रेमलोद्गार

" विरहीव विभो ! प्रियामयम्
परिपश्यामि भवन्मयं जगत् । "

— उपमन्यु.

( १ )

येवोनी वायूच्या । झुळुकी मवाळ
देती बहुसाळ । भास तूझा. १

तुझें आगमन, । तुझें संनिधान,
सुखाचें निधान । स्पर्श तूझा. २

काय वानूं त्याचा । येथें बडिवार ?
केवळ बहार । मार्दवाची ! ३

हंसहृदयाचे । लोभ ते नाजूक,
केसर साजूक । शिरसांचे. ४

वाटे लागुनी ते । फिरतात देहीं,
मौज तों तुझ्या ही । स्पर्शनाची ! ५

इंद्रियें तयाच्या । बावरति वेडें,
उकलेना कोडें । त्या मोहाचें. ६

चैतन्यहि माझें । भ्रमतें विकारें,
पुन्हां होय सारें । एके ठायीं. ७

यापरी भासोनी । कां न दीससी तूं ?
ह्यांत तुझा हेतू । काय आहे ? ८

तुझ्याविणें माझा । तळमळे जीव,
दाखवीं राजीव । आननाचें. ९

माझें तान्हेल्याचें । तेंच कीं जीवन,
तेंच शांतवन । तापल्याचें. १०

तुझ्या दर्शनाची । धरिताहें खंत
नको पाहूं अंत । आतुराचा. ११

ये तुझ्या सभोंता । वळसा पडों दे,
मज सांपडों दे । प्रेमानंद. १२

(२)

केशरी उषा ही । येउनी खुलोनी,
दावी उकलोनी । अंतरंग. १३

हाचि तुझा प्रेमा । हृदयाचा भाव,
गोडसा स्वभाव । मूर्तिमंत. १४

जिवांचा जिव्हाळा, । कृपेचा उमाळा,
ज्यांत कळिकाळा । रीघ नोहे. १५

विश्वकुटुंबी जो । त्या तुझी हे माया,
आप्त गोंजराया । अवतरेली. १६

स्फूर्ति हीच देते । जातीच्या कवीतें,
आणि बोलवीते । शब्दब्रह्म. १७

शब्द ते रसांचे । गोड गोड साचे,
लोकमानसाचे । मोहजाल. १८

त्यांत गुंतुनी जो । गुंतवी जगातें,
हेतुभूत त्यातें । प्रेम तूझें. १९

प्रेम रंगरूपें । जें उषेसमान,
जें मनोरंजन । भाविकांचें. २०

नाहीं ज्यास सीमा । नाहीं भेद्‌भाव.
रंक आणि राव । सारखेच. २१

लालसा, अपेक्षा, । ज्यास ना कशाची,
मजला तयाचीं । जोड लाभो ! २२

तयाच्या वियोगें । देह हा सुकेला,
जाहला भुकेला । जीव माझा. २३

तरी मागतों । दे तुझें प्रेमदान,
ध्येय तें निदान । जीविताचें. २४

( ३ )

मीनराशीमाजीं । पावलाहे भानू,
सृष्टिरूप वानू । काय आतां ! २५

फार शोभिवंत । ते छबी पसंत,
थाटला वसंत । ऋतुराय. २६

सारी वनराजी । आजच्या प्रसंगीं
करी प्रेमरंगी । पेहराव. २७

नेवाळी, गुलाब, । कण्हेर फुलेले,
उद्‌गार उदेले । रम्य गंधी. २८

वाटे हे नसोनी । सुहास फुलांचे,
असे प्रेमलाचें । हास्य माझ्या. २९

कुसुमावतीच्या । मुखें हांसणारा,
तुझ्यावीण प्यारा । कोण दूजा ? ३०

फुलांच्या विकासा, –। मधोनी हंसावें,
वसोनी नसावें । व्यक्त तेथें । ३१

हा तों विनोदाचा । लपंडाव साचा,
तुझ्या प्रसादाचा । रम्य भास. ३२

ह्यानें का सुधेची । भागते तृषा ते ?
मृगांभ मृषा तें । लोभनीय. ३३

फुलें, चंद्रिका, वा । रूपवंत रामा,
यांचें हास्य रामा ! । नाशवंत. ३४

मला शाश्वताची । जोड तेच गोड,
नको हरिमोड । भंगुरांचा ! ३५

प्रसादें तुझ्या मी । गुल्गुलां हंसावें,
सर्वदा वसावें । योगानंदीं. ३६

हेचि एक वांछा । तुवां पुरवावी,
वृत्ति मुरवावी । तूझियांत. ३७

विश्व विरह्याचें । पूर्ण वल्लभेनें,
हो तुझ्या प्रभेनें । तेंवि माझें. ३८

प्रकाशन–मनोरंजन.

१९२८.

## २८. कीर्ति आणि प्रीति

" Go ! where Glory waits thee."

—Thomas Moore

### कीर्ति—

(शुद्धकामदा)

कवि सख्या प्रिया ! कीर्ति ही सखी
निरखिते तुझी वाट सारखी;
त्यजुनि मोह तो भेट एकदा.
समज तूं मला शुद्धकामदा. १

सजुनि आज जो सास घातला,
खचित, तो किती साजतो मला,
पुसुनि पाहिलें आरशास् मीं ;
कळवितो नसे एकही कमी ! २

खुलतसे पहा भांग हा कसा ;
गिरिजलौघ तो शारदीं जसा.
वळण जें दिलें स्निग्ध कुंतलां,
प्रहर त्यामधें एक गुंतला. ३

जरि गुलाब हा सौरभें उणा
खुडुनि खोंविला ना गमे कुणां ?
वरुनि गुंफिलें वेलमोगरे ,
कनक-चंपकें लाविले तुरे. ४

सुमधनूच हें हेमसायकीं
करुनि ठेविलें सज्ज काय कीं ?
द्विगुण कुंकुमाहूनि चांगला !
तिलक केशरी केंवि लागला ! ५

'कमलगंध' हें तैल घालुनी
हळदिचीं दिली झांक आननीं ;
वदन या अशा दिव्य मंगलें
सरसिजान्तरा–तुल्य रंगलें ! ६

नथ तशींच हीं कर्णिचीं फुलें
खुलति मौल्यवान् मौक्तिकांमुळें ;
दिसति साजरीं ह्या मुखास तीं,
मुखहि त्यांमुळें साजतें किती ! ७

विमलसे हिरे चिंचपेटिचे,
किरण फेंकिती हे लपेटिचे ;
बकुलपुष्पसा चंद्रहार हा
कुठकुठें खुळा खेळतो पहा ! ८

असति तारकामंडलें करीं
मणिमयें मधें घातलीं खरीं ;
मधुर झंकृती ऐकुनी, छवी–
बघुनि, पाणि हा कां न घे कवी ? ९

जडितमुद्रिका अंगुल्यांतुनी,
विलसती छटा नैक त्यांतुनी ;
सुवचनांतुनी जातिरम्यसे
चमकवी कवी श्लेष ते जसे. १०

मज गमे पदीं ह्या न सांखळ्या,
धवल जातिच्या गुंफिल्या कळ्या;
टपकती किती गोड जोडवीं,
ध्वनि जगाचियें लक्ष्य ओढवी ! ११

तलम शाल्ह हा शुभ्र चांदणी,
चमकते तुझी यांत चांदणी;
वरुनि फांसला दिल्बहार तों
विलसतें तसा दे बहार तो ! १२

अरुण कंचुकी रेशमी चिनी,
वरि कलाबतू-काम कांचनी;
हिमगिरीवरी जी उषःप्रभा
मिरवि ही तशी रंग-सन्निभा. १३

तव समुन्नती अंतरीं वसे,
इजमधूनि ती बिंबुनी दिसे;
जणुं धुक्यांचिया आंत, पैल कीं
दिसति सानुमान् तुंग शैल कीं ! १४

वसन नील हें व्योम भासतें,
जरिबुटें न हीं तारकाशतें;
अयि बनारसे ! जान्हवीवरी
वससि कीं वरी स्वर्णदीवरी ? १५

नमुनि पांघरूं दे प्रसाद हा,
मज तुझ्यापरी वंद्य हा महा;
किमपि ठेविला गंध यासवें
इतर सौरभीं तोहि कालवे. १६

कविवरा ! किती वेळ लाविशी?
सकळ सिद्धता जाहली कशी.
भवनिं हीं कला–शास्त्र–वैभवें,
भंवतिं सृष्टिचें रूप हें नवें. १७

कविरुचीस जें आवडे, असें
सकल ह्या स्थलीं योजिलें असे.
विविध पानकें, विश्रमासनें,
फिरवि वीज हे केविं विंझणे ! १८

तरु, लता, फुलें, रम्य डोलती,
पिकशुकादि हे गोड बोलती;
घमघमाट कीं पाकगेह दे,
कवण येतसे? वाजलीं पदें ! १९

कुणि न. वाजलीं हींच पावलें !
अगइ, काय हो मी चपापलें !
विविध पुस्तकें, कोश चांगले,
जुळुनि ओळिनें सर्व लागले. २०

कलमयंत्र हें, तात्र केंवि हो !
रसिकराय तो यावरी लिहो !
श्रुतिमनोहरें पद्य-नूपुरें
सहजकाव्य तें ज्यांतुनी स्फुरे. २१

सुखभरांत जें दुःखसागरीं,
परममंगलीं वा अमंगलीं,
बहु जनीं, तसें निर्जनीं वनीं,
किमपि दे निजानंद सन्मनीं. २२


[illegible] लय, ठाणे. स्थलप्रत

शिशु लहान जें काव्य चोखिती,
समजतीं मुलें नित्य वाचिती,
पुरुष, बायका, सर्व जाणती,
जरठ लोक जें काव्य वानिती. २३

सरसरम्य तें काव्य तूं लिहीं.
प्रसर,–कीर्तिची होय केलि ही !
जणुं सुगंध कीं गंधवाह ते,
यश तसें जगीं मीहि वाहतें. २४

मम मुखांतुनी शब्द जो निघे,
अमर होय तो, शाश्वतीं रिघे,
सुकविचा असे काव्यहेतु मी,
प्रिय जनास त्या दे चिरायु मी. २५

सकृप ज्या बघे कीर्ति मानवा
परम देह तो पावतो नवा ;
जनमुखांतुनी जन्म पावुनी
विलसतो जगीं ह्या समावुनी. २६

प्रथमची तया आकृती दिसे,
किमपि शोभतें शील दिव्यसें ;
सकल दोष ते पार्थिवांतले
हरुनि देह तो तत्त्वसा खुले. २७

सहज थोरवी त्यांत येतसे,
क्षणिक ह्या जगीं देव तो वसे ;
जनपरंपरा मान दे तया,
झटतसे तसे तेहि व्हावया. २८

नृपति, शूर, वा दानशूर ते,
बुध, गुणी, मुनी, शिष्ट, जाणते,
जन मदर्थं हा सर्वही खपे,
मम कृपेस जो–तो सदा जपे. २९

हरिसही किती कीर्ति–आवडी !
वरुनि घालितो कीर्तनीं उडी.
परि अशीं करी दिव्य कीर्तनें,
मजसि जीव तो प्राण मी म्हणें. ३०

कवि–सखाच तो कीर्ति शोभवी,
भुवनिं कीर्तिनें शोभतो कवी;
कुणिकडे वसो, तो असो कसा,
सुरसभेंतला भाट हो जसा ! ३१

बहु जनांचियें जीवनैक तो,
बहु मनांचियें दर्पणैक तो,
प्रकृत वस्तुचें शब्दचित्रही—
कवि–बलाढ्यसा राष्ट्रमित्रही. ३२

अझुनि कां न ये तो असा सखा ?
मजसि लागला ध्यास सारखा !
चतुरिके अगे ! पत्र घेउनि
त्वरीत जा, तया देइं नेउनी. ३३

" हिमगिरीवरी दिव्य मंदिरीं,
" तुज अपेक्षिते कीर्ति-सुंदरी ;
" अससि तू कुठें ? पंख लावुनी
" मजसि भेट ये,– ये भरारुनी ! " ३४

अप्रकाशित.

# प्रीति

(द्रुतविलंबित)

(१)

विमल कीर्ति तुला बहु चाहते,
लिखित धाडुनि वाटहि पाहते,
म्हणुनि जाउनि भेट तिला सुखें,
तुज वरील, करीलहि कौतुकें.
निरवितें तरि जो तुज राजसा!
जपुनि ठेव निरोप हिरा जसा.
" हृदय हें परकीय करूं नको;
सुखभरांत मला विसरूं नको. "
हृदय जें उघडोनि निवेदिलें,
समगुणी मज तूं, तुज मीं दिलें;
दृढ अशा ममतेंतुनि बांधिलें,
करुनि एक निरंतर सांधिलें;
उगम जेंवि रसाल अगा तसें,
प्रणय कोकिल ज्यांतुनि गातसे, —
हृदय तें तुजला मम जीवना!
वद कवे! विकवेल यशोधना!

(२)

विविध मांगलिकें मुख मंडिलें,
सवतिनें तुज त्या कुरवंडिलें,
करुनियां मजपासुनि वेगळा
सुमनहार समर्पियले गळां;
स्मितमुखी करुनी करसंगमा
तुजसवें जरि होय विहंगमा,
सुरवधूसम ती धवलाचलीं
तुजपुढें जरि सुंदर नाचली;
अभिनयें विनयें मन वेधिलें,
तुज तिनें रस भाव निवेदिले,
तरि तया समयीं अयि कोमला!
विनवितें विसरूंच नको मला.

(३)

न हि कला शिकलें, न हि पंडिता,
न हि सुरूप न मी गुणमंडिता;
निवळ हा अनुराग रुचे तरी
स्मरसि कां रसिका! मज अंतरीं?
नसति गा अनुकूल मला धनें
नुमजती मज मोहन! साधनें;
प्रणयिनी जरि होय अकिंचना,
उचित ती करण्यास न वंचना.
मज वियोग घरांतुनि काढितो,
परि सुयोग पुन्हां तव ओढितो;

पद वदे कुणि जा, कुणि ये कशी !
मग मना ! गमनास करूं कशी ?
थबकलें; – वळुनी तुज पाहतें,
नयनिं बाष्प उभें तंव राहतें;
असुनि नेत्र निकोपहि आंधळे !
प्रणय आठवुनी मन गोंधळे.
मज नकोत सुपायस–भोजनें,
मज नकोत महावसनें, धनें,
मज नकोत सख्या ! मणि भूषणें,
प्रणय दे प्रणयास्तव मी म्हणें.
वळलिं हीं वसनें जरि वांकळा,
‘ थिगळणें ’ तरि ही मज ये कळा;
स्वतनु झांकिन, खाइन भाकरी,
तरि वसेन तुझी तुझिया घरीं.
त्यजुनि तूं मम भाकर–भात हा
भुलसि पाहुनि साखरभात हा !
तरि सुतृप्तचि जो विदुरा घरीं,
हरि हंसेल रुसेल तुझ्यावरी.
सवंगडी मम बाळपणांतला,
सजण तूं मम ऐन पणांतला;
घरधनी मम तूंच जनांतला,
जिवलगा ! कळिजा विजनांतला.
सुख असो, तुझियासह लागलें
असुख तेंहि सुखासम चांगलें !
सजवितो विषही अमृतापरी,

किति अलोलिक संगम तो तरी !
कविगुणांस विलोभुनि भेटलें.
निज मनोभव भावहि पेटले ;
चमकुनी चपला घनलीन हो,
बघुनि चंद्र तुफान न दीन हो.
मिसळलीं श्वसनें श्वसनांसवें
निथळलीं नयनीं नयनासवें ;
विलय घे मन एक दुज्या मनीं,
खचित जी प्रणयांतिल उन्मनी ;—
कळुनि ती उभयांसहि आलिया,
स्वपरभाव नितान्त निमालिया,
अवलिया ! बघुनी धनवैभवें
विसरशील मला ? —न हि संभवे !

(४)

करिल गा दिनसंगम ती निशा,
अरुण होइल मावळती दिशा ;
बहु छटा नटतां अनुरंजना,
झुळुक वारिल मंजुल विंझणा ;
निबिड आम्र-तरूंतिल मोहरे,
डंवरतील सुवासिक मोहरें ;
हृदयदीपक गोड रसायनें
पिक अशीं निज गांतिल गायनें ;
हितगुजें करिती वनदेवता,—
किलबिल-ध्वनि यापरि भासतां,

सुमलता करितां मृदु सिंजितें,
भ्रमर गातिल तन्मधु गुंजितें;
विलसतां रजनीमुख–तारका,
विहसतां कुसुमाकर सारखा,
मिरवितां नवपल्लव–चामरें
'वनसुधा' जणुं गातिल ते झरे.

(५)

अयि निसर्ग–निषेवक गायका!
अवसरास अशा सुखदायका
सहज जाशिल तूं विहरावया
उपवना पवनामृत घ्यावया.
हिरवळी? नहि सुंदर गालिचे!
पसरले असतां मखमालिचे,
थकुनि तूं बसलास तयांवरी,
स्मर मला रमलास तिथें तरी.

(६)

बहुविधें सुमनें किति वेंचिलीं!
नहि जलें,-प्रणायें अभिषेंचिलीं,
किमपि गंध तदीय न सेवतां
फुलविली तव म्यां अधिदेवता.
जरि उपासियलें प्रभुला,–तुला,
स्थल मनांत न देउनि कितुला,
न विसरे मज देव दयांबुधी,
मग न तूं स्मरसी प्रणयांबुधी?

कुसुमसृष्टिवरी तव आवडी,
किमपि देवपदीं तव आवडी,
प्रबल होय जिच्या सुमनो–बलें,
स्मर तिला तुझिया सु–मनोबलें.

( ७ )

छलबलें मम संगम टाळिती
कर दुजे तुजला कंवटाळिती,
रसिक मित्र तुला कुरवाळिती,
नयननीर सुखावह गाळिती;
मिळुनि यापरि सर्व सुहृज्जनें
तुज दिलीं जरि हर्षनिमज्जनें,
तरि तया समयीं मम निर्मला!
स्मरण ठेव,–नको विसरूं मला.

( ८ )

करुनि गौरव थोर सभाजनीं,
विजयघोष तुझा घुमला जनीं;
तुजवरी बहुमान, असंभवें
वरसलीं जरि कांचनवैभवें;
तरि तया समयीं अयि कोमला!
विनवितें विसरूंच नको मला.

( ९ )

हिम–ऋतूंतिल खारट वादळें
पिकुनियां तरुचीं गळतां दळें,

तुज निमूटपणें पुशितील कीं
स्मरसि काय कवे ! तव ती सखी !
करपली विरहें झुरता मनीं
सुकुनि ती पिकली तरणेपणीं ;
हळु हळू गळतां अमुच्यापरी,
तनु तिचे पडलें धरणीवरी !
गहिंवरोनि तदा सहसा जवें,
दहिंवरासम तीं तव आसवें.
उभवलीं, द्रवलीं, तरि त्यांमुळें
तव सखी परमा गतिला मिळे.

प्रकाशन—'प्रीतीचे बोल'
ह्या शिरोलेखाखालीं
मनोरंजन, जुलै १९२९.

## ३०. गोदावरीचा उगम

( वेंचा—श्रीगोदागौरवांतील )

[ चाल—श्रीशंकराचार्यकृत यमुनाष्टकाची ' अयि मधुरे ! मधुमोदविलासिनी ' इ. किंवा ' दो दिवसांची तनु० इ. फटक्याची ]

(१)

ब्रह्म किमपि जें अभंग, मंगल त्याचा तेजोनिधि नमुनी,
याज्ञवल्क्य, गुरु, पिताहि जो मम नमुनि असा शिवराम मुनी,
सु—मणिकर्णिका प्रणमुनि माता गातों गोदागौरव हा;
त्या गंगेमधिं रंगुनि कविते ! गंगा होउनि तूंहि वहा. १

अभिमतगमने ! न कल्पना तूं कल्पलता मीं तुज म्हणतों,
कीं उदरंभर दूर विदेशीं बहु दिन शिणतों वणवणतों;
यास्तव मज त्या उष्ण, धुळीच्या गुजराथेंतुनि चट् सरशी
उचलुनि देवी ! ब्रह्मगिरीवरि गोदेसन्निध ठेव कशी ! २

काय नवल तरि ! जंव हें वदतों बघतों, डोळे उघडुनि मी,
अमृतानंदप्रवाहिनीच्या उभा असें तंव मी उगमीं !
ब्रह्मगिरी हा शिखरकरें मज बाहुलियापरि उंच धरी,
येथुनि जाते जाणों दिगंतीं दृष्टि किती ही दूरवरी ! ३

उगमापासुनि मुखावधीच्या गंगौघासह गंगथडी
आवरणांतुनि चित्रपटापरि केली येथ जणों उघडी;

दूर–निदर्शक यंत्रामधुनी स्वर्गंगा ती विशद जशी,
तशीच येथुनि गोचर होते स्वकल्पनेनें ही मजशी; ४

कोठवरी हा प्रसार ! सत्ता व्यापक ही किति दूरवरी !
थोर किती हें वैभव हीचें ! उदारता ही काय तरी !
मजला हीच्या वत्सलतेचें–भूतदयेचें–गूढ पडे,
निमिषाचाहि न हिला विसांवा, संतत परहित कार्य घडे. ५

हे गोदावरि ! विश्रुत ऐसा ब्रह्मगिरीच्या प्रिय तनये !
जगदाऽनंदन रघुनंदन ज्या तुजला वंदन करि विनयें,
कैलासाच्या वृद्ध पतीनें वरिलें, त्रिजटेवरि धरिलें,
त्या तुज घालुनि 'लोटांगण' मी होइल कां गे आदरिलें ? ६

आदिकवि श्रीवाल्मीकींची शुचि रुचिरा ती सरस्वती
तव गौरव–रव करोनि धांवे भूगोलावरि कीर्तिमती,
सुरस कथा तव कथुनि पुराणें गाती गोदे बहु महती,
भवभूतीची प्रतिभा दावी तुझी विभूती मूर्तिमती. ७

ऐसे कोकिल गाती जेथें, तेथें 'कौ'- रव काय करूं ?
खुलवुं कशाला पलाश तेथें, फुलले जेथें देवतरू ?
रसाल सेविति जनांपुढें त्या करवंदें मी काय धरूं ?
क्षीरोदधिच्या कांठीं वाहुनि मीठ मिठागर काय करूं ? ८

परि केवल हा दोष न माझा, अंगुलि फिरते तुझ्याकडे !
जननि ! मला पय पाजुनि दिधले स्खलनाचेही तूंच धडे.
तया पयानें स्फूर्ति जहाली, तेच धडे मी बडबडतों,
मी वक्ता तूं श्रोता ! न मला भान कशाचें वरकड तों. ९

अंकावरिच्या अज्ञ शिशूचे प्रेमें स्वैरालाप जसे
परिसे माता, तसें न भारत, अठरा पर्वेहि पर्वतसें !

अयि गोदे! त्वत्प्रसाद व्हाया यत्न असे मम हा सगळा.
विशंक गातों, गोड नसेना, सद्गद आहे यास गळा! १०

प्रगटुनि येथें मूर्तिमती तूं देशिल दर्शनलाभ जना
तोंवरि माते! करीत राहिन एक लयानें तव भजना;
भजनांतहि मज! बालवयींच्या सहजचि होतिल आठवणी;
हृदय विदारुनि दावुं कुणाला सुखासुखाच्या सांठवणी? ११

(२)

मजभंवतीं जो अजगर ऐसा गाढ निजेला अचल दिसे,
ह्याला 'सह्य' असें जन म्हणती; पूर्वीं हाच असह्य असे;
कारण, ह्याच्या शृंगांवरुनी होतां शृंग-ध्वनि सहसा,
वीरश्रीनें पुलकित होई हा पंचानन काय जसा. १२

घनघोषासम 'हरहर' ऐसा हा जेव्हां रणघोष करी,
तेव्हां अंबर चरके वरती, धरा थरारुनि कंप धरी;
ज्या काळीं त्या गरनाळींतुनि बालरवीसम लाल असे
गोळे सुटती फुटती तेव्हां ज्वालामुख हा 'सह्य' नसे. १३

येथें, तेथें, खालीं, वरती, खड्ग विजांसम चकचकले,
तेव्हां ह्यावरि कटाक्ष ठेवुनि थकले चौकसही चकले;
शौर्य–जयश्रीयुत ह्यावरिचा दैव-दिवाकर नहि टळला,
केतुमुखीं तो आज म्हणावा गळला किंवा मावळला? १४

ज्यांवरि घडघड झडति नगारे, असे शतावधि गड पडले,
पडले नसतिल, असतिल कांहीं कालकरीं तरि सांपडले;
गोजिरवाणीं ठाणीं, वाडे, विशाल किल्ले गर्वभरें
टोंचिति गगना, सर्व विखुरलीं गंधर्वांचीं जणुं नगरें. १५

गतवैभव हा हताश होउनि पसरुनि कर पद जणुं निजला;
हे सह्या! घे झोंपचि आतां येते कींव तुझी मजला.
एकी रुसली, दुही धुमसली, अवयव पोटासह लढले,
सुविवेकाचें तुझें बिघडलें, सह्या!–म्हणुनि असें घडलें! १६

घटयंत्रासम सकलांनाही येते चढती वा पडती,
कां चढतीनें भृकुटि चढावी? पडती व्हावी अवघड ती?
कर्म जसें फल तसें, तयाचा भोक्ता ज्याचा तोच तरी.
कर्मापासुनि फलभोग तसा पश्चात्तापहि मुक्त करी. १७

(३)

## गंगाद्वारीं भजन

उलटुनि गेली मध्य–निशाही जीवन-कलह जगीं शमला,
जन निद्रावश गमतो सोऽहं-मंत्रें भारियलाच मला;
पान न हाले, शब्द निमाले, स्वानंदी जग मग्न दिसे,
तव भक्तीची 'भंग' पिउनि मज गंगे! भरलें स्फूर्ति–पिसें. १८

भव-भट्टीमधिं तावुनि तावुनि विजनजलीं जें निववियलें,
मंत्रघनानें पिटुनि, ओढिलें विचार-जंत्रांतोनि बलें,
जें मन नामें कांचन त्याची सतार ही रव काय करी,—
"जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे! भवताप हरीं." १९

येथ शिवानें जटा फटाफट आपटुनी तुज वाहविली,
गोवधपापें अनुतापाकुल गौतमतनु अवगाहविली,
धन्य महात्मा! आपण तरला, तारियलें जग निरंतरीं.
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे! भवताप हरीं. २०

गिरिशिखराहुनि जगदाधारा धारा ही तव अवतरते
छुम छुम झुमझुम जलकलरव हें नादब्रह्मच कीं नटतें ?
राहिन हे तव जलधारारव अवधाराया या शिखरीं.
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरीं. २१

विमल विमल ! हें कसें तुझें जल, गंगे ! गंगाजलचि जसें
सुंदर सुंदर ! वसुंधरेंतिल सुंदरतेचें सार दिसे.
किति सुखशीतल ! सत्संगासम आश्रिततनुमन गार करी,
भवजालांतहि बद्ध जनांच्या आणुनि देतें मोक्ष करीं. २३

मधुर मधुर गे ! अविकृत केवल दैवी प्रेमचि हें गळतें.
वैतरणीच्या उलटचि याची संतत गति जरि चंचळ ते.
पावन पावन गंगे ! तुजसम तीर्थ–महात्म्य न भूमिवरी.
पुष्कर राजा म्हणवुनि लोकीं पूज्य विधी इतुकाच तरी. २३

जगताच्या इतिहासांतिल हें सत्याचें संशोधन कीं ?
कीं सृष्टींतिल पुराण तें हें ? स्मृतिचें हेंच निवेदन कीं ?
कीं हा संगम षडागमांचा ? कीं निगमांचें सार खरें ?
अनुपम ऐशा आत्मरसाचा हा अवतारचि कां न बरें ? २४

भूतांवरिचें तव वात्सल्यचि अमृतमिषें हें संभवलें,
द्रवलें चंद्रकलामृत यांतचि शिवचरितामृत कालवलें;
त्रिगुणित ऐसें हें परमामृत पाजुनि तृष्णा दूर करी.
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरीं २५

गिरिकंदरिं हा गंगाद्वारीं तव तीर्थांचा निधि जमला,
सन्निध ह्याच्या येतां भासे झाला चंदनलेप मला;
कर्पूरांजन ! नयन निवाले, सात्त्विक धारा अवतरती,
ह्या तव ममता–सुधाकरें जणुं चंद्रमणी हे पाझरती. २६

थंडावुनि ह्या थंडाईनें हांव भवाची उपशमली,
शुष्क सुखांची मृगतृष्णा ही राल–ज्वालेसम शमली;
शांत मनाला प्रसन्नता ये गंगे! या तव जलापरी,
स्वानंदाच्या ठुमकति त्यावरि मनोज्ञ मंजुलशा लहरी! २७

स्फटिक–शिलेच्या मंचावरतीं कोमल–किसलय–सुमशयनीं,
भूरंभेच्या परिरंभामधिं, धवल वसंतांतिल रजनी
अनुभविणाऱ्या अरे नरेन्द्रा! विगलित कां तूं हिरमुसला?
ही सुखशांती नहि विषयान्तीं असतो विरसचि ठेवियला. २८

सकल मलांचें भंजन कीं हें? विकल मनांचें रंजन कीं?
विषयांधांचें अंजन कीं हें? ज्ञानमधूच निरंजन कीं?
कीं संजीवन वैराग्याचें, शांतरसामृत खरोखरीं!
ह्याचा एकहि कण प्याल्यावरि चर्चा मम यम काय करी? २९

हें मुक्तीचें केलिसरोवर यांतुनि हो रममाण मना!
जगदात्म्याचें निर्मल बिंबचि तूं प्रतिबिंब सजें सुजना!
परम सुखाचा डोह शरीरा! मार बुडी तूं स्नान करीं.
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे! भवताप हरीं. ३०

ध्यानहि जरि तव पावन करितें, स्नान तरी वद काय करी?
स्नान, पान, गुणगानहि केलें, देशिल फल मग काय तरी!
अधिकाचें फल अधिकचि म्हणती, पण तें माझ्या ठेव करीं.
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे! भवताप हरीं. ३१

जन्मुनि तीरीं, पिउनि तुझें पय, न करिन तव गुणगौरव हा,
अधमपणास्तव चुकेल कां गे सांग मला तरि रौरव? हा!
तव गुण गातां रमवुनि यमही झुलविन शब्दब्रह्म करीं,
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे! भवताप हरीं. ३२

शब्दब्रह्मीं जो कवि कसला, त्याला रौरव मग कसला ?
नित्यानंदें पूर्ण विकसला, परं ब्रह्मपदिं तो वसला.
परब्रह्मपदिं तुझ्या झऱ्यामधिं समरसला तो बुधापरी,
' पुनरपि जननं पुनरपि मरणं ' यांची ओळख तो न धरी. २३

## ३१. हिरावाडी

“ Land of my sires, what mortal hand,
Can e'er untie the filial band,
That knits me to the rugged strand ?
Still, as I view each will-known Scene,
Think what is now, and what hath been,
Seems as, to me, of all bereft,
Sole friends thy woods and streams were left;
And thus I love them better still,
Even in extremity of ill. ”

–Sir Walter Scott.

[ **चाल** :— “ अयि मधुरे मधुमोद विलासिनी ” इ. आचार्यकृत यमुनाष्टकाची किंवा ‘ दो दिवसांची तनु ’ ह्या चालीवरहि म्हणतां येईल. ]

हे नासिकच्या प्रिय स्थलांनो ! माझ्या आप्तसुहृज्जनहो,
निघवेना मज येथुनि परि हें अधिकाधिक मन खिन्न न हो,
म्हणुनि जियेनें धात्रीभावें अन्नप्राशन मज दिधलें,
जातों दर्शन तिचें कराया, प्रेम असू द्या हो पहिलें.
बहु दिवसांनीं पाहुनि मजला हें निज माथें डोलविती,
बोलाविति मज कोकिल–शब्दें, आमंत्रण बहुमोल किती !
पसरुनि शाखाभुज मजला हे कवळाया किती उत्सुकले !
आलों आलों आम्रतरूंनो ! पुसतों तुमचीं मी कुशलें.
अगणित पिंवळे मोहर तुमचे गुंगति भुंगे ज्यांभंवतीं,

रम्य छटांकित लोल फलांचे बहर मुदें मज नाचविती ;
विगलित '.शाका ' मिळतां गमला अमृतफलांचा लाभ मला,
किति उल्हासें उतरुनि आंबे अविट सुरस तो सेवियला.
हे मधुरे, हे सत्त्वमये, तूं असिस बरी ना रामफळी !
सु-रसालांशीं मिळुनि मिसळुनी राहसि ना तूं त्यांजवळीं ?
क्षेत्रपतीवरि छत्र असे तव, औदुंबर ! तें न हि ढळलें.
अंजीरांचें वैभव तुझिया विपुल फळांतुनि आढळलें.
आचाराचा अनुपम नमुना प्रतिदिवशीं तूं दाखविला,
सुमधुर शरबत रस-निज कविला निदाघकाळीं चाखविला ;
हे निंबोणी ! विहिरीमध्यें डोकावुनि गे तूं कसला
सखोल करिसी विचार ? का तुज आंबट आंबा तो हंसला ?
तुजला बघतां मनोव्यथेचीं ' कंटकशल्यें बोथटलीं, '
सन्निध येतां तनुवरि माझ्या ' मखमालीची लव वठली ' !
खिन्न न होईं, तव गुण वानिति आयुर्वेद-विशारद ते,
एकचि कंटकदोष तुझ्यांतिल सद्गुण करितिल गारद ते.
गे विहिरी ! हे थारोळांनो ! चालति मोटा उभय थडी ?
तीनहि तुकडे भिजती कां हो ? पाणी देतो कवण गडी ?
घायाळांच्या घराकडे तों बघतां हें मुख हिरमुसलें,
असति इथें जे, अनोळखी ते म्हणुनि तुम्हांला मीं पुसलें.
पूर्व-परिस्थिति, परिचय माझा, आठवुनी कां बुचकळलां ?
खिन्न निरुत्तर होउनि बसलां ? आशय तुमचा मज कळला.
चढतीपडती, सुखदुःखें हीं आळोपाळी येति जगीं,
खेद न मानुनि भेटा, बोला, जिवलग माझीं मज अवघीं.
पान न गवसे फुलें-फुलें हीं, डवरुनि गेला कंचनहो ।
ह्या कुसुमांनीं न कळत सुंदर त्या कमलांचें वंचन हो.

वृष्टि फुलांची भूवरि, ह्यांची सजविति भाजी निज जन कीं,
अतिरेकानें मलयागिरीवर बनतो चंदन इंधन कीं !
हा एकुलता एकचि हदगा बालवयीं दे थोर फुलें,
वरि उपरतिची पांडुरता, तरि आंत मजेचा रंग खुले;
नागफणींतुनि विष नसतां मृदु गंध, मरंदहि गोड किती !
आन्तर्गुण हे जाणुनि झुलती भृंग तयांतें गौरविती.
न शेवगा हा केवळ देशी, सत्त्वगुणास्तव 'हपूसचा'
म्हणविंत होता, परि म्हणणारा वामनराव नसे तुमचा !
शेंगांनो ! गुण असोनि, गुणिजन गुणज्ञ नसतां, जी कुदशा
भोगिति, आली आज तुम्हांला दुर्दैवानें ती विवशा.
गे बदरी ! मी ह्याच ठिकाणीं मधुर फळें तव वेंचियलीं,
सेववलीं तीं सेवुनि माझ्या खेळगड्यांनाही दिधलीं.
रक्षक काकू उपवासास्तव बनवुनि ठेवी बोरकुटें
उपास पडती, कूट दिसेना, काकू आहे तीहि कुठें !
पुष्पकरंडक–जीर्णोद्यानचि आज मला हें स्थल गमतें,
एके काळीं चैत्ररथाच्या करी मुलासम संभ्रम तें;
बहुपरिचे गुल्, गुलछब्बू, ते मुद्गर, झेंडू, जातिलता,
शेवंती त्या द्विविधा तुलसी, सुरम्यतेची संकुलता.
जें लघु नंदन राखुनि 'झाळू' घरीं फुलांची रास करी,
हा हा ! वामन शिवरामांनो ! जमलें जंगल त्याजवरी !
ह्या वायूंतुनि वागति तुमचे प्राण यथोचित आदरुनी
त्यांतें, येतों येथिल 'तमसा'— तीरावरि मन शांतवुनी.
जनतेपासुनि अलिप्त येथें 'वाघाडीचा' निर्झर हा

भिंगासम कीं सुजनमनासम दिसतो निर्मल केंवि पहा.
उदकासरशा करवीरांच्या लवुनि डहाळ्या त्या तरती,
लाल धवल त्या सुमगुच्छांतें संथ जलावरि अंथरती.
बघुनि गमे कीं वनलक्ष्मीनें हें फुल-मंडळ मांडियलें,
निज सख्याची भेट म्हणोनी जलदेवीला तें दिधलें;
निर्झरिणी ! मीं बालपणीं तव तीरीं रमलों, विसांवलों,
डुंबुनि न्हालों, तव जल प्यालों, त्या लोभानें आकळिलों,
ह्या एकान्तीं शांत जहालें मन, तुज वंदुनि मी परते,
गंगौघापरि लोभ तुझा जो, तोच असूं दे मजवरतें.
वडिलोपार्जित वसुंधरे ! हे जिराइतांनो ! वंदितसे,
तुमच्या अन्नें पोषियला जन तुम्हांस हा अभिनंदितसे;
द्राक्षी, शाली, ऊंसहि. भाज्या, खुरासणी, भुयमूग बहू,
द्विदल, बाजरी बोरासम ती, पिकुनि झुले तो काय गहूं !
गळति गुऱ्हाळें, गूळ बने जणुं केशरमिश्रित ती बरफी !
अये रसाले ! किति तुज वानूं ? हृदयचि माझें मीं अर्पीं.
ह्या समयीं कवि लेंभे यांचा ‘ शेतकरी ’ मज आठवतो,
तो समदुःखी करुनि मला मम हृदयांतिल आटवतो !
निज विरहाची कारणमाला,—नको उजळणी ती म्हणणें !
विधिनें माझ्या भाळीं लिहिलें नव्हतें हें सुख अनुभवणें.
जे करिती वहिवाट, तयां दे हें सुख वैभव मज नलगे !
हे भृंगाक्षी ! हे मीनाक्षी ! परि ममतेनें यास बघे.
विमल सुगंधी वायुमिषें दे मातृमुखी ! मज चुंबन दे !
विहंगमांच्या गोड रवांनीं कविसंगें तूं गोड वदे.
विमल अहेतुक अनुरागानें अंतर सारें विरघळलें,
या समयीं तव मोल हिऱ्यांहुनि अमोल जें, मज तें कळलें-

मन रमलें, मी जाऊं अथवा येथचि राहूं ? सांग वरें !
चालुनि पुढती, बघतों मागें, नयनांतुनि हे झरति झरे.
प्रेम असूं दे लोभहि ठेवीं, देवी पुनरपि भेट घडो !
यावत् जीवित निज ममतेची घडी कदापि न ही विघडो.

श्रीगोदागौरव- अप्रसिद्ध.

मन रमलें, मी जाऊं अथवा येथचि राहूं ? सांग बरें !
चालुनि पुढती, बघतों मागें, नयनांतुनि हे झरति झरे.
प्रेम असूं दे लोभहि ठेवीं, देवी पुनरपि भेट घडो !
यावत् जीवित निज ममतेची घडी कदापि न ही विघडो.

श्रीगोदागौरव– अप्रसिद्ध.

## ३२. पंचवटी व तपोवन

वाल्मीकींनीं जो सृष्टीचा अनुपम नमुना रंगविला
तो पंचवटीप्रदेश हा कीं? रमविल गोदे! काय मला?
येथें आणिक रामगिरीच्या रम्य समंतीं मी वसलों,
बहुविध मौजा नैसर्गिक सुख भोगुनि रमलों मी हंसलों. १

परि तेंव्हांचें सहज मनोरम तें स्थल साधें आज नसे,
प्रियजन अथवा त्या समर्थांचा येथें एक न ही गवसे,
सेतू, शाला, प्रासादासम भवनें मजल्यावरि मजले
धनवान्–यात्रिक–जनसंघांनीं हें स्थल आतां गजबजलें. २

ही शहराची, व्यवहाराची, संसाराची गजबज ना!
पुरे पुरे. ही टाळुनि जातों तपोवनांतच मी भजना.
ह्या मार्गानें पंचवटीचें ऋषिकालीं तें रूप कसें
शोभत होतें, चित्र तयाचें दिसेल कांहीं अंधुकसें. ३

पंचवटींतिल अद्भुतरूपा, विराटदेही हे हनुमान्!
नमुनि तुला मी प्रार्थितसें कीं दावि मला तो श्रीभगवान्.
वरुनि सफेता सारविलेली कलिकालांतिल ही दुनिया
बदलुनि होइल त्या रामाचें राज्य कधीं रे परतुनियां! ४

तें व्हाया बहु विलंब असला, किंवा नोहे फिरुनि कदा,
तरि तें जेथें असेल तेथें ने मज तूंच हरी विपदा.

× × × ×


स्थळप्रत १४३
अनुक्रम 3636 ........ दि: ........

हेंच तपोवन; ज्यांत हजारों वर्षें मुनिजन ते वसले,
तीव्र तपानें तनु झिजतां " तत् त्वमसि " असें यन्मनिं ठसलें.
पूर्णब्रह्म सनातन येथचि त्यांच्याकरितां अवतरलें,
राज्यपदातें, त्यजुनि सुखातें, ह्याच वनीं तें संचरलें. १

जलही राम, स्थलही रामचि, तृणतरुकाष्ठहि राम इथें,
निधि निक्षेपहि, अणुरेणूही वातावरणहि रामचि तें;
त्रेतायुग भजभंवतिं विराजे, जें वसलें निष्काम इथें,
रंगुनि रामीं राम जहालें, आज दिसे अभिरामच तें ! २

अभ्यंतरिंचा प्रेम-उमाळा ह्या समयीं न हि साहवतो,
राम-जिव्हाळा बघुनि इथें तो प्रतिरन्ध्रांतुनि वाहवतो !
कस्तूरीच्या दिव्य सुगंधें भडकुनि मृगतनु जेंवि गळे,
तेंवि गळोनी शरीर माझें रामरसीं हें मन मिसळे. ३

आकाशाहुनि अफाट भरला चैतन्याचा सागर हा;
किति जीवात्मे झळझळती हे तरंग यांतिल मीन पहा !
पार्थिव देहावांचुनि सारे, हे वळखावे कवणपरी ?
वसिष्ठ, विश्वामित्र कुणाला दशरथ, जनक म्हणूं शबरी ? ४

जगदभिरामा, आत्मारामा रामा ! माझें नमन तुला;
ह्या विभवाची, स्वानंदाची, करूं सुखाची केंवि तुला ?
पलख न लवतां भव्य दिव्यातें निरखी निश्चल बाल जसें,
कुंठित वेडें हें मन माझें बघतें रामा ! तुजसि तसें. ५

सत्ता, वैभव, मानमरातब, मायाममता आणि सुखें,
ह्यातें लोलुप मनें करोनी महाप्रयासें तीं विमुखें,
कष्टवुनी बहु तनुला करणें प्राप्त असे जें इहभुवनीं,
बिंब तयाचें त्वत्प्रिय कविला त्वांचि दिलें हें दाखवुनी. ६

हे परमात्मन् ! काया, वाचा, आणि मनास न जें गवसे,
तें तव वैभव हें विलसों दे दृष्टिसमोर अखंड असें,
अंतीं हा तव अंश तयांतचि लय पावों दे सत्वर तो,
संसाराच्या विपचारांमधिं फिरूनि कधींहि न गा परतो ! ७

प्रकाशन—मनोरंजन.
मार्च १९२७.

## ३३. टाकळी आणि ओढें

[ वेंचा–गोदागौरवांतील. चाल–सदर. ]

### टाकळी :

दिव्योदधिच्या आखातासम, ओघ कुठें हा जात असे?
स्वमनोनयनें अनुसरतां तो गोदेवरि हनुमान दिसे.
घालुनि कंथा, कुबडी माळा, धरुनि उभेच समर्थ कवी.
रामजपाचा घोष तयांचा समंत भारुनि हा घुमवी. १

संसाराचें निगड निबंधन तोडुनि आले टाकळिला.
हनुमानाच्या अनुग्रहानें रामहि यांनीं आकळिला.
हे दासाचे 'समर्थ' झाले गोदातीरीं ह्या कुहरीं.
महायशाचा गंगौघासम उगम किती हा सान तरी ! २

शिवरायाचे राजगुरू हे, नृपनीती मनिं बिंबविली,
शिरें गडांचीं गगनाकडुनी हुंगवुनी तीं चुंबविलीं ;
ह्यांच्या बोधांतिल ओजाचें तेज भवानीवरि चढलें,
दिपुनि हजारों गनीम पडले दिवान्ध होउनि वा दडले. ३

गाई, ब्राह्मण अशेष हिंदू वांचवुनी प्रतिपाळविले.
अधिराज्याचें सुछत्र चामर छत्रपतींवरि ढाळविलें ;
जोहाराचें करुनि विसर्जन, योजिति नमनीं रामपदें
सर्व मनांला जागृत करिती सतेज यांचीं श्लोक–पदें. ४

अझुनि मराठेशाहीमध्यें ‘ भगवा झेंडा ’ जो विलसे,
निशाण यांच्या निस्पृहतेचें वैराग्याचें तोच असे ;
अटकेवरि जो फडकुनि आला, बखरींनीं बहु गौरविला,
श्रेय तयाचें या गोदेला किमपि असें ह्या टाकळिला. ५

स्वयशोदेहें जेथें तेथें स्वसंप्रदायांतुनि वसतां,
चाफळ येथें गुरो ! तसें ह्या टाकळगांवीं मज दिसतां ;
राज्यविभव जरि मंद जहालें, पंथ तरी तो निज टिकला,
अझुनि तयानें जे जन जाती त्यांचा राम असे विकला. ६

पथप्रवर्तक गुरो ! तुम्हांला वंदुनि मी पंथ हा क्रमितों,
इकडुनि-तिकडुनि येइल राजा-राम विमानीं परतुनि तो !

प्रकाशन—मनोरंजन.

## २४ ओढें

श्रीमंतांच्या सरदाराचें ओढें गांव सुरम्य कसें !
जीवावांचुनि भूदेवीचें दिसतें सुंदर चित्र जसें.
घाट, पटांगण, देवायतनें, शेतें, राया, जनवसती,
सुविमल मंजुल वाहसि गोदे ! स्थान निरामय शांत किती ! १

पानिपताच्या रणामधिं निज नृपनीती जरि चुकली,
प्रलय, पराभव, ऐकुनि मूर्च्छा येउनि राज-श्री झुकली,
तरि जयदेवी उभय चमूंचा बघुनि पराक्रम मनिं विरमे,
माळ कुणाला घालूं कोडें तिचें तिला हें गूढ गमे. २

जरि गिलच्यांनीं ओढुनि नेली, तरि अटकेवरि ती अटके,
वळुनि बघे तंव ये राघोबा नजर ' भरारी ' वरि न टिके.
त्यानें झंझानिल-वेगानें क्रूर दुराणी घेरियला,
पानिपताचा मोबदला !--पण काय दिला हो काय दिला ! ३

अशा रणांतुनि समशेरीचे हात जयांनीं गाजविले,
अरिच्या अपुल्या, रंगुनि रुधिरें स्वकीय देह विराजविले,
त्या वीरांतिल सु-रंगरावा ! शोभसि लालच तूं गहिरा,
वीर असो निज धर्मांतिल तूं धीरोदार सतेज हिरा. ४

श्रीरामाचें मंदिर जें तूं सर्वस्वावरि बांधियलें,
धार्मिकतेचें, उदारतेचें, त्यागाचें तें चिन्ह भलें.
स्मारक तें तव होय चिरंतन पंचवटीसम इहभुवनीं,
कळस तयाचा बघतां म्हणतों धन्य तुला मी माधवनीं. ५

प्रकाशन—मनोरंजन.
१९२७-२८.

( भगिनी निवेदिता यांस दिलेला )

# ३५. आशीर्वाद

( स्रग्धरा )

मातेचें कोंवळें तें हृदय तुज असो पुष्पजातीसमान,
वीरेच्छा तूंत साजो जणुं घन-पटलीं वीज हो भासमान;
लीलेनें जी सुगंधी मृदु मधु लहरी वाहते दक्षिणेची,
चेतोवृत्ती करो ती तिजसम अमुच्या ह्या विशाले क्षणेची.
आर्यांच्या यज्ञकुंडीं शुचितर वसते शक्ति जी इंद्रजाली,
मुक्तज्वालावलीनें तुजमधुनि बघूं ती समाविष्ट झाली;
माला ही सद्गुणांच्या सुविविध गुणकें आणखीही गुणावी,
हीतें घालोनि कंठीं तव गुणमहती स्रग्धरे, तूं दुणावीं.
प्राचीनात्मा कुणीही तुजसम विदुषी स्वप्निंही पाहता ना,
तूं भावी हिंदपुत्रा वरुनिच मिळवीं हिंद देशांत माना;
पत्नी, दासी, सखी ह्या अधिकृति धरुनी तीन एकाच देहीं,
आर्ये ! सानंद नांदे शुचितर महिला श्रीमतांच्याच गेहीं.

## ३६. कवितेचीं विलासस्थलें

" The Province of Poetry is to describe nature and passion. "

— Dr. Johnson.

जेथें आम्रतरू शतावधि छताऐसे नभा झांकिती,
गंधोद्गार परागही अरुणशा तन्मंजरी टाकिती;
भृंगे गुंगत संभ्रमें विचरती प्राशोनि आम्रासवा,
गाती जेथ ' कुहू कुहू ' पिक असे वासंतिका वैभवा. १

× × ×

जेथें पेटुनियां अरण्यवलय ज्वालावली चालती,
ग्रीष्मार्क प्रखराग्निचे कण जणों ओतीतसे खालतीं;
ऐसा ताप, असह्य धूम करितां प्राणावरोध, त्वरें
जेथें दीन कुरंग ते भडकले चोहींकडे घाबरे. २

× × ×

जेथें दारुण मेघसंघ सहसा संध्यानिलें आणिले,
मेघांनीं जलधीस, त्या जलधिनें मेघांसही न्हाणिलें;
घो घो घोष सरोष सागर करी, पाषाणराशींवरी
त्याचे स्थूल तरंग भंगति महा शैलप्रपातापरी.
त्या लाटा फुटतां तुषार उडती त्यांचे सहस्रावधी,
धारापात मिळे तयांत चमके विद्युल्लताही मधीं,

त्या तेजें जलबिंदु ते झळकती नक्षत्रपातापरी,
भासे वासव हा हिरेच रिचवी कीं काय रत्नाकरीं. ३

× × ×

जेथें पुंष्पितसे कुळंबहि कुडे आर्द्रानिलें डोलती,
टाहो फोडुनि आग्रहें जणुं शिखी 'या हो!' घना बोलती;
ठाणें गर्वभरेंच पर्वतशिरीं जैं मेघसंघें दिलें,
धो धो वर्षुनी गर्जुनी गडगडां पाषाणही भेदिले.
नाना जाति घनाभिषिक्त हिरव्यागार प्रसन्नौषधी
जेथें झांकिति सर्व पर्वत, अशा प्रच्छन्न शैलामधीं
वेगें स्थूल जलौघ वाहुनि कड्याखालीं उड्या टाकिती,
झंझानें जल बाष्पसें पसरुनी खोरें दरे झांकिती. ४

× × ×

जेथें लागुनि राहिलें तृण नवें सर्वत्र पाचेपरी,
जागोजाग अखंड वाहति झरे संशुद्ध काचेपरी;
जेथें भूवरि टेंकलें चहुंकडे अभ्रांकिताकाश तें,
खिल्लारें, कळप, स्वतंत्र चरती, वेणू जिथें वाजते. ५

× × ×

जेथें आर्द्र वनस्थलीवरि तृणें नानाविधें माजलीं,
शाईतें नभ वर्षतें, झळकती खद्योत तारावली;
जेथें दृश्य अदृश्य होय सहसा ज्वाला पिशाचीपरी.
नादें सर्व दिशा प्रकंपित करी तो रौद्रसा केसरी. ६

× × ×

जेथें दिव्य शरत्प्रभातसमयीं मंदानिलें हालती
आंबेमोहर कीं कमोद लवुनी शालीभरें खालतीं;

भोंतीं संचरती सुगंधलहरी, माशाहि सीत्कारिती,
‘ री री ’ शेतकरी करी, गडगडी-मोटा पयें ओतिती. ७

× × ×

जेथें शांतहि कांत नीलमणिसें कासार तें शोभलें,
तारामंडल शारदेन्दुसह तें ज्याच्यामधीं बिंबलें ;
भासे कीं वनदेवतेस शरदें हीं भेट रत्नें दिलीं,
देवीनें शरदुत्सवार्थ अथवा झाकीच कीं रेखिली. ८

× × ×

जेथें सर्व दिशांस बाष्प भरलें, पाहोनि वाटे मला,
विश्वाला करण्यास काय दुलई कापूस हा पिंजला ?
केला दूर अहो यदा निजकरें कापूस तो भास्करें,
त्यांतोनी दंवरूप तों विखुरले देवेन्द्र याचे हिरे ! ९

[ वैतालीय छंद. ]

विरही जन आपुली सखी
स्मरुनी तो म्हणतो तिला जिथें :—
सदये हृदयेश्वरी ! किती
किती सोसूं तरि गे वियोग हा !
तनु हें विरहानलीं जळे
मन चिंतादहनांत आहळे ;
वणवाच जिवास लागला
सुख कोठेंहि न राहिलें मला !
सखि मोहनबाग, बंगला,
तुजवांचोनि उदास, ओस हा !

कसल्या उपभोग,–आवडी
जरि माझी जवळी न आवडी !
रडतों दिनरात्र मी सये !
कधिं गे तूं मज भेटशील ? ये !
विषही अमृतासमान हो
असतां दैव सहाय देवही !
कटु हाच वियोग पालटो
तव योगांत सदैव योगिनी !
मधुरे ! मुखचंद्र गोड तो
उगवूं दे, कधिं गे दिसेल तो ?
नयनें हरिणीच सारखीं
कधिं गे तीं बघतील सारखीं ?
वद ये मृदु मंजु कोकिले !
चतुरे, तूं सुगरीण गे कशी !
घरटें सजवूं सुखें रहा ;
प्रणयाला प्रणयास दे, पहा.
उटजांतिल दीप तूंच. ये,
मम जीवा शिवलीन हो स्वयें. १०

× × ×

एकांतीं प्रिय कांतचित्र धरुनी सारंगनेत्रा जिथें
प्रेमानें मुख त्यांतलें निरखुनी ती सारखी चुंबिते ;
तो साक्षात् पति आरशांत दिसला, हांसेच मागें उभा !
मारोनी सकटाक्ष गोड मुरका गेली विजेची प्रभा ! ११

× × ×


मराठी ग्रंथ [illegible] प्रत.

कोणी एक सुशिक्षिता, नववया, रूपें गुणें मोहिनी
भार्या सुंदर बंगल्यांत रमली कादंबरी-वाचनीं;
आला कांत हळूच मागुनि तिथें डोळे तिचे झांकुनी
स्त्रीशब्दांतचि तो तिला नट म्हणे 'मी कोण? घ्या जिंकुनी!'
ती नांवें कथिते अनेक सखिचीं; 'नाहीं' म्हणे तो हंसे.
'हो हो वन्सच! 'रिस्ट वॉच' तुमचें हें 'सील;' नाहीं कसें!
आहां वन्सच, वन्स हो! ठरविते ती चांचपोनी तया,
 कां मीं ओळखिलें कसें?' तिजसि ती लागे फुशारावया.
डोळे सोडुनि तों नटें चटदिशीं ती स्त्री समालिंगिली!
तें पाहोनि चपापली 'अग बई हें कोण?' आश्चर्यली.
वारंवारचि 'वन्समोर!' म्हणुनी तो चुंबनें घेतसे,
मावेना मग बंगल्यांत पिकलें जें जोडण्याचें हंसें. १२

× × ×

जेथें सागरसा समाज भरला, वाचस्पती मोहरा
कर्ण्यांतोनि पुकारितो, "स्वजनहो! या सज्ज व्हा संगरा.
खेळे रक्त नसानसांत अमुच्या ह्या हिंदमातेंतलें.
गीतेचे अमृतासमान घुटके आम्हीं सदा घेतले.
जर्यानी पटका अजिंक्य भगवा झेंडा स्मरा हो स्मरा!
नेता, छत्रपति, स्वराज्यजनिता, राजा शिवाजी स्मरा!
वंदा हिंद सुमातरं, जमुनिया सारे चला, व्हा पुढें!
आहे ठेवियलें स्वराज्य--फल ह्या यत्नांपुढें रोकडें." १३

× × ×

जेथें सर्व विपक्षवीरहृदयें पृथ्वीपरी भेदिता,
मार्तंडावरि आदळोनि सगळें ब्रह्मांड हेलाविता,

ऐसा घोष करोनि, घोर समरीं तो वीर शत्रूवरी
उल्कातुल्य पडे; प्रकोपदहनीं लीन स्वदेहा करी. १४

× × ×

जेथें वीर बलाढ्य शस्त्रधर ते निःशस्त्र बंधूंवरी
क्रूर श्वापदसे तुटोनि पडती, कीं वन्य मारेकरी,
तेव्हां उन्नत धर्मतत्त्व; म्हणती ज्याला ‘ तितिक्षा ’ असें,
त्याचें गाढ अभेद्यसें कवच तें अंगांत ज्याच्या असे,
ऐसें बांधव धर्मवीर अमुचे तो मारही सोशिती,
ध्येयातें अनुलक्षुनी प्रगतिला जें शांतिनें ठेविती;
जेथें अप्रतिकार वर्तन असें लोकोत्तरांचें घडे.
जेथें जयजयकार गर्जति, जिथें होती फुलांचे सडे १५

× × ×

काळानें तनु वांकली, सकलही अंगास आली जरा,
दुःखांचा नयनांमधोनि झरतो वाटे उन्हाळा झरा,
चर्या खेदभरें—वयें—उतरली, माथा रुपेरी दिसे;
म्हातारी निज दंड टेकित अशी कारागृहीं येतसे.
“ बाबांनो ! ” करुणस्वरेंच म्हणते काराधिकाऱ्यांस, “ रे
पाहूं द्या मज, भेटवा कुणीतरी माझीं मला वांसरें !
सारे थोर, निरापराध, शिणती माझी दशा पाहुनी
देवा ! दे मजला सुखें मरण दे ह्या पारतंत्र्याहुनी ! ”

× × ×

जेथें सिंधुतरंग एक सहसा पेटोनिया लागली
लाखोंही लहरी जणों उजळल्या विद्युत्प्रदीपावली !

सूर्येन्दू नसतां असा तळपुनी तो अंबुधी राहिला;
सृष्टीचा–प्रभुचा–अगाध महिमा हा विस्मयें पाहिला. १७

× × ×

जेथें विठ्ठल भक्तसंघ जमले श्रीचंद्रभागातटीं,
जेथें विठ्ठल विठ्ठल ध्वनि निघे टाळांचिया संपुटीं;
जेथें विठ्ठल हाच घोष घुमला संघा–मृदंगातुनीं,
आहे विठ्ठल हाचि एक अवघा सर्वत्रही व्यापुनी १८

× × ×

रत्नाकरा ! नव मनोहर पाडसा रे
बाळा ! तुझें करिति कौतुक लोक सारे.
पाहोनि रूप गुण सुंदर मींहि धालों;
खाऊ तुला म्हणुनि घेउनि आज आलों.
ये भेट ये कडकडोनि किशोरका तूं !
आधीं मुका मधुर ! नंतर घेइं खा तूं–
मेवा परोपरि असे, तुज आवडेल.
माझें तुला स्मरण याचमुळें घडेल. १९

× × ×

शब्दब्रह्मचि अंतरिक्षसम तें, सीमा तयाला नसे.
जागोजाग विलास त्यांतुनि तुझा नानापरी होतसे.
येथें शक्य नसे परी उतरणें तीं सर्व रम्य स्थलें.
कांहींचे जनरंजनार्थ कविते ! आलेख्य हे लेखिले. २०

## ३७. गृहिणीचे डोळे

[ कोणी एक रसिक विद्वद्वर्य आपल्या सुशिक्षित गृहिणीसमागमें एकान्तांत बसले असतां गृहिणीच्या डोळ्यांशीं त्यांच्या दृष्टीची एकतानता झाली. तेव्हां त्यांच्या सौंदर्यानें खूष होऊन लाडकीस म्हणतात—"काय सांगूं! तुझे हे डोळे किनई—" ]

( चाल—उघडिं नयन रम्य उषा० इ० )

मधुर मधुर हेच झरे प्रेम–जीवनाचे
बघुनि यांस हर्षभरें रसिक जीव नाचे ! ध्रुव०

पुष्करिणी ? कीं हरिणी ?
गुरुशुक्रान्वित रजनी ?
नृत्य असें नित्य मनीं
होय कल्पनांचें. १

श्रीयुत मुखकमल कसें
खुलुनि हंसे गुलगुलसें !
यावरि हे झुलति जसे
भृंग मधुवनाचे. २

हे विनयें खालवले
अमृतभरें वा लवले
बघुनि यांस आठवले
पुंज नव घनांचे. ३

## ३७. गृहिणीचे डोळे

[ कोणी एक रसिक विद्वद्वर्य आपल्या सुशिक्षित गृहिणीसमागमें एकान्तांत बसले असतां गृहिणीच्या डोळ्यांशीं त्यांच्या दृष्टीची एकतानता झाली. तेव्हां त्यांच्या सौंदर्यानें खूष होऊन लाडकीस म्हणतात—“ काय सांगूं! तुझे हे डोळे किनई—” ]

( चाल—उघडिं नयन रम्य उषा० इ० )

मधुर मधुर हेच झरे प्रेम—जीवनाचे
बघुनि यांस हर्षभरें रसिक जीव नाचे ! ध्रुव०

पुष्करिणी ? कीं हरिणी ?
गुरुशुक्रान्वित रजनी ?
नृत्य असें नित्य मनीं
होय कल्पनांचें. १

श्रीयुत मुखकमल कसें
खुलुनि हंसे गुलगुलसें !
यावरि हे झुलति जसे
भृंग मधुवनाचे. २

हे विनयें खालवले
अमृतभरें वा लवले
बघुनि यांस आठवले
पुंज नव घनांचे. ३

अन्नजलीं रुचि भरिती
संतर्पण आचरिती
गृहमेघांतुनि करिती
साह्य इंधनाचें. ४

परवशता भरुनि उरे
छळिति दैत्य; हाल बुरे
तरि कारागृहचि वरें
नयन-बंधनाचें. ५

यांचे मृदु विभ्रम ते
किति सुललित ! मन रमतें.
हेंच मला सुख गमतें
नंदना वनाचें. ६

झगझगतें तेज कसें !
दिव्य जवाहीर असे !
फळफळलें दैव दिसे
आज ह्या जनाचें ! ७

पूर्ण चंद्र उगवुनियां
चंदेरी करि दुनिया
भिडति हे चकोर तया
कांत-लोचनांचे. ८

कांतिसुधा मजवरते
हिमगंगा अवतरते
अनुलेपन ही करिते
मलयचदनाचें. ९

सुधवल हे किरण कसे !
चांदीचे शरचि जसे.
झरति सखे यांसरसे
चंद्रमणि मनाचे. १०

जनदृष्ट्या सधन न मी
परितोषा काय कमी ?
दृष्टिच ही मानिन मी
कवच कांचनाचे ! ११

धमक चमक नित्य नवी
आणुनि ही मन जमवी.
संजीवन म्हणति कवी
हीच जीवनाचें. १२

मीनाक्षी ! हे महिले !
स्थान तुझें ये पहिलें ;
बक्षिस हें म्हणुनि दिलें
सदभिनंदनाचें १३

प्रकाशन—पारिजात.

## ३८. इंद्राचें स्तोत्र

हे इंद्र ! गौरव तुझा, त्वदुपासना ही
ह्या भारतामधुनि संप्रति होत नाहीं.
ती आमुच्या ऋषिवरांतुनि वेदकालीं.
ऋक्–सामगायन करोनि अपार झाली. १

ज्याच्या कृपेंकरुनि हे जन अन्न–पानें
सेवोनि तृप्त असती वसती सुखानें,
त्यालाच ते विसरले ! स्वसुधारणा ही
मी आरशांत बघतों विपरीत कांहीं ! २

पूर्वेस होउनि पराङ्मुख पूर्वदेवा,
प्रत्यङ्मुखास भजतात अपूर्व देवा !
जो अस्त तो उदय मानियला जनांनीं,
त्यानें किती अहित हो निज मानहानी ! ३

ज्याचे उदार सरदार थवे घनांचे,
विद्युल्लता जयपताक सवेग नाचे,
ज्याचा प्रचंड रणदुंदुभि गर्जना ही
साऱ्या जगास हलवोनि घुमोनि राही. ४

'या हो !' असा करुनि एकच उंच टाहो
ज्याचें मयूर रणशिंग पुकारिता हो,

ज्याचें विशाल धनु सुंदर सात रंगी,
ग्रीष्मासवें करितसे रण जो प्रसंगीं. ५

प्राची दिशापति नियामक पावसाचा,
तो इंद्रदेव, जगजीवन तोच साचा.
वंद्यांस वंद्य, अधिदेव नमूं तयाला;
भावें भजूं करुनि तद् गुणगौरवाला. ६

यज्ञांत आहुति जया पहिलीच आहे,
जो तृप्त होउनि तिनें मग वर्षताहे,
धारा असंख्य अभिषेकुनि तो रुपेरी,
त्यांतून मौक्तिक हिरे जणुं काय पेरी. ७

गारा कधीं वरसतो, किति दिव्य नूर!
इंद्रा! खरोखरच ते तव कोहिनूर!
झाडें, लता, गवत, यांवरि सर्व मोतीं!
दैवीच संपत, अगाध नमों नमों ती! ८

देशांतुनी तव कृपेंच सुभिक्ष साजे,
श्रीमंत लोक बनतात तसेच राजे;
उत्साह जीव धरिती नवजीवनानें,
सानंद सर्व असती तनु–वाङ्मनानें. ९

सौंदर्यदेव तरि तूंचि सुरेन्द्रनाथा!
जें रम्य सुंदर दिसे भुवनीं पहातां,
त्यांतून अंश तव ह्या गुणवैभवाचा
थोडाबहूत असतो असतोच साचा. १०

इंद्रा! तुझें भुवन, मंदिर वैजयंत,
आराम नंदनवनासम शोभिवंत,

त्यांतील कल्पतरु, वल्लरि देवरामा,
सौंदर्यसार सगळेंच अतर्क्य आम्हां ! ११

हे मेघनाथ ! तव सुंदर मेघमाला
स्वप्नापरी दिसुनि मावळल्या अम्हांला ;
तत्रापि आकलन त्या करुनी मनांनीं
स्नेहाळ रंगवियल्या किति रोमनांनीं. १२

आतां कलानिपुण जे बनले फिरंगी,
तद् बिंब ते उतरिती जल–तैल–रंगीं.
कोणा सभोंवतिं सतेज सुवर्णरेखा,
आकार रंग किती रम्य छटा अनेका ! १३

छायाप्रकाशकृत संकर काय नामी !
हें रूपवैभव तुझें किति वानुं गा मी !
पाश्चात्य हे जन अपूर्वच रंगवीती
पौर्वात्यवैभव, अम्हां किति लाजवीती ! १४

लाभे प्रसाद तव थोरच अर्जुनाला.
तो भारतांत नरवीर अजिंक्य झाला.
होसी तयास समरीं हरि ! वांचवीता.
त्या कारणेंच जन लाभति दिव्य ' गीता. ' १५

सौंदर्य, शौर्य, जय, तेज तसेंच त्याचें
संधान सर्वच अलौकिक जाणत्याचें !
आम्हांस लेश तरि त्यांतिल दे उदारा !
आधार तूंच पतितांस आम्हांस सारा. १६

ते यज्ञयाग शतशः अमुचे स्मरावे,
ऋक्–सामगायन मनोरम आठवावें;

तूं आमुची जपतपादि उपासना ती
ध्यानांत आणुनि कृपा कर, ही विनंती. १७

ये, धांव पाव सदया ! समयास या तूं;
हे लोकपाल ! पुरवीं तव आर्यहेतू
आहोंत आज सगळेच अनार्यदास.
नेवो अम्हां तव कृपा अमुच्या पदास. १८

प्रकाशन--नवजीवन
एप्रिल, १९३४.

## २९. मानसपूजा

झुले जो झुला रम्य रत्नाकराचा
गमे सोहळा तो तुझ्या आसनाचा.
विराजे प्रभो ! त्यावरी तूं कृपाळू.
तुला भक्तिनें मंगल स्नान घाळूं. १

सुगंधीच निष्कर्ष हे भावनांचे,
मनाचें नव्हे तैल हें चंदनाचें;
अगा शब्द, साहित्य, सत्कल्पना, मी
म्हणे अर्गजा हे मसालेच नामी २

तुला सन्मती ही करी मर्दवातें,
करी त्यासवें प्रेम–संवर्धनातें;
झडे गर्जना लागली एक धार,
असे हाच मंत्राभिषेक--प्रकार. ३

महावात भिन्ना दिशांचे सुरेशा !
पुशीती तुला; हाच शागिर्दपेशा.
शरत्कालचा जो दिनारंभ त्यानें
तुझा झांकिला देह पीतांबरानें. ४

उषा दे तुला केशरी दिव्य शेला;
बघोनी हंसूं काय आलें दिशेला !
उदेला दिगंतास अर्धांशुमाली
किरीट प्रभो ! हाच मानोनि घालीं. ५



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]

सुगंधी मळे काश्मिरीं केशराचे
उभें गंध तें साजतें श्रीधराचें.
खुले त्यांत कृष्णागरूची सु-रेखा,
टिळा शांतिचीं श्याम चिन्हेंच देखा ! ६

पिठासारखे केतकींचे पराग
तुझे कल्पितों तेच मी अंगराग.
सहस्रावधी बिंदु ताजे दंवाचे
जवाहीर हें माझिया माधवाचें ! ७

किती लक्षुं मी ‘ लक्षुमीकांत !’ आतां ?
तुला दृष्ट लागेल नाथा ! पहातां
तुझें वेड राधेपरी अंतरींचें
हरी ! हार हे तुळसी--मंजरीचे. ८

मनें धांवुनी, जाउनी लांब लांब,
तुला आणिले काश्मिरी हे गुलाब.
प्रफुल्लारविंदेंच हीं मानसाचीं
मुनींच्या जणों वैभवें मानसांचीं ! ९

तशीं पुष्करांतोनि ताजीं फुलेलीं
अशीं पुष्करेंही पहा आणियेलीं.
कनोजांतली जातिवंता चमेली
हिनें पुष्पराजांवरी मात केली. १०

अबूच्या पहाडांतला सोनचांपा
कसा शुभ्र हा त्र्यंबकांतील चांपा !
प्रभो ! केतकी हीच गोदातटींची;
घुमे घमघमे कीर्ति ह्या गोरटीची. ११

बगीच्यांतल्या सर्वही संकुलांनो,
प्रभूच्या मुलांनो, चला या फुलांनो!
तुम्हांवांचुनी सांगता पूजनाची
घडेना समाधान शांती मनाची. १२

करा आज ‘फुलडौल’ लोकाभिरामा,
तुम्ही दाखवा स्वर्ग येथेंच आम्हां.
मनाच्या मृगाचा मदोन्माद–गंध
विवेकानलीं तो जळे धूप मंद. १३

तुझ्या भक्तिची ज्योत तेजाळ नामी
प्रभो! दीप ओवाळितों हा तुला मी १४

नवीं काव्य–सूक्तेंच पक्वान्नराशी
करोनी तुला वाढिल्या श्रीधरासी.
पहा सेवुनी नाथ! हे ठाव ताजे;
तुझा तोष तो मोक्ष– कैवल्य माझें! १५

अगा रमेच्या विमलान्तरंगा!
घे निर्मला ही मम भावगंगा.
सरस्वतीचे रस-रंग नाथा!
देतों विडे हे तुज रंगनाथा! १६

रंगोनि कैसें मुख लाल झालें!
हें प्रेम माझें उदयासि आलें.
संतुष्ट जो हा स्वमनीं सदाही
भांडार त्याचें तव दक्षिणा ही. १७

संशुष्क राळेसम वासनांचा
बंबाळ कापूर जळेच साचा.

मी दौड घेतों चरितार्थ धांवा,
प्रदक्षिणा ह्या तव वासुदेवा ! १८

ज्या भाषणांनीं व्यवहार चाले,
सन्मित्र होती जनही रिझाले,
स्तोत्रेंच तीं सर्व रमाधवाचीं,
वा सच्चिदानंद उमाधवाची १९

मी कर्म जें जें करितों सदाही
कीं स्वस्थ बैसें करितां न कांहीं
आराधना ती मम माधवाची,
वा सच्चिदानंद उमाधवाची. २०

न जाणतां जे अपराध झाले,
प्रमाद जे मीं समजोनि केले,
क्षमा करीं ते सगळे दयाळा;
घालीं कृपेच्या कवचास याला. २१

दे वा न दे भंगुर संपदांसी;
अक्षय्य ठेवीं तुझिया पदाशीं.
ह्याहूनि मागों वर काय आतां ?
हा वाहिलाहें तुज नाथ ! माथा. २२

वडोदें, १–५–३५
अप्रसिद्ध.

# काव्यपरिचयात्मक टीपा

१. **कोकिल :** – ह्या कवितेंत कोकिलाच्या पंचमालापांनीं आश्चर्यचकित होऊन कवीनें त्याच्या नैसर्गिक गुणांपुढें रूपसौंदर्याच्या प्रतिष्ठेची गौणता ध्वनित केली आहे. छापून प्रसिद्ध झालेली चंद्रशेखरांची ही पहिली कविता होय.

२. **इतिहास :**– इतिहास हा मूर्तिमंत पुराणपुरुष कवीपुढें आविर्भूत होऊन त्याचें मन शृंगारिक वाङ्मयापासून परावृत्त करून तें ऐतिहासिक थोर पुरुषांच्या चरित्रांकडे वळवीत आहे. या काव्यांत इतिहासाचें महत्त्व ध्वनित करून, तरुण पिढींत स्वदेशप्रीति, स्वातंत्र्यप्रेम इ. भावनांची जोपासना करणारें एक प्रभावी साधन म्हणून इतिहासाची प्रशंसाहि केली आहे.

३. **विपर्यास :**– इ. स. १८९६ सालीं पुण्यासारख्या महाराष्ट्र–राजधानीची व आरोग्यभुवनाची प्लेगनें जी दुर्दशा उडविली तिचें वर्णन या काव्यांत आहे. या वर्णनांत पुणें शहराच्या पूर्वीच्या सुस्थितीचें आणि प्लेगामुळें उडालेल्या दुर्दशेचें तुलनात्मक शब्दचित्र आहे. दुःस्थितीबद्दल सहानुभूतीनें दिलगिरी व्यक्त केली आहे.

श्लो० १७ अशुभा शुभांची = अमंगल गोंवऱ्यांची. शुभा = गोंवरी; यज्ञांतील पारिभाषिक शब्द.

४. **मानिनी :**– हें काव्य शेक्स्पिअरच्या " A wife's duty " या काव्याचें सोज्ज्वल भाषांतर आहे. यांत त्या महाकवीच्या अधिकारयुक्त

वाणीनें गर्विष्ठ स्त्रियांची कानउघाडणी करून त्यांचे पति त्यांच्या सुखासाठीं किती जिवापाड परिश्रम करतात ह्याची त्यांस जाणीव करून दिली आहे. शेवटीं त्यांनीं आपल्यासाठीं अहोरात्र खपणाऱ्या पतीशीं किती आदरयुक्त व प्रेमळ वागणूक ठेविली पाहिजे तें ध्वनित केलें आहे. काव्य ओजस्वी झालें आहे.

आनृण्य = उपकारांची फेड.

५. **स्वदेशप्रीति** :– हें काव्य सर वॉल्टर स्कॉटच्या जाज्वल्य देशाभिमान व्यक्त करणाऱ्या प्रसिद्ध इंग्रजी काव्याचें भाषांतर आहे. मूळ इंग्रजी काव्याच्या पहिल्या ओळी आरंभीं दिल्या आहेत, त्यावरून मूळ काव्यांतील ओज भाषांतरांत आणण्याचा केलेला प्रयत्न लक्षांत येईल.

६. **दत्तवियोग** :– कै. कविवर्य दत्तात्रय कोंडो घाटे हे चंद्रशेखरांचे परमस्नेही होते. या दोघा कविमित्रांनीं कवितादेवीच्या उपासनेंत बडोद्यास कांहीं काळ अखंडपणें एकमेकांच्या सहवासांत घालविला. दत्तकवि बडोदें येथें अधिकाराच्या जागेवर असतां ऐन तारुण्यांत एकाएकीं निधन पावले. त्यांच्या मृत्यूवर हें शोकगीत रचण्यांत आलें आहे. दत्तकवींची कविता “ दत्तांची कविता ” या नांवानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध आहे. दत्तांच्या कांहीं लोकप्रिय काव्यांचा या शोकगीतांत उल्लेख केला आहे ( श्लोक १८ पाहा ). कै. दत्तकवि हे महाराष्ट्रांतील साहित्य व शिक्षणक्षेत्रांतील नामवंत श्री० विठ्ठलराव घाटे यांचे वडील होत.

श्लो. १०–मोह–‘ तंद्रा मोहः प्रलापश्च ’ इ० वैद्यकांतील विषमज्वराच्या लक्षणांस अनुलक्षून हा मोह शब्द येथें योजिला आहे.

दत्तकवींचें व्यक्तित्व व काव्यगुण या शोकगीतांत वर्णिले आहेत. ‘ दत्तांची कविता ’ या काव्यसंग्रहास चंद्रशेखरांनीं प्रस्तावना लिहिली आहे.

७. **घनाभिनन्दन** :– विक्रम संवत् १९५६ सालीं ( सुमारें ६४ वर्षांपूर्वीं ) गुजरात प्रांतांत दुष्काळानें मोठा प्रलय केला. त्याच्या अखेरीस मेघागमन होऊन पर्जन्याचें सुचिन्ह दिसतांच कवीनें मोठ्या उत्कंठेनें त्याचें या काव्यांत आवाहन केलें आहे. गेलेले कठीण दिवस आणि भावी सुदिनांची आशा यांच्या संगमाचें सरसरमणीय चित्र या काव्यांत

आढळतें. दुष्काळानें उडविलेल्या दुर्दशेचें काव्यांतील वर्णन हृदयद्रावक आहे. मुंबई विद्यापीठाच्या प्रवेशपरीक्षेसाठीं तयार करण्यांत आलेल्या मराठीच्या पाठ्यपुस्तकांत हें काव्य समाविष्ट करण्यांत आलेलें होतें, त्यामुळें तें विद्यार्थिवर्गाच्या परिचयाचें आहे.

८. **माधवनिधन** :– न्या. रानडे यांच्या मृत्यूची बातमी बडोद्याच्या ' सयाजीविजय ' वृत्तपत्राच्या कचेरींत तारेनें आली. त्या वेळीं अल्पावधींत हें शोकगीत रचून सयाजीविजयांत प्रसिद्ध करण्यांत आलें. यांतील विचार व भाषासरणी प्रसंगोचित आहे.

९. **कविसंदेश** :– हा संदेश पुणें येथें कै. विष्णु मोरेश्वर महाजनी यांच्या अध्यक्षतेखालीं मराठी लेखकांचें तिसरें वार्षिक संमेलन ता. १८ व १९ मे १९०७ रोजीं भरलें होतें, त्या वेळीं सभेंत वाचण्यासाठीं पाठविला होता. कविसंदेशांत, " हल्लीं कवि होणें शक्य नाहीं " या आक्षेपास उत्तर देण्यांत आलें आहे, आणि नवकवींबद्दल सहानुभूति बाळगण्याची विनंति करण्यांत आली आहे. तत्कालीन नवोदित लेखकांनीं या संदेशाचें हार्दिक स्वागत केलें होतें. इ. स. १९२१ सालीं बडोदें येथें भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष कै. तात्यासाहेब केळकर यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत या संदेशांतील आर्या ४४ व ४५ उद्धृत केल्या होत्या. [ संप्रति....भारांनीं. ]

१०. **युवराजवियोग** :–बडोदें संस्थानचे युवराज कै. फत्तेसिंगराव यांचें तरुण वयांत १९०८ सालीं निधन झालें. त्या दुःखद प्रसंगीं हें शोकगीत रचण्यांत आलें. बडोद्याच्या लक्ष्मीविलास राजवाड्यांत युवराजांच्या फोटोखालीं या शोकगीतांतील " प्रख्यात भोसल्यांची तनया......बाळ हा चिमणा ! " ही आर्या लिहिण्यांत आली.

११. **कारंजें** :– बडोदें येथील सार्वजनिक बागेंत पदार्थसंग्रहालयाजवळ एक सुंदर कारंजें आहे; त्याच्या फवाऱ्याच्या पंचधारा झुलत असतां हर्षानें कवींची एकतानता होऊन, आंग्लकवि लोबेल यांचें ' Fountain ' हें मजेदार काव्य दृष्टीसमोर साक्षात् उभें असल्याचा भास झाला. त्या विचारांचें प्रस्तुत काव्य हें शब्दचित्र होय.

१२. **कुंजकूजन** :–गुजरात प्रांतांत लताकुंजांतून अत्यंत मधुर स्वरानें गाणाऱ्या पक्षिजातींत एक लहानसा पक्षी आहे. त्याचे कोमल आलाप ऐकणारांस मोहित करतात. ते ऐकून हें काव्य रचलें आहे. या काव्यांत प्रसादगुण प्रामुख्यानें असून, आंग्लकवि शेलेच्या ' Sky Lark ' या काव्याशीं कुंज-कूजनाची कांहीं रसिकांकडून तुलना करण्यांत आली होती. कविवर्य माधवराव पटवर्धन यांचें हें आवडतें काव्य होतें, व त्यांनीं आपल्या लेखांतून यांतील कांहीं ओळी ( श्लो० ३३, ३४ ) उद्धृत केल्या आहेत.

१४. **कवितारति** :– या लोकप्रिय काव्यांत कवीनें काव्यदेवतेस प्राचीन कवींच्या काव्यालंकारांनीं नखशिखान्त सजविलें आहे व तिचा अनुग्रह प्राप्त व्हावा म्हणून आपण किती त्याग केला तें निवेदन केलें आहे. शेवटीं कवितादेवीची प्रेमळ शब्दांत विनवणी करून कृपेची याचना केली आहे.

श्लो० ८–९ प्रतिभासंपन्न कवीला काव्यस्फूर्ति होते त्या वेळीं होणाऱ्या संवेदनांचें वर्णन.

श्लो० २४–देवद्वय = ज्ञानदेव व नामदेव.

१५. **वसंतमाधव** :– मधु = चैत्रमास आणि माधव = वैशाखमास यांचा सामासिक शब्द मधुमाधव अर्थात् वसंत याचें आधिभौतिक आणि अध्यात्मिक वर्णन या काव्यांत आहे. या काव्यास प्रकाशकांकडून पारितोषिक देण्यांत आलें होतें. हें प्रथम करमणुकीच्या खास अंकांतून आणि नंतर शारदामंडळाच्या स्वतंत्र काव्यसंग्रहांतून प्रकाशित करण्यांत आलें होतें.

१६. **हिंदवंदना** :– आपल्या मातृभूमीचें हें एक सर्वांगसुंदर काव्यचित्र आहे. इ. स. १९१२ सालीं करमणुकीचा एक खास अंक ( दिल्ली दरबार अंक ) काढण्यांत आला होता, त्यांतून हें प्रथम प्रसिद्ध झालें. सदर काव्यांत मातृभूमीचें अलौकिक रूप आणि गुण, तसेंच तिच्या ठायीं वसत असलेलें कवीचें निःसीम प्रेम यांचें सुंदर चित्रण झालें आहे.

१७. **अद्‌भुत वीणा** :– पृथ्वी आणि स्वर्ग हे दोन भोपळे तर्कांच्या बळकट वीणादंडास जोडून त्यावर अनेक भुवनांचे पडदे आणि मनाच्या तारा कैवल्यधामापर्यंत लावून सज्ज केलेली, ही अद्‌भुत अशी काल्पनिक

रुद्रवीणा आहे. ही वीणा वाग्देवीच्या सात सख्या आळीपाळीनें हातीं घेऊन तिच्या चरणारविंदाजवळ छेडीत असतां तिच्या स्वरसंगमानें संपूर्ण ब्रह्मांडांत साक्षात् नादब्रह्म विलसत आहे. सरस्वतीच्या सख्या अनुक्रमें १. करुणकुमारी, २. सहानुभूति, ३. आशागौरी, ४. भाविनी, ५. प्रेमला, ६. योगिनी, आणि ७. उपासना या देवता सदरहू अद्भुत-वीणेवर आपापल्या नांवांस अनुरूप अशीं गीतें गात आहेत व त्यायोगें आब्रह्म अशीं अनंत भुवनें जगदात्म्याच्या महासागरासारख्या अतर्क्य महिम्यानें उचंबळून राहिलीं आहेत. या वीणेचे व गायकांचे प्रतिध्वनि भाविकांच्या अंतःकरणांत सदैव घुमून राहतात व ते सर्वत्र नंदनवनांतील ब्रह्मानंदाचा लाभ अनुभवीत असतात. ज्या पाखंडवाद्याच्या अंतःकरणांत हे प्रतिध्वनि शिरत नाहींत, त्याचें जीवित व्यर्थ होय, असा या काव्याचा सारांश आहे. हें वेदान्तपर काव्य लावणींत गाइलें असून तें प्रथम 'नवयुग' मासिकांत प्रकाशित झालें.

१८. **अश्रुकरभार** :—रॉ. ए. सोसायटी, मुंबई या संस्थेच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल अर्वाचीन कविमित्र गंगाधर रामचंद्र मोगरे यांचेवरील हें निधन-गीत कवीनें मोठ्या आत्मीयतेनें लिहिलें आहे.

आर्या—७—कै. मोगरे कवींचा गुणगौरव कै. न्या. रानडे, रा. गो. ना. कानिटकर यांनीं आपल्या साहित्यविषयक लेखांतून केला आहे.

१९. **महाराष्ट्र—दर्शन** :— इ. स. १९१५ सालीं मुंबई येथें भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनास उद्देशून प्रेमळ संबोधन करण्यासाठीं हें काव्य रचण्यांत आलें. महाराष्ट्राविषयीं कवीचा जिव्हाळा यांत व्यक्त झाला आहे.

२०. **धन्यवाद** :— कविमित्र श्री. माधवराव काटदरे यांच्या पत्नी कै. रमाबाई कवयित्री होत्या. त्या स्वप्नावर एक काव्य लिहीत असतांना तें पूर्ण न होतांच त्यांना मृत्यु आला असें माधवरावांनीं खेदानें कवींस कळविलें. तेव्हां कै. रमाबाईनीं लिहिलेल्या अपूर्ण काव्यांतच त्याची पूर्णता आहे असें युक्तीनें सिद्ध करण्याचा प्रयत्न करून, कवयित्रीस हा धन्यवाद दिला आहे.

२१. **समजूत** :— चंद्रशेखरांचे परममित्र कै. दत्तकवींचें चिरंजीव श्री. विठ्ठलराव ऊर्फ दादासाहेब घाटे यांस उद्देशून हें पद रचण्यांत आलें

आहे. श्री. विठ्ठलराव विद्यार्थिदशेंत असतांना काव्यवाचन, चर्चा इ० साठीं नेहमीं घरीं येत असत. बरोबर कै. माधवराव पटवर्धनहि असत. बडोद्यास कवींकडे ही मंडळी जमल्यावर काव्यगान, चर्चा खूप रंगत असे व भवभूतीच्या प्रसिद्ध उक्तीप्रमाणें ( अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् । ) केव्हां केव्हां सबंध रात्र काव्यानंदांत व्यतीत होत असे. अशा काव्याच्या आस्वादग्रहणांत एकदां या तरुण मंडळींच्या कांहीं वाक्यांवर कवि रुष्ट झाले. रुसवा बराच काळ टिकला. त्यानंतर कै. दत्तांच्या सहवासाच्या आठवणी निघून कवींस दीर्घकालीन रुसव्याबद्दल खंत वाटली आणि पुत्रवत् प्रेम असणाऱ्या दादासाहेबांची समजूत काढण्यासाठीं हें पद्य रचलें. या वेळीं दादासाहेब होळकर कॉलेज, इंदूर येथें विद्यार्थी होते. त्यांच्या वाचनांत नवयुग मासिकांत प्रकाशित झालेलें हें पद येतांच त्यांना आनंद झाला आणि प्रेमळ नात्याचें पुनरुज्जीवन झालें. या पदांतील ‘ दत्त ’ हा उल्लेख दत्तकवींबद्दल आहे.

२२. **लेंभे यांची कविता** :– मराठी भाषेचे अर्वाचीन रसिक कवि श्री. लेंभे यांच्या कवितेचें कौतुक करण्याच्या हेतूनें काव्य रचलें आहे. आरंभीं दिलेलें Homer च्या Iliad मधील अवतरण अर्थपूर्ण असून श्री. लेंभे यांच्या काव्याचे प्रमुख गुण थोडक्यांत परंतु स्पष्ट वर्णिले आहेत. समकालीन कवींच्या काव्यांचें स्वागत मोठ्या औदार्यानें कवीकडून होत असे.

२३. **काय हो चमत्कार !** :– आबालवृद्ध मराठी भाषिकांचें हें अत्यंत आवडतें खंडकाव्य आहे. “ कायहो चमत्कार ! ” हें एक अवीट पक्वान्नच आहे, असे उद्गार टीकाकारांनीं या काव्याबद्दल काढले आहेत. कवि परगांवीं गेले असतां निरनिराळ्या ठिकाणीं त्यांचे काव्यवाचनाचे कार्यक्रम होत. त्यांत कविमुखानें हें काव्य ऐकावें अशी श्रोत्यांची फार इच्छा असे. १९३४ सालीं कवि कराचीस असतां तेथील महाराष्ट्रीय समाजांत या काव्याचे आठ कार्यक्रम झाले. यावरून परप्रांतांत वसणाऱ्या महाराष्ट्रीय बांधवांतहि याची लोकप्रियता किती होती हें स्पष्ट होईल.

श्री. माडखोलकर सदर काव्याच्या परीक्षणांत म्हणतात, “ चन्द्रशेखरांच्या ‘ काय हो चमत्कार ! ’ या लोकप्रिय खंडकाव्याला जी इतकी अवीट गोडी आली आहे, ती त्यांच्या अतुल चित्रणचातुरीमुळेंच होय.

आर्येसारखें गद्यसदृश वृत्त; कथानक पहावें तर तेंहि अगदीं ग्रामीण पण चन्द्रशेखरांनीं त्यांतील प्रत्येक प्रसंग इतका सहृदयतेनें आणि सुन्दर रेखाटलेला आहे कीं, त्याच्यापुढें अलीकडील नकली चटकदार वैणिकें आणि चित्ताकर्षक प्रणयकथा अगदीं फिक्या वाटतात...जानपद जीवनाच्या मुग्ध पार्श्वभूमीवर चन्द्रशेखरांनीं उभी केलेली ही मृत्यूवर मात करणाऱ्या दिव्यप्रेमाची करुणकथा इतकी रसपूर्ण आहे कीं, तिला मराठी खंडकाव्यांत केवळ स्वतंत्रच नव्हे, तर श्रेष्ठ स्थान देण्याचा मोह पडतो. ”

“ काय हो चमत्कार ! ” हें “ Suffolk Miracle. ” नांवाच्या एका करुणरसपूर्ण इंग्रजी लावणीचें रमणीय रूपान्तर आहे.

२४. **उत्कंठिता** :– आंग्लकवि Joseph Addison याच्या “ Rosamond's Song. ” या प्रेमगीताचें हें हुबेहूब भाषांतर लावणीच्या चालीवर रचलें आहे.

२५. **शारदे** :– कवीच्या जीवनांतील सुमारें ७–८ वर्षांच्या औदासीन्याच्या काळानंतर पुनः काव्यरचनेस सुरुवात झाली तेव्हांचें हें शारदेस उद्देशून लिहिलेलें सुनीत होय. यांत कविमनाचे गुण अत्यंत सरस रीतीनें थोडक्यांत वर्णिले असून शेवटीं शारदेची कृपा मागितली आहे.

२६. **प्रेमाचें संक्रमण** :– हें काव्य तत्त्वज्ञानविषयक असून, मानवी प्रेमाचें खरें संक्रमण कोठें व केव्हां व्हावें याबद्दल कवीनें आपला अभिप्राय यांत सूचित केला आहे.

२७. **प्रेमलोद्गार** :– दररोज सायंकाळीं घरांतील मुलांचा स्तोत्रपाठ घेण्याची प्रथा कवींच्या घरीं असे. या वेळीं ‘ बृहत् स्तोत्ररत्नाकर ’ हें कवींचें आवडतें पुस्तक नेहमीं जवळ असे व त्यांतून नवीं नवीं स्तोत्रें म्हटलीं जात. अशा स्तोत्रांत उपमन्यूचें शिवस्तोत्र मोठ्या आवडीनें म्हटलें जाई. त्या स्तोत्रांतील अवतरण या काव्याच्या आरंभीं दिलें असून त्या कल्पनेवर सदर काव्य आधारित आहे. शांत वेळीं मंद मंद वाहणाऱ्या वायूच्या झुळकी, सूर्योदयापूर्वीचें दिव्य उषेचें आगमन, ऋतुराज वसंतानें सृष्टीस येणारें मोहक रूप या सर्वांत कवीला ईश्वराचें अस्तित्व भासतें त्याचें हृदयस्पर्शी वर्णन ह्या काव्यांत आहे.

२८. **कीर्ति आणि प्रीति** :–या दीर्घ काव्याचा उत्तरार्ध ‘ प्रीतीचे बोल ’

या नांवानें मनोरंजन मासिकांत ( जुलै १९२९ ) प्रसिद्ध झाला. पूर्वार्ध ( कीर्ति ) अप्रकाशित होता तो मूळ चंद्रिकेच्या प्रथमावृत्तींत प्रथम प्रकाशित झाला. पूर्वार्धाची रचनाच नंतरची आहे. तो तयार झाल्यावर दोन्ही अर्ध कीर्ति आणि प्रीति या नांवानें एकत्रित करण्यांत आले. यांत कीर्ति आणि प्रीति यांवर जीवत्वारोप करून कीर्तीला व वैभवाला साजेसें रूप आणि पेहेराव कीर्तिदेवीला देऊन आपलें मनोगत ती कवीला सांगत आहे असें वर्णिलें आहे. प्रीति ही कीर्तीला सवत मानून स्वतःचे मनोभाव कवीला सांगते. त्यांत प्रणयाच्या उन्मनी अवस्थेचा अनुभव घेतलेला प्रियकर ( कवि ) आपणांस विसरेल हें संभवत नाहीं अशी ग्वाही देते. काव्याची रचना सुश्लिष्ट साधली असून त्यांतील प्रसादगुणहि स्पष्ट व्यक्त झालेला आहे.

कीर्ति – ४. सौरभें उणा – वास नसलेला गुलाब.

सौवर्णानि सरोजानि निर्मातुं सन्ति शिल्पिनः ।
तत्र सौरभनिर्माणे चतुरश्चतुराननः ॥ – सुभाषित

–९ तारकामंडलें – एके काळीं लोकप्रिय असलेला ‘ तारामंडळ ’ नांवाचा चमकदार बांगड्यांचा प्रकार.

–२३ पुढील कल्पना पाहा :–

“ Children thumb it.
Boys read it.
Men understand it.
And oed folks commend it. ”

–२५ सुकवीचा असे काव्यहेतु मीं । “ काव्यं यशसे । ” मम्मट.

२९. **गोदावरीचा उगम** :–दुर्दैवानें अपूर्ण राहिलेल्या कवींच्या गोदागौरव या भाव-काव्यांतील हा उतारा आहे. या काव्यांत गोदावरीचें आणि तिच्या परिसरांत कवीनें घालविलेल्या दिवसांचें अतिशय हृदयंगम वर्णन केलें आहे. प्रस्तुत काव्याबद्दल श्री. माडखोलकर लिहितात – “ गोदा-गौरवांत ‘ गंगालहरीं ’तील आर्तता जशी आहे तशी ( पेठकरांच्या ) गंगावर्णनेंतील वर्णनाची सूक्ष्म दृष्टीहि आहे. त्यांतील प्रत्येक स्थलाचें,

दृश्याचें आणि व्यक्तीचें वर्णन आत्मीयतेच्या जिव्हाळ्यानें केलेलें असल्यामुळें बायरनच्या 'चाइल्ड हॅरोल्ड' या काव्याप्रमाणें, त्याला उत्कृष्ट वैणिकाची माधुरी प्राप्त झाली आहे.....गोदागौरवांतील वर्णनांत आत्मपरता जरी ओतप्रोत भरलेली असली, तरी अहंता मात्र मुळींच नाहीं. वाऱ्यानें झुलणाऱ्या वनस्थलीवर जशी संध्येची रम्योदास प्रभा पडलेली असावी, तसें या भावकाव्यावर, नाना प्रकारच्या आठवणी होऊन, कवीच्या मनाला आलेल्या उदासपणाचें मनोहर पटल पसरलेलें आहे. या बाबतींत प्रसिद्ध इंग्रजी कवि गोल्डस्मिथ याच्या 'ट्रॅव्हेलर' या काव्याशीं त्याचें बरेंच साम्य आहे, असें म्हणतां येईल."

श्लोक ३–४. आंग्लकवि गोल्ड गोल्डस्मिथच्या 'ट्रॅव्हेलर' काव्यांतील पुढील ओळी पाहा :—

"Even now, where Alpine solitudes ascend,
I sit me down a pensive hour to spend:
And, placed on high, above the storm's career,
Look downward where on hunderd realms appear;
Lakes, forests, cities, plains extending wide,
The pomp of kings, the shepherd's humble pride."

६–लोटांगण–आपल्या राहण्याच्या स्थळापासून इष्ट देवतेच्या स्थळापर्यंत उभ्या रस्त्यानें सारखे साष्टांग नमस्कार घालीत त्या देवतेसन्मुख जाणें, यास 'लोटांगण' असें म्हणतात.

७–"उत्तरे रामचरिते भवभूतिर्विशिष्यते ।"

११–'बालवयींच्या' ऐवजीं 'गत कालींच्या' असा पाठभेद आहे.
–जगन्नाथपंडितांच्या गंगालहरींतील पुढील ओळ पाहा :–
निराधारो हा ! रोदिमि कथय केषामिह पुरः"

१२–शेवटच्या चरणांत "वीरश्रीनें...जसा." ही मराठे व मावळे यांच्या भाल्यांवरील उत्प्रेक्षा आहे.

१८–भंग=भांग ( हिंदुस्थानी शब्द ).

२३–पुष्कर–हें विस्तीर्ण आणि सुंदर कमलांनीं प्रफुल्लित असें तीर्थ अजमीरपासून ४–५ मैलांवर आहे यास सर्व तीर्थांचा राजा असें

मानितात. " पुष्कराद्यानि तीर्थानि। गंगाद्याः सरितस्तथा ॥ इ० स्नानसंकल्प प्रसिद्धच आहे. तथापि ह्या तीर्थराजाचें माहात्म्य गंगेच्या महिम्याहून कमी व त्याचें पूज्यत्व विधि=ब्रह्मदेवासारखें केवल एकदेशीय, अर्थात् गौण आहे असें येथें ध्वनित केलें आहे. कारण असें सांगतात कीं, ब्रह्मदेवास पार्वतीचा अभिलाष उत्पन्न झाला असें जाणून शिवानें त्याच्या पांच मस्तकांपैकीं एक डोकें उडविलें व 'तूं सर्वत्र अपूज्य होशील!' असा त्यास शाप दिला. नंतर ब्रह्मदेवानें उग्र तपश्चर्या करून शंकरास प्रसन्न केलें. तेव्हां फक्त पुष्कर तीरावर त्यास पूजासन्मानाची मोकळीक मिळाली. त्या अन्वयें या सरोवराचे कांठीं ब्रह्मदेवाच्या चतुर्मुख सुंदर मूर्तीचें एक देवालय आहे, व तेथें शेंकडों यात्रेकरू व स्थानिक लोकांकडून त्याची प्रत्यहीं पूजा होते. साऱ्या हिंदुस्थानांत स्वतंत्र ब्रह्मदेवाचें असें याशिवाय दुसरें मंदिर नाहीं! ह्या पौराणिक कथाभागास अनुसरूनच ही पंक्ति काव्यांत लिहिली आहे.

२४–जगन्नाथपंडितांच्या गंगालहरींतील पुढील श्लोक पाहा :—

" न यत्साक्षाद्वेदैरपि गलितभेदैरवसितम्
न यस्मिन् जीवानां प्रसरति मनोवागवसरः।
निराकारं नित्यं निजमहिमनिर्वासिततमो
विशुद्धं यत्तत्त्वं सुरतटिनि! तत्त्वं न विषयः॥"

२९–श्रीशंकराचार्यांच्या पुढील ओळी पाहा :—

" भगवद्गीता किंचिदधीता गंगाजललवकणिका पीता।
सकृदपि यस्य मुरारिसमर्चा तस्य यमः किं कुरुते चर्चाम्॥"

३३–नियानंदें....

अमृतबिंदु उपनिषदांतील पुढील चरण पाहा—

" शब्दब्रह्मणि निष्णातः परं ब्रह्माधिगच्छति।"।

३० **हिरावाडी**:–नासिक पंचवटींतील वडिलोपार्जित शेतास उद्देशून ही एक स्वतंत्र कविता गोदागौरवांतील एक वेंचा आहे. कवीचें मातृभूमीवरील जिव्हाळयाचें प्रेम या कवितेंतून व्यक्त झालें आहे.

श्लोक ५–‘ आचाराचा नमुना ’ यांत आचार शब्दावर श्लेष आहे. अर्थ–सदाचार, आचार = लोणचें ( हिंदी ).

‘ आंबट आंबा ’–निंबोणीजवळच आंबट्या म्हणून एक आंबा आहे. तो पिकला तरी आंबटच रहात असल्यानें त्याचा उपयोग लोणच्याकडे होतो. म्हणून तो निंबोणीशीं स्पर्धा करीत आहे हा भाव.

६–‘ कंटकशल्यें बोथटलीं ’ केशवसुतांच्या ‘ झपूर्झा ’ कवितेंतील अवतरण. ‘ मखमालीची लव वठली ’ ,, ,, ,,

–एकचि कंटकदोष...कालिदासाच्या पुढील ओळी पाहा:—

एको हि दोषो गुणसन्निपाते । निमज्जतीन्दोः किरणेष्विवांकः ।।

७–थारोळ–जेथें मोटा रिचविल्या जातात त्या उतरत्या जागेस थारोळ हें नांव नासिककडे आहे.

–उभय थडी = विहिरीच्या मुबलक पाण्यास श्रेयस्कर.

–तीनहि तुकडे = १० बिघे बागाईत जमीन.

११–वामनराव – कवींचे ज्येष्ठ बंधु.

१२–बोरकुटें = बोरांचें पीठ.

पुष्पकरंडक...मळ्यांतील फुलबाग.

१३–चैत्ररथ–कुबेराच्या बगीचाचें नांव ‘ अस्योद्यानं चैत्ररथं पुत्रस्तु नलकूबरः । ’ अमरकोश.

१५–बाघाडीचा निर्झर – शेताच्या बाजूनें जाणारा ओढा; हा गोदावरीस मिळतो.

१९–विधिनें...अनुभवणें–गोल्डस्मिथच्या Traveller मधील ओळी पाहा—

“ But me not destined such delights to share,
My prime of life in wandering spent and care.”

३१. **पंचवटी व तपोवन**:–गोदागौरव काव्यांतील एक वेंचा. यांत पंचवटी व तपोवन या दोन नासिकजवळच्या स्थळांचें थोडक्यांत वर्णन असून त्या स्थळांशीं निगडित असे कांहीं प्रसंग व आठवणी सांगितल्या आहेत.

श्लो० १–रामगिरीच्या समंतीं – जवळच असलेल्या ' आशेवाडी ' या गांवीं कवींचे चुलते कै. गोपाळ रामकृष्ण हे प. व. खात्यांत स्टोअर-कीपर होते. त्यांचेकडे उन्हाळ्याच्या सुट्टींत कवि राहिले होते.

तपोवन–श्लो०४–यांतील कल्पना योगवासिष्ठांतील पुढील श्लोकावरून सुचली आहे—

मय्यनंतचिदंभोधानाश्चर्यं जीववीचयः ।
समुल्लसन्ति खेलन्ति प्रविशन्ति स्वभावतः ॥

श्लो० ५–जगदभिरामा...इ० प्रत्यक् चैतन्यरूपाय मह्यमेव नमोनमः ।
–योगवासिष्ठ.

३२. **टाकळी आणि ओढें**:–गोदागौरव काव्यांतील वेंचा. यांत श्रीसमर्थांच्या तपस्येचें स्थान टाकळी आणि सरदार रंगरावांचें ओढें या दोन गांवांच्या स्मृति गोंविल्या आहेत.

श्लो० ४. ' योजिति नमनीं रामपदें '–छत्रपतींच्या कारकीर्दींत राजकीय पत्रव्यवहारांतील पूर्वींचा ' जोहार ' शब्द जाऊन नमस्कारवाचक ' राम राम ' शब्द आले.

श्लो० ६–इकडुनि....परतुनि तो–श्रीराम सीतेसहवर्तमान पुष्पक विमानांतून लंकेहून अयोध्येस जाण्यासाठीं दक्षिण दिशेकडून उत्तरेकडे येत आहे, व कवि गोदातीरानें तिच्या मुळाकडे दक्षिणेस जात आहे; तेव्हां अर्थात् वाटेंत त्याचें दर्शन होईल हा भोळा भाव येथें ध्वनित केला आहे.

३३. **आशीर्वाद** :–स्वामी विवेकानन्द यांच्या मूळ इंग्रजीचें हें भाषांतर असून इंग्रजींतील कल्पना हुबेहूब आणि साजतील अशा उतरण्याचा यशस्वी प्रयत्न या काव्यांत केला आहे.

३४. **कवितेचीं विलासस्थळें** :–आरंभीं दिलेल्या प्रख्यात आंग्लपंडित डॉ. जॉनसन्‌च्या वाक्यावरून काव्यदेवीच्या विलासस्थळांची कल्पना येईल. यांतील कांहीं निसर्गदृश्यें रेखीव आहेत. हें काव्य पुणें येथील एके काळीं चांगल्या दर्जाचें म्हणून नांवाजलेल्या रत्नाकर मासिकांत प्रथम प्रसिद्ध झालें. चंद्रशेखरांच्या प्रतिभेचें, भाषेचें सौष्ठव, विचारांचें सौंदर्य आणि सुश्लिष्ट रचना हे तिन्ही गुण या स्फुट काव्यांत आढळतात. काव्यातील नऊ रसांचीं उदाहरणें यांत रेखीव चित्रांच्या द्वारें जनरंजनाच्या

हेतूनें दिलेलीं आहेत.

३५. **गृहिणीचे डोळे** :—कविवर्य रेंदाळकर यांच्या लोकप्रिय काव्याच्या ( उघडि नयन रम्य उषा हंसत हंसत आली ) चालीवर रचलेलें हें एक रमणीय भावगीत आहे. 'पारिजात' मासिकांतून प्रथम प्रसिद्ध झालें.

३६. **इंद्राचें स्तोत्र** :— चंद्रिकेची पहिली आवृत्ति प्रसिद्ध झाल्यावर कवि चंद्रशेखर यांस बडोद्याच्या राजकविपदाचा मान इ. स. १९३२ सालीं मिळाला. त्यांनंतर त्याचा कै. श्रीमंत सहाजीरावांशीं गांठीभेटींचा संबंध आला. या भेटी महाराज बडोद्यास असले म्हणजे होत असत. अशा एका भेटींत श्रीमंतांनीं कवींना ऋग्वेदांतील देवदेवतांचीं स्तोत्रें लिहिण्याचें सूचन केलें. यामागील आशय असा कीं, राजकुटुंबांतील तरुण आणि मुलें पाश्चात्य देशांत पाठविलीं कीं तेथील संस्कृतीनें त्यांचे डोळे दिपतात व त्यांस भारतीय संस्कृतींतील उदात्त व रक्षणीय गोष्टींचा विसर पडतो. भारताचें अमोल विचारधन मुलांच्या नजरेंत भरावें व त्याची श्रेष्ठता त्यांच्या मनावर बिंबावी. या सूचनेप्रमाणें कांहीं स्तोत्रें रचण्यांत आलीं. त्यांतील नमुना म्हणून हें इंद्राचें स्तोत्र या संग्रहांत दिलें आहे. ऋग्वेदांतील इन्द्राच्या आधिपत्याबद्दलच्या कल्पना स्तोत्रांत आल्या आहेत. या स्तोत्राची रचना १९३४ त झाली.

३७. **मानसपूजा** :— मुलांच्या स्तोत्रपाठासाठीं रचण्यांत आलेली ही मानसपूजा घरांत व राजकुटुंबात बरीच प्रिय झाली.

या संग्रहांतील हीं शेवटचीं तीन काव्यें 'चंद्रिका' प्रकाशित झाल्यावर लिहिलेलीं आहेत.

93869
REFBK-0013471
REFBK-0013471
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनु. 36369 दि.

## आमचे कांहीं काव्य-संग्रह

| | | |
|---|---|---|
| तांबे समग्र कविता | ... | भा. रा. तांबे |
| स्वप्नरंजन | ... | माधव जूलियन् |
| पेर्ते व्हा | ... | कवि अनिल |
| आराधना | ... | वा. ना. देशपांडे |
| अनामिका | ... | वा. ना. देशपांडे |
| आश्विनी | ... | वि. म. कुलकर्णी |
| कांचन मेघ | ... | कवि गिरीश |
| सुवास आणि रस | ... | भ. श्री. पंडीत |
| मधुघट | ... | सं. गं. भा. निरंतर |
| सोनेरी चांदणें | ... | कवि गिरीश |
| सुधारक | ... | माधव जूलियन् |
| दत्तांची कविता | ... | द. कों. घाटे |
| टिळकांची कविता भाग १ व ४ | | ना. वा. टिळक |
| झुकलेलं चांदणं | ... | वसंत दीक्षित |

व्हीनस प्रकाशन
तपश्चर्या : ३८१ क शनिवार पेठ : पुणें २